साप्ताहिक

# माणूस

१६ जून ८४/दोन रुपये

## यशस्वी होण्यासाठी मनःचक्षूचे सामर्थ्य

एक नवीन लेखमाला




एक वेगळी कथा

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : तिसरा

१६ जून १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

पुणे वार्ता

## अक्षर-छाया

चांगला छायाचित्रकार आपल्याला हव्या त्या व्यक्तीचं छायाचित्र कसं काढतो हे फार बघण्यासारखं असतं. स्टुडिओत गेल्यावर जसं हनुवटी थोडी वर, मान किंचित खाली किंवा अगदी अज्ञाताचा वेध घेतल्यासारखे भेदक डोळे करायला सांगतात तसलं काही तो करायला सांगत नाही. तो म्हणतो, तुम्ही माझी दखल घेऊ नका, जसे आहात तसेच रहा. आणि मग एखाद्या बेसावध क्षणी तो तुमच्या नकळत फोटो काढून मोकळा होतो आणि आपण म्हणतो काय हुबेहुब फोटो आलाय !

१०–११ जून दोन दिवस बालगंधर्व रंगमंदिराच्या दालनात मराठीतल्या शभर एक साहित्यिकाच्या छायाचित्रांचं प्रदर्शन भरलं होतं. सर्व छायाचित्रं दिलीप कुलकर्णी या तरुण छायाचित्रकाराची होती आणि त्याच्या सगळ्या छायाचित्रात ते ते व्यक्तिमत्व त्याच्या हुबेहुबपणासकट अलगद मिटून गेलं होतं. दिलीप कुलकर्णीची छायाचित्रं म्हणजे छाया–प्रकाशाच्या हळुवार मिलाफाचा एक चांगला नमुना आहे.

दिलीप कुलकर्णीचं नाव गेली ३/४ वर्षं दिसायला लागलं होतं. स्त्री, किर्लोस्कर मासिकांतून तुरळक दिसणारी त्याची छायाचित्रं वेधून घेणारी होती. मला आठवतात ती त्याची पं. भीमसेन जोशी आणि डॉ. वसंतराव देशपांडे याची घेतलेली छायाचित्रं. मैफिलीत रंगलेल्या भीमसेनच्या चेहऱ्यावरचे ताणतणाव आणि डोळ्यातला आर्तभाव त्यानं इतका अचूक टिपला होता ! तसंच वसंतरावाच्या छायाचित्राचं सांगता येईल. मग अधूनमधून त्यानं काढलेली नवी छायाचित्रं बघायला मिळायची. चांगला फोटो काढण्यासाठी मॉडेलचंही तितकंच सहकार्य लागतं हेही तो आवर्जून सांगायचा.

दहा तारखेला दिलीपचं 'अक्षरछाया' प्रदर्शन बघायला गेले तेव्हा हे सगळं डोळ्यासमोर होतं.

'अक्षरछाया 'मधली साहित्यिकाची सर्व छायाचित्रं 'पोर्ट्रेट' या प्रकारातली आहेत. पोर्ट्रेट म्हणजे व्यक्तिचित्रं दिलीप कुलकर्णीनं घेतलेली छायाचित्रं हा व्यक्तिचित्राचा उत्कृष्ट नमुना आहे. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, दया पवार, खरात, ना. ग. गोरे, प्रभाकर पाध्ये, विंदा करंदीकर, सुर्वे, वसंत बापट, कुसुमाग्रज, इंदिरा संत, शांता शेळके, गोविंद तळवलकर, विद्याधर गोखले, माधव गडकरी, मुकुंदराव किर्लोस्कर, श्री. ग. माजगावकर, विद्या बाळ, अरुण साधू, शिरीष कणेकर अशी बरीच नावं देता येतील. या यादीकडे नजर टाकली तर लक्षात येतं की, साहित्यिक हा शब्द फार विस्तृतपणे वापरला गेला आहे त्यामध्ये विशिष्ट साहित्यप्रकार किंवा विशिष्ट वयोगटाची बांधिलकी नाही. त्यामुळेच यशवंतराव चव्हाण आणि प्रभाकर पाध्ये सुद्धा एकमेकांकडे पाहून हसताना दिसतात.

प्रदर्शनात एकूण ८४ छायाचित्रं आहेत. जाहीर केलेल्या शभर छायाचित्रांपैकी व्यंकटेश माडगूळकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, शं. ना. नवरे, मंगेश पाडगावकर अशी १०–१२ छायाचित्रं प्रदर्शनात मांडली गेली नाहीत. कारण वेळेचा अभाव.

व्यक्तिमत्वाचा 'मूड ' पकडण हे दिलीपला आव्हान वाटतं आणि त्यानं ते चांगलं पेललं आहे. तेंडुलकरांच्या डोळ्यातला बेरकीपणा, श्रीजंचा मिस्किलपणा, पुंडलिकांचा गंभीरपणा, पाध्यांचं परिचित मोकळ हसण, वसंत बापट आणि गो. नी. दांच्या वार्धक्याच्या खुणा सगळं जसंच्या तसं उमटलं आहे. मला या प्रदर्शनात जाणवलं की, यातले गोविंदराव तळवळकर उगाचच हसरी छबी देत नाहीत की, व. पु. काळे हनुवटीला तर्जनी लावून विचार केल्याचा आव आणत नाहीत अर्थात हे कौशल्य छायाचित्रकाराच आहे. याबद्दल दिलीप म्हणाला की, त्या त्या साहित्यिकाचं खरंखुरं व्यक्तिमत्त्व माहीत करून घेण्यातही माझा बराच वेळ गेला; पण तो वेळ फुकट गेला नाही. फोटो बघून व्यक्तिमत्त्वाची कल्पना यायला हवी असं मला वाटत.

फक्त साहित्यिकाची छायाचित्रं घेऊन त्याचं प्रदर्शन भरवण्याची कल्पना दिलीपला सुचली दोन वर्षांपूर्वी. या दोन वर्षात त्यान

बऱ्याच साहित्यिकांचे बरेवाईट अनुभव घेतले. दिलीप बोलताना म्हणाला की, बहुतेकांनी चांगलं सहकार्य दिलं; पण काहींचे अनुभव मात्र कडू होते. विशिष्ट दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून जेव्हा एक कलाकार दुसऱ्या कलाकाराकडे जातो तेव्हा त्याला किमान आवश्यक सहकार्य देणंसुद्धा काहींना जमत नाही. तरीही एकूण सहकार्याबद्दल तो समाधानी दिसला.

प्रदर्शन बघताना खटकत होती ती प्रदर्शनाची मांडणी. तपकिरी रंगाच्या हलक्या कागदावर ही मौल्यवान छायाचित्रं अडकवली होती. त्याच्यामध्ये नेटकेपणाचा, कल्पनाशक्तीचा पूर्ण अभाव होता. अशा प्रकारची प्रदर्शनं नेहमी भरत नसतात. जेव्हा ती भरतात तेव्हा कलाकार-संयोजक मांडणीमध्ये बरेच वेळा कमी पडलेले दिसतात. प्रदर्शनाचा अपेक्षित परिणाम घडून यायचा तर अशा महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. साधारण महिनाभरात हेच प्रदर्शन मुंबईच्या साहित्य संघात भरणार आहे. त्या वेळी तरी प्रदर्शनाचं संयोजन आखीवपणानं व्हावं आणि या क्षेत्रातल्या जाणकारांकडून या 'अक्षर-छायेचं' योग्य मूल्यमापन व्हावं ही अपेक्षा.

—मेघा राजहंस

## चिपको–प्रकाशन

'पर्यावरणाच्या संबंधात लोकांना जागरूक करावं हा माझ्या पुस्तकाचा हेतू आहे आणि आमच्यासारखीच अनेकजणं 'बिघडली' तर माझ्या पुस्तकाचा हेतू सफल झाला असे मी समजेन.' या शब्दात 'प्रेरणा चिपकोची–भटकंती गढवालची' या पुस्तकाचे लेखक डॉ. जगदीश गोडबोले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

दि. ८ ला शुक्रवारी संध्याकाळी या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यासाठी निसर्गाच्याच सान्निध्यात असलेले फर्ग्युसन कॉलेजमधील 'किमया' सभागृह निवडले होते. चिपको आंदोलनाच्या निमित्ताने हिमालयाच्या परिसरात प्रत्यक्ष फिरून आल्यानंतर जगदीश गोडबोले यांनी 'माणूस'च्या ४ डिसेंबर ८२ ते २९ जानेवारी ८३ या अंकांमध्ये सात भागात 'प्रेरणा चिपकोची–भटकंती उत्तराखंडाची' ही लेखमाला लिहिली. तिने अनेक वाचकांचे या विषयाकडे लक्ष वेधले. याच लेखमालेला 'गुरुवर्य सबनीस पारितोषिक' ही मिळाले. त्याचेच आता 'प्रेरणा चिपकोची–भटकती गढवालची' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

माणसाचं समाजाबरोबरच निसर्गाशीही नातं असतं. म्हणूनच निसर्गाचा समतोल, एकूण पर्यावरणाची स्थिती हा विषय प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा असला पाहिजे; पण आपल्याकडे या विषयाची उपेक्षाच होते. म्हणून निसर्गसंपत्तीचं रक्षण ही आज काळाची गरज बनली आहे.

'प्रेरणा चिपकोची...'च्या प्रकाशनाच्या निमित्ताने पर्यावरणाच्या या आजच्या स्थितीबद्दल विचारमंथन झाले. या पुस्तकाबद्दल बोलताना प्रा. पुरुषोत्तम सेठ म्हणाले, 'आपण अनेक प्रवासवर्णने वाचतो; पण त्यात केवळ मनोरंजन हाच उद्देश असतो. या पुस्तकात सौंदर्यदृष्टीबरोबरच सामाजिक प्रश्नाविषयी वाटणारी कळकळही पानोपानी आढळून येते.' सेठ यांनी सांगितलेले हे वैशिष्ट्य तर पुस्तकात आहेच; पण निसर्गाकडे बघण्याची योग्य दृष्टीही या पुस्तकाने आणि आंदोलनाने दिलेली आहे.

प्राचीन काळी झाडे, पर्वत, नद्या, पशू या सगळ्यांना लोकांनी देवता बनविले होते, तर आधुनिक काळात विज्ञानाच्या आधारे निसर्गावर आक्रमण करण्याची भाषा बोलली जाते; पण ही दोन्ही टोके सोडून निसर्गाकडे 'मित्र' या नात्याने पाहिले पाहिजे हा विचार महत्त्वाचा आहे. ही मैत्री म्हणजेच माणसाने टिकवलेले निसर्ग–संतुलन!

पण खरोखर आज हे निसर्गसंतुलन टिकवण्याची काळजी घेतली जाते का? माधव गाडगीळ आणि कुसुम कर्णिक यांनी सांगितलेले अनुभव त्या दृष्टीने विचारार्ह आहेत. माधव गाडगीळ म्हणाले, 'पर्यावरणाची समस्या व्यापक दृष्टिकोनातून विचारात घेतली पाहिजे. एखाद्या नवीन प्रकल्पामुळे तेथील वातावरणावर काय परिणाम होतात हे पाहिले जात नाही. एकीकडे ही दक्षता न घेता दुसऱ्या बाजला 'गुरांना चरायला मनाई करावी म्हणजे वनरक्षण होईल' असे ठराव निसर्गप्रेमींकडून केले जातात. पर्यावरणाचा विचार करताना संपूर्ण कृषिव्यवस्था आणि पशूपालनव्यवस्था बदलण्याची आवश्यकता गाडगिळांनी प्रतिपादन केली.

कुसुम कर्णिक यांनीही एक महत्त्वाचा दोष सांगितला. त्या म्हणाल्या, 'वृक्षतोडीमुळे भूस्खलन होते व ज्यांच्या जमिनी नाहीशा होतात त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो' दोघांनीही सरकार या प्रश्नाविषयी अत्यंत उदासीन आहे, म्हणून लोकांनीच संघटितपणे निसर्गसंपत्तीचं रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत यावर भर दिला.

दैनंदिन जीवनात एखाद्या प्रश्नाशी रोज भिडावे लागल्यास त्याचे गांभीर्य कळते. पर्यावरणाच्या असंतुलनाचा आपल्यावर प्रत्यक्ष काही परिणाम आज दिसत नसला तरी आदिवासी लोकांना त्याची लगेच झळ पोहोचते. मुळशी या आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्याने अगदी साध्या शब्दात ही परिस्थिती सांगितली. तो म्हणाला, 'जनावराचा पाला दिवसेंदिवस कमी होत चालल्यामुळे पशुपालन कठीण होते आहे व पुण्यासारख्या शहरातील झोपडपट्ट्यांची संख्या वाढते आहे!'

पण वनरक्षण करून ही शहराकडे येणारी रीघ थोपविण्याचा दूरदृष्टीचा विचार सरकार करीत नाही. औद्योगिक प्रकल्प सुरू करायचे म्हणून वृक्षतोडच करायला पाहिजे असे नाही; पण वनरक्षण आणि औद्योगिक प्रगती यांचा योग्य तो ताळमेळ राखला जात नाही. त्यामुळे प्रगतीच्या घोषणा करताना प्रत्यक्षात आपले एक पाऊल मागेच पडलेले असते.


ग. बा. सरदार यांनी आपल्या भाषणात हाच विचार मांडला. ते म्हणाले, 'यंत्रयुगाचे स्वागतच करायला हवे. यंत्रयुगाला विरोध करून निसर्गाकडे जाऊ ही कल्पना चुकीची आहे. वास्तवाचं भान ठेवून आणि पर्यावरण हे एक शास्त्र आहे या दृष्टीनेच त्याचा विचार झाला पाहिजे.' कार्यकर्त्यांच्या धडपडीबद्दल बोलताना त्यांनी

सांगितले की, 'मला या चळवळीचं कौतुक वाटतं ते अशासाठी की, सौंदर्याचा आस्वाद घेण्याच्या वृत्तीबरोबरच निसर्गाच्या सान्निध्यात राहून निःसत्त्व बनलेल्या व खंगून गेलेल्या माणसांबद्दल यांना कळकळ आणि प्रेम आहे!'

एकंदर सगळ्यांचीच भाषणे ऐकल्यानंतर आपल्या सभोवतालच्या वातावरणाशीही आपण बऱ्याच वेळा आपलं नातं विसरतो याची जाणीव झाली. निसर्गाशी बरोबरीच्या नात्याने वागावे हे खरेच; पण 'माणसाच्या गरजा भागतात म्हणूनच वृक्षावर प्रेम करायचे' हा सरदारांचा उपयुक्ततावाद मात्र बरोबर नाही. निसर्गावर आणि वृक्षांवर प्रेम करताना प्रत्येक वेळी हे हिशेब मांडलेच पाहिजेत का? निसर्गावरील प्रेम स्वयंस्फूर्त असावे, त्यात कसली आलीय बांधिलकी?

हे पुस्तक जसं एक 'प्रवासवर्णन' आहे त्याचप्रमाणे पर्यावरणसंबंधातील चळवळीचे माध्यमही आहे. या विषयाची लोकांना जास्तीत जास्त माहिती होणे आणि त्यातून त्यांना स्फूर्ती मिळणे हे महत्त्वाचे. अर्थात पुस्तक ही केवळ सुरुवात आहे. जगदीश गोडबोले म्हणाले, तसे लोक 'बिघडले' तरच नैसर्गिक संपत्तीचं मिळालेलं वरदान आपण टिकवू शकू, फक्त निसर्गाकडे बघण्याची निकोप दृष्टी हवी.

—निरंजन



# मुंबापुरी

## पोस्टमार्टेम

जनता पक्ष बाणशय्येवर आहे. चार वर्षांत पाचव्यांदा पक्षाचं पोस्टमार्टेम करावं लागेल की काय अशी परिस्थिती आहे. त्यात पुन्हा उपचार करायला डॉ. सुब्रमण्यम स्वामी आणि राजनारायण यांसारखे दिव्यलक्षणी वैद्य! मग आणखी काय पाहिजे?

परवा पक्षाचे चार मातब्बर नेते— राजनारायण, रवींद्र वर्मा, बनारसीदास आणि सत्येन्द्रनारायण सिन्हा मुंबईत मोरारजी देसाईंना भेटून गेले.

पक्षाची एकूण बिघडलेली तब्येत लक्षात घेता आम्हाला मोरारजीभाईंना भेटणं अगत्याचं वाटलं आणि पक्षाला पुन्हा निरोगी बनवण्यासाठी आम्ही मोरारजींशी प्रदीर्घ मसलत केली असं राजनारायण यांनी नंतर अस्मादिकांना सांगितलं.

'बापूजी के पास सब बीमारीयोंका इलाज है. आपभी जाइये. आपको बिल्कुल ठीक कर देंगे,' असं राजनारायण म्हणाले.

आमची काही जाण्याची इच्छा नाही. पण चंद्रशेखरना हल्ली डिसेंट्रीचा त्रास होतोय असं कळलंय! (या त्रासापायी त्यांना मोरारजींबरोबरची आपली भेटही पुढे ढकलावी लागली असंही कळलंय.)

मोरारजी चंद्रशेखरचा कसा काय इलाज करतील ते आम्हाला कळत नाहीये; पण चंद्रशेखरविरुद्ध तोफा डागणारे स्वामी, राजनारायण, वर्मा, बनारसीदास, सुषमा स्वराज यांना मोरारजींविषयी प्रचंड गहिवर आला आहे. मोरारजी—स्वामी या दोघांमधले अतूट स्नेह—संबंध सगळ्यांना ठाऊक आहेतच.

अशा या डॉ. स्वामींना कार्यकारिणीतनं सस्पेण्ड केलं जावं याचा बापूजींना निश्चितच राग आलाय. तेव्हा चंद्रशेखरची सालटी काढायला मोरारजींची मदत घ्यावी असा काहीसा हिशेबी मामला लक्षात ठेवून राजनारायण सत्येन्द्रनारायण, बनारसीदास प्रभृती मुंबईत आले.

पण मोरारजीसुद्धा खट आहेत. केव्हा उलटतील नेम नाही. आपण पक्षाध्यक्षांशी बोलल्याखेरीज काहीच करणार नाही असं त्यांनी या चौघांना सुनावल्याचं कळतं. हे ऐकून रवींद्र वर्मा तडक संध्याकाळची गाडी पकडून मद्रासला निघून गेले. सत्येन्द्रबाबूंनीही त्याच रात्री काढता पाय घेतला. 'मोरारजी भाई की इच्छा नही है की हम बंबईमें और रहें.' एवढंच म्हणाले.

अजिबात डगमगले नाहीत ते राजनारायण. म्हणाले 'हमने सब बाते बापूजी को कहीं, वे क्या करेंगे देखते हैं. वरना हमे जो करना है, वह तो हम करेंगेही.' त्याचं विकट हास्य अद्याप लक्षात आहे.

जनता पक्ष बाणशय्येवर आहे होऽऽऽऽऽ हो!

## अप्रिय—पथ्यकारक

राजकीय नेत्यांनी पुस्तके लिहू नयेत आणि लिहिली तर त्यावर परिसंवाद भरवू नयेत. हवे तर आमच्या वसंतराव साठ्यांना विचारा. त्यांच्या 'टोवर्डस् सोशल रेव्होल्यूशन—अ केस फॉर इकॉनॉमिक डेमॉक्रसी' ह्या पुस्तकावर सेंटर फॉर मॅनेजमेंट ह्या संस्थेने गेल्या शुक्रवारी चर्चा घडवून आणली. ह्या परिसंवादात अब्दुल रहेमान अंतुले, डॉ. दत्ता सामंत, बाँबे युनिव्हर्सिटीच्या डॉ. आलू दस्तुर आणि जयप्रकाश नारायण यांच्यावर उपचार केलेले जसलोक हॉस्पिटलचे डॉ. लेले, अशा रथी-महारथींनी भाग घेतला.

अंतुले ह्यांनी सुरुवातीच्या तीन वाक्यांतच महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी ह्यांची महती श्रोत्यांना पटवून दिली. आजकाल ते प्रत्येक व्यासपीठाचा उपयोग स्वतःच्या पुनर्वसनासाठी करतात. मनुस्मृती ते साठ्यांचे पुस्तक ह्या पर्यंतच्या काळात प्रसिद्ध झालेल्या सर्व ग्रंथांमध्ये अध्यक्षीय राज्यपद्धतीचाच पुरस्कार केलेला आहे अशी अंतुल्यांची ठाम धारणा आहे.

साठ्यांचे पुस्तक बाजूला ठेवून त्यांनी तब्बल पंधरा मिनिटे ह्या देशाला अध्यक्षीय राज्यपद्धतीची कशी गरज आहे याचे विवेचन केले आणि मग राणा भीमदेवी थाटात 'आपली लोकशाही बळकट असती तर चरणसिंगसारखा मनुष्य पंतप्रधान झालाच कसा असता?'

असा प्रश्न विचारला. यावर तात्काळ एका श्रोत्याने उभे राहून 'इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे असे उत्तर दिले. ह्या अचानक मिळालेल्या उत्तरामुळे अंतुले गडबडले. त्यांचे भाषण पुढे सुरू होण्याआधी लोक उठून उभे राहिले आणि त्यांनी अंतुलेंनी 'ह्या देशातील तळागाळाच्या गरिबा' ऐवजी साठ्यांच्या पुस्तकावर बोलावे, असा ओरडा सुरू केला.

मग आलू दस्तूर अंतुल्याच्या मदतीला धावल्या. त्यानी लोकांना सांगितले की, चर्चेच्या शेवटी त्यांना प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येईल; पण हे प्रश्न मात्र फक्त साठ्यानाच विचारावेत.

तरीही स्वत:च्या भाषणात आलू दस्तुर ह्यांनी अंतुल्याच्या भाषणाचा समाचार घेतला. 'दोष लोकशाही राज्यपद्धतीचा नसून आम्हीच लोकशाहीला लायक नाही. आम्हाला लोकशाही राज्यपद्धती हवी; पण लोकशाही जीवनपद्धती नको' असे त्या म्हणाल्या. मग अंतुले आणि साठे यांच्याकडे दृष्टिक्षेप टाकून बाई म्हणाल्या, 'आमच्या नेत्यांची जेवढी व्यक्तीवर भक्ती आहे तेवढी लोकांवर वा देशावर नाही!'

'स्तुतिसुमने उधळणारे भाट हवे तेवढे मिळतील; पण अप्रिय परंतु पथ्यकारक बोलणारे हितचिंतक मिळणे कठीण' ह्या साठ्यांच्याच पुस्तकातील उक्तीचा उल्लेख करून त्या म्हणाल्या, 'मला खात्री आहे की दिल्लीला परत गेल्यावर वसंतराव हे वचन आचरणात आणतील!'

आता सांगा वसंतराव, इतका 'अप्रिय परंतु पथ्यकारक' उपदेश मिळाल्यावर तुम्ही परत पुस्तकावर चर्चा घडवून आणणार काय?

## आयी बरसात तो....

पाऊस येतोय. एवढा हा मजकूर लिहून होईस्तवर कदाचित एक छद्मी सर दणदणून जाईलसुद्धा. नेम नाही. मुंबईचा पाऊस मुंबईसारखाच. बनेल. चालू!

पण पाऊस पहावा, भोगावा, 'फील' करावा तर तो मुंबईचाच. रक्तात भिनत जातो. नसानसात झंकारत राहतो.

तीच ती पाण्यात संथ डुंबणारी माणसं. वाहनं एकदम आस्ते–कदम. त्याच त्या अनाहूत-सरी. लखलखणाऱ्या विजांचा झिम्मा. परवा चर्चगेटला परततेवेळी फाउंटनपाशी अशी वीज लखलखून गेली म्हणताय. मल्लिकार्जुन मन्सूरच्या गिरकेबाज तानेसारखी!

मुंबईतल्या पावसाला चिडीचिप सहन करणारी जुनी घरं, पडक्या चाळी, चाळीचे डुगडुगणारे टेकू, थरथरणारे जिने, जिन्याखालचा आदिम अंधार, अंधारातली माणसं, पावसाकडे निश्चल बघत बसणारी. सादत हसन मंटोच्या कथेतल्या पात्रासारखी.

मुंबईतल्या पावसात काय काय करावं अन् करू नये असं होऊन जातं. सकाळी चर्चगेटजवळ उभं राहून काळयाशार छत्र्यांचं घनदाट जंगल पहावं की संध्याकाळी पावसात भिजायला येणाऱ्या म्हाताऱ्या जोडप्याना पहावं? गच्च धारा कोसळत असताना गेटवे ऑफ इंडियासमोर उभं राहून समुद्राला हाक द्यावी की ताजमहलच्या बंद, बिलोरी तावदानांतून पाऊस 'पाहणाऱ्या' पागलांना वेडावून दाखवावं? की नाज–इम्पिरियलमध्ये सकाळच्या रामप्रहरी राजकपूरचा 'बरसात' पहावा? 'बरसातमें तुमसे मिले हम सजन, बरसातमें'......

सगळयात उत्तम म्हणजे महंमदअली रोडवर संध्याकाळभर रखडत रहावं. रोजा सुटला की, मालपुवे–कबाबवर ताव मारावा, वर मुखशुद्धी म्हणून अफलातून आहेच! अन पावसात चिंब भिजत बेगम अख्तर ऐकावी:

'हमने सोचा था बरसातमें बरसेगी शराब
आयी बरसात तो बरसातने दिल तोड दिया'

मुंबईचा पाऊस आहेच तसा. जीवघेणा. छळवादी...

—विष्णू जयदेव

## राजधानी दिल्ली

### सर्वात तरुण स्त्री न्यायाधीश

## सुनंदा भंडारे

'मी महाराष्ट्रीय असल्याचा मला अभिमान वाटतो. महाराष्ट्रातली न्यायाची रामशास्त्र्यांची परंपरा जागी ठेवण्याचा मी प्रयत्न करीन' सुनंदा भंडारे यानी एका खास मुलाखतीत सांगितले.

दिल्लीच्या उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नुकतीच त्यांची नेमणूक झाली. दिल्लीत जरी ही दुसरी स्त्री न्यायाधीश असली तरी एका मराठी भगिनीला हा बहुमान प्रथम मिळाला हे कौतुकास्पद! सुनंदाबाईंचे अभिनंदन करावयास मी गेले असताना त्यांनी वरील उद्गार बोलून दाखविले.

'तुम्हाला न्यायाधीशपद मिळणार हे अपेक्षित होते का?'

'तसे मला एक महिन्यापूर्वी विचारण्यात आले होते, त्यामुळे कल्पना होती.'

'ह्या पदावर तुमची नेमणूक होणार आहे हे तुम्हाला केव्हा कळले?'

'आठ दिवसापूर्वी.'

'हे पद मिळाल्याचे कळल्यावर तुमच्या मनात पहिला विचार कोणता आला?'

'पहिल्या प्रथम वाटले ते म्हणजे की, आता आपल्यावर जबाबदारी आली. ही जबाबदारी फार मोठी आहे. आतापर्यंत वकिली व्यवसायात फक्त आपल्या अशिलाची जबाबदारी असे. आता दुतर्फा जबाबदारी वाढली आणि असंही वाटल की, बारमध्ये सगळयाच्याबरोबर मिळून-मिसळून वावरायची सवय होती. आता एकटं रहावं लागेल. हे पद मिळाल्याचं कळल्यावर मला माझ्या वडिलांची (कै. हरिभाऊ गोखले) आठवण झाली. वाटलं ते आज असायला हवे होते. मी वकिली त्यांच्यासमोर सुरू केली. त्यांनी मला व्यवसायातील बरोबरीच्या सहकाऱ्याच्या नात्याने वागवले, मी मुलगी असूनही!'

'स्त्रियावर होणाऱ्या अत्याचारांचे खटले महिला न्यायाधिशांसमोर चालण्याने काही फरक पडेल का?'

'स्त्री म्हणून हा फरक होणार नाही; पण मी एक स्त्री या नात्याने स्त्रियांबद्दल



**उच्च न्यायालयाची अधिक पीठे हवीत – भंडारे**

□

सहानुभूती राहणारच. आजच्या कायद्याच्या चौकटीत राहून स्त्रियांना योग्य न्याय मिळावा ह्याचा मी प्रयत्न करीन. तसेच गरिबांच्याबद्दल मला नेहमीच सहानुभूती वाटते. कायद्याच्या कक्षेत राहून मी नेहमी त्यांचं हितच बघेन. मी वकिली करत असतानाही स्त्रियांच्यासाठी, त्यांच्या अधिकारांसाठी लढले आहे. १९७४ साली माझ्याकडे एका मुलीची केस होती. तिला आर्मीमध्ये वकील म्हणून नेमणूक हवी होती. आर्मी ॲक्टप्रमाणे त्यांच्याकडे स्त्रीला नेमणूक दिली जात नाही. पुरुष वकिलांचीच नेमणूक केली जाते. ह्या मुलीची योग्यता असताना तिला हा हक्क मिळावा म्हणून मी लढले. लष्कराचे कायदे कडक असतात. त्यामुळे तिची नेमणूक झाली नाही, हे वेगळे; पण स्त्रियांच्या अधिकारांसाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे.'

'बांधील न्यायाधिशांच्या नेमणुकीचा सपाटा सुरू झाल्याची टीका होत असताना तुमची नेमणूक झाली आहे ह्यावर तुम्हाला काय म्हणायचंय ?'

'मला नाही वाटत माझी अशी नेमणूक झाली आहे. लोक असं म्हणतील. कारण मी सरकारची कामं केली आहेत; पण न्यायासनावर बसल्यानंतर मी न्यायाची कधीही उपेक्षा होऊ देणार नाही.'

'न्यायासनावर एक स्त्री म्हणून बसल्यावर न्याय-निवाड्याला जास्त सखोल सामाजिक आयाम तुम्ही द्याल का ?'

'न्यायासनावर स्त्री किंवा पुरुष कोणीही असलं आणि त्याला सामाजिक दृष्टी असली तर न्याय–निवाड्यात तुम्ही म्हणता, तसा सामाजिक आयाम येईलच. मी आयुष्यातले अनेक खाचखळगे बघितले आहेत. संघर्ष केला आहे. त्यामुळे समाजाचं स्वातंत्र्य अबाधित राहावं हे मी बघेनच.'

'कोर्टाची पायरी चढायला लोक कचरतात. शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये असं म्हटलं जातं. तेव्हा लोकांपर्यंत न्याय जाण्याचा काही प्रयत्न राहील का ?'

'कोर्टाची पायरी चढायला घाबरण्याचं कारण म्हणजे लागणारा खर्च आणि न्याय मिळायला लागणारा वेळ. लोकसंख्येच्या वाढीमुळे म्हणा किंवा आता आपल्या हक्कांसाठी, अधिकारांसाठी लोक जास्त जागरूक झाले आहेत म्हणून म्हणा, केसेसचे प्रमाण वाढतेच आहे दिवसाला तीनशे केसेस दिल्ली हायकोर्टात येतात. तेव्हा न्याय मिळणं सुलभ व्हावं याची खटपट चालली आहेच. झाडाखाली बसून लोकांना न्याय मिळावा अशी व्यवस्था होतेय; पण न्यायासाठी आधीपासूनच रांगेत उभे असलेल्या लोकांना डावलूनही चालणार नाही, ह्याची खबरदारी मी अवश्य घेईन. सार्वजनिक हिताकडे जास्त लक्ष देईन. एखादी सामाजिक घटना घडली की, न्यायालयाचं त्याकडे लक्ष वेधलंच पाहिजे.'

'न्यायदान सुलभ व्हावे म्हणून अधिक न्यायाधीश नेमायला हवेत का ?'

'अधिक न्यायाधिशांच्या नेमणुका करणं हा काही ह्यावर उपाय नाही. न्यायपालिका, वकील, सरकार ह्यांनी मिळून ह्यासाठी प्रयत्न करायला हवा. उच्च न्यायालयाची अधिक पीठे स्थापन केली तर ती जास्त उपयोगी होतील.'

'न्यायपालिकेतून पुढे कुठे जाण्याची इच्छा आहे ?'

'माझे आजोबा बडोद्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते. माझे वडील मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते, नंतर ते राजकारणात आले व केंद्रात कायदामंत्री झाले; पण माझी आई मात्र मला कळवळून बजावते आहे की, मी वडिलांसारखे करू नये. न्यायपालिकेतच आपले जे काही कर्तृत्व दाखवायचे ते दाखवावे.'

सुनंदाताईंनी लग्नानंतर आपले घर, संसार, मुले सांभाळून आपले शिक्षण केले. त्या मुंबई विद्यापीठाच्या कायदा–पदवीधर आहेत. १९६८ पासून त्यांनी वकिली सुरू केली. दिल्लीत उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात तेरा–चौदा वर्षे वकिली केली. सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनच्या त्या उपाध्यक्ष होत्या. महिला वकीलसंघाच्या त्या अध्यक्ष होत्या. मॅक्सिकोत संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय महिला–वर्षाच्या परिषदेला गेलेल्या शिष्टमंडळाच्या त्या सभासद होत्या. त्यानंतर आज भारताच्या राजधानीत उच्च न्यायालयात न्यायाधीश होण्याचा बहुमान मिळालेल्या त्या सर्वात तरुण न्यायाधीश आहेत! संपूर्ण देशात फक्त दहाच महिला न्यायाधीश आहेत. त्यांच्या पंक्तीत आता त्यांचा अंतर्भाव होत आहे, ह्याचे श्रेय त्या आपल्या आजपर्यंत केलेल्या संघर्षाला देत आहेत. त्यांची कन्या मनाली ही त्यांच्या घरात वकील होऊ इच्छिणारी पाचवी पिढी. सुनंदाताईंचे वडील, आजोबा आणि पणजोबा सर्व नामांकित वकील होते. त्यांचे यजमान श्री. मुरलीधर भंडारेही सर्वोच्च न्यायालयात वकील आहेत.

**–सौ. प्रज्ञा तपस्वी**

# मतांचे राजकारण आणि दंगली

अभय गोखले

दहा-बारा दिवस हिंसाचाराचे थैमान घातल्यावर, २५० जीवांचे बळी घेऊन, मुबई, भिवंडी, ठाणे व कल्याण येथील दंगल आटोक्यात आली. भिवंडीत हिंसाचार त्या मानाने लवकर आटोक्यात आला तरी मुबईमध्ये ही भयानक जातीय दंगल दहा-बारा दिवस अव्याहतपणे निरनिराळ्या भागात पसरत होती. हिंदु-मुसलमानांतील ही पारंपारिक जातीय दंगल कशी उद्भवली याची निरनिराळी कारणे सागितली जातात. बऱ्याच वर्षांनी शिवजयंतीला भिवंडीत मिरवणूक काढण्यास परवानगी देण्यात आली. ती मिरवणूक शासनाच्या जागरूकतेमुळे नीटपणे पार पडली; परंतु काही मुस्लिम जमातीतील लोकाना, भिवंडीत शिवप्रतिमेच्या मिरवणुकीस जी परवानगी देण्यात आली, तोच अपमान वाटला. बनातवालासारख्या जातीयतावादी मुस्लिमनेत्याने भिवडीत मिरवणुकीला परवानगी दिली तर रक्ताचे पाट वाहातील असे बेताल वक्तव्य केले. त्यावर अजून महाराष्ट्र शासनाने कारवाई केलेली नाही. मिरवणुकीनतर जी सभा झाली त्यात फारशी भडक भाषणे झाली नाहीत. भिवंडीतील शिवजयंतीचा उत्सव शांततेने पार पडल्याबद्दल सर्वांनाच समाधान वाटले; परंतु ती वादळापूर्वीची शातता होती हे कोणाच्याही लक्षात आले नाही.

'सोबत' साप्ताहिकातील एका लेखाबद्दल परभणीतील काही मुस्लिमांनी, त्यातील काही मुस्लिमाविरोधी विधानांचा निषेध करण्यासाठी एक मोर्चा काढला. या मोर्चाचे नेतृत्व खान नावाच्या एका इंदिरा कॉंग्रेस आमदाराने केले. या मोर्चात शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे याच्या प्रतिमेला चपलांचा हार घालून त्याची मिरवणूक काढण्यात आली. कारण काय तर बाळ ठाकरे यानी मुस्लिमाचे प्रेषित महंमद पैगंबर याच्याबद्दल काही अनुदार उद्गार आपल्या एका भाषणात काढले होते! या भाषणाचा वृत्तात बगलोरच्या नशेमन व भिवंडीतील एका स्थानिक वृत्तपत्रात विकृत स्वरूपात छापण्यात आला होता. आपण पैगंबरांबद्दल कोणतेही 'अनुदार उद्गार काढलेले नाहीत हे बाळ ठाकरानी खुलाशासकट जाहीर केले आहे व तसा खुलासा त्यांनी भिवडीतील काही मुस्लिममंडळीशी दगलीपूर्वी केला होता. बाळ ठाकऱ्यांच्या प्रतिमेला चपलाचा हार घालण्याची प्रतिक्रिया लगेच मुबईत व ठाण्यात उमटली व त्याच्या निषेधार्थ मुबईच्या निरनिराळ्या भागात बंद आयोजित करण्यात आले.


त्याच वेळेस भिवंडीत बाळ ठाकऱ्यांचे वक्तव्य विकृत स्वरूपात छापण्यात आल्याने वातावरण तग बनलेले होते. शिवजयतीची मिरवणूक शातंतेने पार पडल्याने संतप्त झालेल्या लोकांनी त्या वेळेस दगल माजवण्यासाठी जी तयारी केली होती ती फुकट गेली होती. तेव्हा त्या तयारीचा वापर करण्याची पुरेपूर संधी बाळ ठाकऱ्याच्या त्या तथाकथित वक्तव्याने चालून आली होती. झाले. शिवजयती निमित्ताने भिवडीत सर्वत्र जे शिवसेनेचे झेंडे लावण्यात आले होते ते रातोरात खाली खेचून तेथे हिरवे झेंडे लावण्यात आले. मुस्लिमांचा तेव्हा शबेबारातचा सण होता. शिवसेनेचे झेडे खाली न खेचता हिरवे झेडे दुसरीकडे लावता आले असते; परंतु मग निमित्त मिळाले नसते. शिवजयंतीच्या मिरवणुकीला परवानगी दिल्याचा राग खदखदतच होता. शिवजयतीच्या मिरवणुकीत फारच थोडे मुस्लिम सामील झाले होते हे लक्षात घ्यावयास हवे. एका मंदिरावर चढून शेजारच्या इमारतीवर हिरवा झेंडा लावण्याच्या आगळिकीवरून दगलीची पहिली ठिणगी पडली. मग एका हिंदू व्यापाऱ्याच्या दुकानाला आग लावण्यात आली आणि दंगलीचा डोब उसळला व दीडशेच्यावर जीवाची त्यात आहुती पडली! मात्र ही दगल पूर्वीच्या दंगलग्रस्त भागात न पसरता तिचा जोर भिवंडीबाहेरील खेडेगावात जास्त दिसून आला. थोड्याच अवधीत दंगलीची सर्व सूत्रे दोन्ही जमातीतील गुंडाच्या, समाजकंटकाच्या हाती जाऊन दंगल जातीय राहिली नाही. शेकडो झोपडपट्ट्यांना आगी लावून त्यातील गरीब लोकाना बेघर करण्यात आले. त्यावरून हे कृत्य जातीयतावादी लोकाचे नसून झोपडपट्टीदादा, गुंड, बिल्डर्स याचे होते हे स्पष्टच आहे. या झोपडपट्ट्या जाळताना त्यात हिंदू राहतात का मुस्लिम, याच्याशी जाळणाऱ्याना कर्तव्य नव्हते. या झोपडपट्ट्यात हिंदू नव्हते की मुस्लिमही नव्हते. त्यामध्ये जातपात याच्याशी सबध नसणारे, त्याबद्दल फिकीर न बाळगणारे गरीब लोक होते. भिवडीतील काही दुकाने, हातमाग व दोन्ही जमातीतील जाळपोळीचे काही तुरळक प्रकार वगळता या दंगलीला जातीय म्हणता येईल असा पुरावा सापडत नाही. मी मगाशीच म्हटल्याप्रमाणे शिवजयंतीची मिरवणूक काही लोकांना सलत होती; परंतु त्याचा निषेध म्हणून छोट्या आगळिकीच्या प्रकाराहून आणखी काही करण्याचा त्याचा हेतू नव्हता. तेरा वर्षांपूर्वी भिवंडीत जी भयानक जातीय दगल झाली होती त्या दंगलग्रस्त भागात या वेळेस जवळजवळ शातताच होती. म्हणजेच दंगलीने काही साधत नाही, उलट भरपूर नुकसानच होते याचा योग्य धडा त्या भागातील माणसाना त्या वेळेस मिळाला होता. अन्सारी बागेत काही लोकाना भोसकून जीवत जाळण्यात आले. तो भीषण प्रकार वगळता या दंगलीचे स्वरूप जास्त जातीयतावादी न रहाता तिचे स्वरूप झोपडपट्टीतील गरीब लोकांविरुद्ध झोपडपट्टी-दादा, गंड, समाजकटक असेच राहिले.

पृष्ठ ३१ वर

आहे कोणी हरीचा लाल, जो माझ्या हत्येचा साक्षीदार होण्यास तयार होईल ?

# खांडे

## एक जिवंत साक्षीदार



रमेश देशपांडे

आता जे काही मी ह्या दोन–चार पानांवर लिहिणार आहे, ते जरी तुमच्यासाठी असले, तरी तुम्ही त्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे असा काही माझा आग्रह नाही. काही काही घटनाच मुळी अद्भुतात मोडणाऱ्या असतात, इतक्या की, डोके ठिकाणावर असलेल्या कोणाही व्यक्तीला त्या कल्पित वाटाव्यात. त्यातलीच हीही एक असू शकेल किंवा नसेलही कदाचित् !

मग करू सुरुवात, सांगायला ?

ऐका तर.

'तो' माणूस ज्या ठिकाणी मला भेटला, भेटला म्हणण्यापेक्षा दिसला म्हणणेच जास्त योग्य होईल– तो आमच्या शहरातील प्रमुख चौक होता. मध्यरात्र उलटून गेली होती. त्यात आणखी भर म्हणून आकाशात ढग भरून आले होते. चौकाच्या मध्यभागी नगरपालिकेने रोवलेल्या खांबावरच्या दिव्याने आजूबाजूच्या अंधाराला चिरीत रस्त्यावर प्रकाशाचे एक क्षीण वर्तुळ सांडले होते. त्या वर्तुळाच्या बरोबर मध्यबिंदूवर तो उभा होता. का उभा होता, कोणास ठाऊक. तो तेथे तसा उभा असताना माझ्या ध्यानीमनीही नसताना अचानक चार दिशांनी चार माणसं त्याच्या अंगावर धावून आली आणि त्यांनी आपल्या हातातील धारदार सुरे त्या माणसाच्या पोटात खस्सदिशी खुपसले. अगदी तळापर्यंत. मारेकऱ्यांना आपल्या हातांनी दूर लोटण्याचा प्रयत्न त्याने करून पाहिला; पण त्याआधीच त्याच्या पोटातून लालभडक फवाऱ्यांचे कारंजेच्या कारंजेच फुटू लागले होते. क्षणार्धात मारेकरी चिंब न्हाऊन निघाले. घामाने नव्हे कत्तल करताना कातिलांना घाम फुटत नसतो. ते भिजले ते 'त्या' माणसाच्या रक्ताने. त्याच्या पोटातून सुरे उपसून काढून त्यांनी ते पांढऱ्याशुभ्र रुमालांनी अगदी सावकास पुसले. चार तांबडी पाती पुन: लख्ख होऊन चमकू लागली आणि त्यांचे चार मालक चार दिशांनी निघून गेले.

दोन्ही हातांचे तळवे त्या माणसाने आपल्या खपाटी गेलेल्या पोटावर गच्च दाबून धरले होते; पण त्यामुळे उलट त्याच्या फाटक्या, मळलेल्या सदऱ्यातून ते कारंजे दुप्पट वेगाने उसळू लागले. रक्ताने माखलेले आपले दोन्ही तळवे त्याने मोठ्या

प्रयासाने वर उचलले आणि डोळ्यांपुढे धरले. त्याच्या त्या निस्तेज डोळ्यातून ओसंडणारी असहाय्यता आणि अविश्वासाची भावना माझे हृदय कापत गेली. आपले मरण आपल्याला आपल्याच उघड्या डोळ्यांनी पहावे लागणार ही वस्तुस्थिती स्वीकारण्यास त्याचे मन काही केल्या तयार होत नव्हते; पण ती गोष्ट आता अटळ आहे, ह्याची जाणीव त्याला हळूहळू होऊ लागली.

क्षणभराने तो जमिनीवर कोसळला. मी त्याच्या जवळ गेलो. त्याचे शरीर निश्चल पडले होते. खाली वाकून त्याच्या कपाळावर तळवा टेकला. सुरुवातीला जरी ते जरासे गरम भासले तरी झपाट्याने थंडावत जाणारा स्पर्श कुठे तरी वाचण्यात आलेल्या एका वाक्याची सत्यता पटवीत होता. माणूस मेला तरी थंडगार पडण्यास त्याच्या शरीराला थोडा वेळ लागतो! त्याच्या नाकापुढे बोट धरले. श्वासोच्छ्वास बंद पडला होता. छातीवर हात ठेवून पाहिला, तो त्यातले ठोके प्रतीत होईनात!

माझ्या छातीची धडधड मात्र दुपटीने का चांगली चौपटीने वाढली होती. चौकातल्या त्या वर्तुळाशेजारी उभे असताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली. त्या माणसाची त्याच्या चार कातिलाकडून होत असलेली कत्तल बघत असताना त्याच्या मदतीला धावून जाणे मला केवळ अशक्य होते आणि आता तर ती वेळ टळून गेली होती.

त्याच्याकडे पाठ फिरवन मी घरचा रस्ता धरला. हो, तेथ उभं राहून मी आणखी काय साधणार होतो?

पण तो काही माझी पाठ सोडण्यास तयार नव्हता.

'भाऊसाहेब! भाऊसाहेब! थांबा जरा!' अशी त्याची विनंतीवजा हाक माझ्या कानावर आली. मी थबकलो. वळून पाहिले तो, तो त्या वर्तुळाच्या मध्यभागी मघाशी जिथे मरून पडला होता अगदी तेथेच उभा असलेला दृष्टीस पडला. तुम्ही विचाराल, हे कस शक्य आहे? तो तर मेला होता, म्हणजेच, त्याच्या शरिरातील सारेच्या सारे रक्त सांडपाण्यासारखे वाहून गेले होते, तर मग तो उठून उभा कसा राहील? बरोबर अगदी बरोबर! तुमचा प्रश्न परफेक्टली लॉजिकल आहे; पण तसा तो उभा होता खरा! कसा ते मला सांगता येणार नाही. त्याच्या स्वतःच्याच मुडद्याशेजारी त्याला उभा असलेला माझ्या ह्या दोन डोळ्यांनी मी बघत नसतो, तर अशी एखादी घटना घडणे निव्वळ कविकल्पना आहे, असे तुमच्याप्रमाणे मीही म्हटले असते.

एकेक पाउल उचलीत तो माझ्याकडे येत होता; पण त्याचा मुडदा मात्र तेथेच त्या वर्तुळाच्या मध्यभागी निपचित पडला होता.

अगदी जवळ येऊन तो माझ्या कानात पुटपुटला,

'माझी हत्या होत असताना तुम्ही बघितलीत, हो ना? मुद्दामच तुमच्या साक्षीने मी स्वतःची हत्या करवून घेतली आहे. त्याला काही कारणे आहेत आणि ती तुम्ही ऐकावीत म्हणूनच मी तुमच्या मागे आलो. आज माझ्या आयुष्याची दोरी तुटणं माझ्या नशिबातच होत म्हणा ना! त्याचं कारण कदाचित असे असेल की, माझ्या अठ्ठेचाळीच वर्षांच्या आयुष्यात ज्या ज्या घटना घडल्या, जे जे प्रसंग माझ्यावर गुजरले त्या सर्वांचा मुकाट्याने मी स्वीकार करत आलो. कधी कोणाजवळ तक्रार केली नाही की, कोणाच्या दारी गेलो नाही पदर पसरून. जवानीत असताना माझ्यावर लादल्या गेलेल्या अन्यायाशी झगडण्याचा मी खूप प्रयत्न केला; पण शेवटी लाचार होउन अन्यायापुढे मी मान तुकवीनच ह्याची खात्री होती त्यांना त्यामुळे माझा दुबळा प्रतिकार त्यांच्या दृष्टीने वाझ होता. मला सर्व बाजूनी नाडल्यानंतर, माझ्या बायकामुलांच्या तोंडचा घास ओरबाडून घेतल्यानंतर, माझे पुरे शोषण करून झाल्यानंतर, मला मारून टाकण्याशिवाय त्यांच्यापुढे दुसरा पर्यायच उरला नाही!...'

त्याला काय म्हणायचंय, माझ्या लक्षात येईना. मला समजेना हे 'ते' कोण? आणि 'त्याना' त्याची हत्या करून काय मिळणार होते? एकदा वाटले, हे प्रश्न त्यालाच विचारावेत. त्याशिवाय ह्या घटनेचा उलगडा होणार नाही; पण हिम्मत होईना. खरं सांगू? मी अगदी गर्भगळित होऊन गेलो होतो. जीव मुठीत धरून मी त्याचं म्हणणं ऐकत राहिलो.

'...हां, तर कशाबद्दल बोलत होतो मी, भाऊसाहेब? माझी हत्या, नाही का? तसं थोडंफार इंग्रजी शिकलोय मी. उद्या तुमची इंग्रजी वर्तमानपत्र माझ्या हत्येचे वर्णन 'ए वेल प्लॅन्ड मर्डर' असं करतील. दुसऱ्या एखाद्या निर्मनुष्य स्थळी माझी हत्या त्यांच्याकडून करवून घेणं मला तसं अवघड नव्हतं; पण तसं घडायला नको होतं मला. एखाद्या जिवंत माणसाच्या साक्षीनंच माझी हत्या घडावी, एवढं एकच मागणं होत त्या सर्वसाक्षी पांडुरंगापाशी आणि ते तुम्ही पुरं केलत! त्याबद्दल कोणत्या शब्दात तुमचे आभार मानू मी भाऊसाहेब? तुम्ही मला मघाशी त्या चौकात उभे असलेले दिसलात आणि शांत मनाने मी मरायला तयार झालो!'

'पण त्याआधीच जर तुम्ही कोर्टात...' मी अनवधाने बोलून गेलो.

'अहो, कोर्टकचेऱ्या काय घेऊन बसलात राव? तेथे जाऊन काय मोठासा न्याय मिळणार होता मला? ज्यांनी माझ्या आयुष्याचे मातेरे केले, त्यांचेच यार-दोस्त तेथे बसलेले आहेत, तेच फैसला करणार, कातील कोण आणि कत्तल कोणाची झाली. नाटकातल्या नटाचे डायलॉग डायरेक्टरमंडळीनी त्यांच्याकडून पडदा वर जाण्याआधीच पढवून घेतलेले असतात ना? त्याचप्रमाणे ह्या लोकानी साक्षीदारांच्या जबान्या त्यांच्या तोंडी आधीच कोंबलेल्या असतात आणि त्या त्यांच्याकडून ते इतक्या बेमालूमपणे वदवून घेतात की, तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य माणसांला ह्या जबान्या बनावट आहेत, असा जरासुद्धा संशय येणार नाही. तेव्हा आता मीच न्यायनिवाडा करण्याचं ठरवलय आणि माझ्या कातिलाना सजाही मीच देणार आहे. तुम्ही फक्त माझ्या साक्षीदाराचे काम करायचे. आपल्या समाजातील मध्यमवर्गात तुमचा जन्म झाला

**मला समजेना हे 'ते' कोण? 'त्यांना' त्याची हत्या करून काय मिळणार होते?**

आहे, हे मला माहीत आहे. त्या वर्गातील लोकांच्या पडखाऊ, डरपोक स्वभावाशीही माझी चागली जानपहचान आहे. तेव्हा मी तुम्हाला एक सवलत देतो. उघडपणे तुम्ही माझ्या गुन्ह्याचे समर्थन करावे, अशी अपेक्षा मी करीत नाही. तुमचे विचार बदलून तुम्ही आजपासून माझ्याप्रमाणे विचार करू लागा. बस, तेवढे पुरेसे आहे मला.'

मी संभ्रमात पडलो. हा अनोळखी माणूस सांगतोय तसा विचारात बदल करावा की नाही? का उगाच नसत्या फंदात पडू नये? हो–नाहीच्या अनेक बेरजा–वजाबाक्या मी करू लागलो. बऱ्याच वेळाने जेव्हा भानावर आलो, तेव्हा तो माझ्यासमोर नव्हता. तो कोणत्या दिशेनं निघून गेला असावा ह्याचा काही अंदाज मला बाधता येईना. शेवटी नाइलाजानं मी घराकडे वळलो.

घरी पोहोचलो तेव्हा रात्र सरत आली होती. उजाडेपर्यंत अंथरुणावर पडून राहिलो. झोपेत होतो की जागा होतो, काही आठवत नाही. घड्याळाने दिलेले सात ठोके ऐकले आणि सवयीने दूध आणण्यासाठी घराबाहेर पडलो.

मिल्कसेंटरला जाताना तो चौक ओलांडावा लागतो. चौकात येऊन पहातो तो तेथे चागले एक, दोन, तीन, चार, पाच मुडदे पडलेले!! रस्त्यावरची रहदारी सुरू झाली होती. लोक लगबगीने कामावर, बाजारात निघाले होते; पण प्रत्येक जण त्या मुडद्यांची नजर चुकवीत आपापल्या मार्गी लागला होता. जणू काही तेथे पाच बेवारशी कुत्री मरून पडली होती!

मीही चौक ओलांडून मिल्कसेंटरकडे निघालो. तेवढ्यात मागून कोणी तरी माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्या हाताचा स्पर्श ओळखीचा भासला मला. मी मान वळविण्याच्या आधीच तो कालचा माणूस माझ्या पुढयात येऊन उभा राहिला.

'ही फक्त सुरुवात आहे, बरं का भाऊसाहेब!' एवढे बोलून तो गर्दीत मिसळून गेला.

माझ्या मनात एक शंका आली. मी परत फिरलो आणि चौकापाशी आलो. त्या पाच मुडद्यांकडे बारकाईने बघितल्यावर माझ्या लक्षात आले की, त्यात त्या माणसाचाही मुडदा आहे! आता आली का पंचाईत! ह्याला वरदान तर मिळालेले नाही?

चौकात पाच माणसाचे मुडदे पडलेले आहेत, ही बातमी दुपारपर्यंत सर्व शहरभर पसरली. नाक्या–नाक्यावर जमून लोक त्या घटनेवर चर्चा करू लागले. बसमध्ये, कार्यालयात, पानाच्या ठेल्यावर, उडप्या–इराण्याच्या हॉटेलात, जिथे जावे तेथे 'बेबंदशाही' 'मोगलाई' किंवा अशा अर्थाचे शब्द कानावर पडू लागले. आपल्या डोळ्यांदेखत, दिवसाढवळ्या घडलेल्या चोरी, दरवडा, बलात्काराच्या खऱ्या–खोट्या किस्स्यांची वर्णने लोक चवीने आपापल्या इष्ट–मित्रांना ऐकवू लागले. ऐकणारा आणि ऐकविणारा दोघेही हे प्रकार बंद करण्यासाठी काय उपाय योजिले पाहिजेत, ह्याबद्दल आवेशाने आणि अधिकारवाणीने मतप्रदर्शन करू लागला.

चौकात 'मुडदे पडल्याची' बातमी सायंदैनिकात पहिल्या पानावर ठसठशीत ठशाची हेडलाइन देऊन छापण्यात आली; परंतु त्यात एक गोम होती. तीन कॉलमी हेडलाइन दिल्यामुळे दैनिक अर्थातच हातोहात विकले गेले. त्याखालील बातमी मात्र अगदीच जुजबी होती. चार–पाच कोरड्या वाक्यातच तिची बोळवण करण्यात आली होती. रेडिओवर सध्याकाळी ज्या स्थानिक बातम्या देण्यात आल्या, त्यात तर ह्या घटनेचा उल्लेखही नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळच्या चारापैकी तीन दैनिकांनी ही बातमी छापलीच नव्हती. चौथ्यात ती शेवटच्या पानावरच्या कोपऱ्यात घुसडून देण्यात आली होती– शीर्षकाशिवाय! ती वाचून वाचकांना एवढेच समजले की, त्या पाच मुडद्यांची ओळख अद्याप पटली नव्हती. मला मात्र ती चांगलीच पटली होती. त्यापैकी एकाची हत्या झाली होती–उरलेल्या चौघांकडून. चुकलो, पाचही व्यक्तींची हत्या झाली होती. त्या पाचांपैकी एकाची उरलेल्या चौघानी हत्या केली होती; पण मग ह्या चौघांची कोणी हत्या केली?

पहा, पुनः मी घोटाळ्यात पडलो आहे किंवा असं तर नसेल की, ज्याची प्रथम हत्या झाली त्यानेच त्याच्या चार मारेकऱ्याना नतर यमसदनाला पाठवले? शक्य आहे! तोच नव्हता का मला म्हणाला की, मी स्वत:च आता खऱ्याखोटयाचा फैसला करून माझ्या मारेकऱ्याना सजा देणार आहे म्हणून?

एवढ्या मोठ्या थोरल्या शहरात पाच लोकांची हत्या होणं ही काही अगदीच नवलाईची गोष्ट नव्हती. निदान आजच्या जमान्यात तरी! मी ती एकदोन दिवसात विसरून गेलो असतो–झालं–गेलं गंगेला मिळालं अस म्हणून; पण काही दिवसानी कत्तलाचा एक सिलसिलाच शहरात सुरू झाला. परवा अमक्याचा गळा दाबून खून करण्यात आला, काल तमक्याचे धड वेगळे केलेले शीर उकिरड्यावर फेकून दिलेले आढळले. आज, कोणी सांगावे, ...अशा बातम्यांचे पेवच्या पेव फुटले. त्यांची दखल घेणे वर्तमानपत्रांना आता भागच पडले. तिसऱ्या पानावर का होईना; पण त्यांना प्रसिद्धी मिळू लागली. हेडलाइनीही काहीशा ठळक छापात छापलेल्या दिसू लागल्या. बळी गेलेल्या बहुसंख्य व्यक्ती सुरामारी, पिस्तुलबाजी किंवा तत्सम पेशातील धदेवाईक उस्ताद मडळी होती. त्यामुळे त्यांच्या हत्येने कोणाचे काही वाकडे होण्याची शक्यता तशी एकदरीत कमीच होती, नव्हे नव्हतीच; पण काही दिवसानी एक आणि दोन फितीवाले हवालदारही मारेकऱ्याचे 'टार्गेट' बनू लागले. मग मात्र तमाम पोलिसखाते शहरात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची अगदी काटेकोरपणे शहानिशा करू लागले.

नागरिकांना आता बोलायला दुसरा विषयच उरला नव्हता. दोन व्यक्ती भेटल्या रे भेटल्या की नमस्कार–चमत्कार किंवा दुवा–सलाम वगैरे उपचारांना फाटा देऊन एकदम 'चर्चे'ला हात घालीत, हत्या का, कशी, कुठे, केव्हा, कोणाकडून, कोणत्या हत्याराने झाली किंवा घडवून आणण्यात आली, ह्याबद्दल निरनिराळे तर्ककुतर्क लढविले जात. मारेकऱ्याच्या किंवा मारेकऱ्यांच्या संभाव्य उद्देशाचे किंवा उद्देशांचे अगणित दृष्टिकोणांतून सखोल विश्लेषण करण्यात येई. विश्लेषक कॉलेज–प्राध्यापक असो, मडईतला भाजीविक्रेता असो, तेल, तूप तोलणारा वाणी, एखाद्या राजकीय पक्षाचा 'तिकिटा'कडे डोळे लावून बसलेला उम्मीद-

वार किंवा आणखी कोणी असो. प्रत्येकाच्या कैफियतीची इमारत विविध आधारभूत तत्त्वावर उभी केलेली असायची. त्यात सामाजिक मूल्याचे पतन, कोलमडून पडलेली कायदेयंत्रणा, परदेशी एजटाचा हात वगैरे वगैरे अठरापगड बाबींचा समावेश असे,

शहरातील वातावरण झपाट्याने 'भयमय' होऊ लागले. पेठा-मोहल्ले दहशतीच्या काजळीने अगदी काळवडून गेले. तीन्हीसांजा होण्याच्या आधीच घराघरातून लोक स्वत.ला बदिस्त करवून घेऊ लागले. दारा-खिडक्यावर दोनदोन, तीनतीन कुलप लावला जात. आतून त्याच्या मागे लाकडी, लोखडी, दगडी जो मिळेल तो अडसर आड ठेवला जाई. संध्याकाळी सहा वाजल्यापासूनच पोलीसमडळी रस्त्या-बोळातून गस्त घालीत फिरू लागत. सात वाजेपर्यंत सारे चिडीचिप्प होऊन जाई. मधून मधून त्यांच्या शिट्ट्याचा काय तो आवाज येई तेवढाच. कुत्र्यांच्या रडण्याचा आवाज वगळून.

तशी कायदेशीररीत्या कर्फ्यू अजून तरी जारी केली नव्हती. तरीपण लोक धडधडत्या छातीने, धापा टाकत कामावरून सुटल्यावर आधी घराकडे पळत. कोणी मारेकरी दत्त म्हणून पुढे उभा राहो न राहो; पण एखाद्या झाडमुठ्या हवालदाराशी नक्कीच सामना होई आणि मग एक-दोन दंडुक्याचा प्रसाद मिळाल्याशिवाय कोणाचीच सुटका होत नसे. जरा कुठे नागरी हक्कांवर अतिक्रमण वगैरे पुस्तकी भाषा काढलीत की एकदम 'चला ठाण्यावर!' आणि मग एका आठवड्याची तरी निश्चिती निश्चित!

ते एक असो; पण माझ्या मनात ह्या सर्व खुनाखुनीमुळे जो हलकल्लोळ उडालाय, त्याचे सुसंगत वर्णन करणे फार कठीण होऊन बसलय मला. एकदा वाटते, शहरात रोजच्या रोज धुमाकूळ घालत असलेल्या ह्या हत्याकाडामागे 'त्याच' माणसाचाहात असला पाहिजे, ज्याची प्रथम हत्या झाली होती. दॅट्स राइट, ही मस्ट बी दी रिअल कलप्रिट!... पण नाही. पुनः वाटते, एकदा कायमचा अगदी ठार मरून गेलेला माणूस पुनः पृथ्वीतळावर-आणि तोही नेमका आमच्या शहरात-येऊन अवतरतो आणि रोज एकेक माणूस जीवे मारण्याचा रतीब घालतो, ह्या भूतकथेवर डोळे मिटून आणि डोके गहाण ठेवून विश्वास ठेवणाऱ्या माणसाची मूर्खातच गणना करायला हवी आणि मग 'लेका, स्वप्नात पाहिलेल्या गोष्टीच तू खऱ्या मानू लागलायस. डोकं फिरलंय तुझं विचार करकरून!' अशी स्वतःचीच निर्भर्त्सना मी करू लागतो. तेही खर म्हणा. शहरात हा नरमेधयज्ञ सुरू झाल्यापासून मी आयुष्याबद्दल-माझ्या आणि इतरांच्या अलीकडे फार विचार करू लागलोय, त्यात आणखी ही विचार करण्याची जीवघेणी सवय कशी सुटेल ह्याबद्दलचा विचार निराळाच! ...खैर, तूर्त तरी विचार करण्यापासून सुटका नाही!

...जी घटना नंतर घडली, ती आधीच एखाद्याने-उदाहरणार्थ मी- बघितली, असं घडणे शक्य तरी आहे का?. इम्पॉसिबल! तरी पण...हा, आता आले लक्षात! सकाळी दूध आणायला जाताना चौकात जेव्हा मी ते चार, सॉरी, पाच मुडदे बघितले, तेव्हा त्या भयानक दृश्याने माझे मन इतके झपाटून म्हणजेच हिप्नटाइज होऊन गेले की, रात्री दिवा मालवून झोपेच्या आधीन झाल्यावर मला जे स्वप्न पडले, त्या स्वप्नातच मी 'त्या' माणसाची उरलेल्या चाराकडून कत्तल होत असताना पाहिली आणि स्वप्नातच मी 'त्या'च्याशी बोललो. आणि सकाळी उठल्यावर प्रत्यक्ष पाहिलेली घटना आणि झोपेत पाहिलेले स्वप्न ह्या दोघाचे इतके चमत्कारिक रासायनिक-मिश्रण माझ्या मनात खदखदू लागले की, स्वप्नात घडलेल्या घटनेलाच मी प्रत्यक्षात पाहिलेल्या घटनेचा पेहराव दिलेला असावा...!

... चला सुटलो एकदाचा ह्या उलट-सुलट धाग्यानी विणलेल्या जंजाळातून! कोणाला कसली स्वप्नं पडतील हे तो एक 'कैलासवासी'च जाणे, नाही का? पण मी मात्र कानाला खडा लावलाय. काय वाटेल ते झाले तरी, पुनः म्हणून ही स्वप्नं पडू द्यायची नाही. माझी मनःशांती गमवायची नाहीय मला!

पण माझी ही शांती काही तासांतच एखाद्या तकलादू काचेवर वीट येऊन आदळावी त्याप्रमाणे खळ्ळकन फुटली!

झालं काय की...

सध्याकाळचे आठ वाजत आले होते. माझ्या ब्रह्मचाऱ्याच्या मठीत मी नेहमीप्रमाणे एकटाच सिगरेटचे झुरके आणि बिअरचे घुटके घेत जरा कुठे आरामखुर्चीवर विसावलो होतो. माझे 'ते' विचारचक्र पुनः एकदा चालू झाले होते तोच दरवाजा खटखटला. आठ म्हणजे फार काही वेळ झाली नव्हती. तेव्हा सिनेमा-नाटकाला घेऊन जाण्यासाठी एखाद्या मित्राने माझ्या घरी येणे ही एरव्ही एक सर्वसामान्य गोष्ट म्हणून निकालात निघाली असती; पण आजकाल शहरातील वातावरण इतके तग झाले होते की, ते 'अवेळी' खटखटणे मला जरा खटकलेच.

... का मला तसा, म्हणजे खटखटण्याचा आवाज ऐकल्याचा भास झाला. एक मिनिटानं पुनः दारावर थाप. चागली दणकून मारलेली! नाही, हा काही भास नाही, नक्कीच नाही! उठलो आणि थरथरत्या हाताने दरवाजाला (आतून) लावलेल्या कुलुपात किल्ली फिरवली.

आमच्या चाळीच्या जिन्यातील दिव्याचा फ्यूज नेहमीच उडालेला असतो. ना मालक तिकडे लक्ष देत, ना भाडेकरू. तेव्हा रात्रीच्या अंधारात जिना चढून पहिल्या मजल्यावरच्या माझ्या मठीच्या उंबरठ्यावर येऊन थडकणारी व्यक्ती स्त्री आहे की पुरुष, की आणखी कोणी, ते मला कळायला एखादे मिनिट तरी जावे जावे लागते' त्याशिवाय आणखी अर्धा मिनिटाचा अवधी माझे अधु डोळे मागून घेतात, तो वेगळाच. सागण्याचा मतलब हा की, 'त्या' माणसाची ओळख पटायला मला चागले दीड मिनिट लागले; पण जेव्हा ती पटली, तेव्हा मात्र तोच 'तो' ह्याबद्दल मनात शंका म्हणून उरली नाही. तसं पाहिले तर तो माणूस मला अगदीच काही नवखा नव्हता. उलट त्याच्याबद्दलच तर दिवसभर विचार करकरून माझे डोके पिकून गेले होते. आणि तरीही दार उघ-

**मी उठलो आणि थरथरत्या हाताने दरवाजाला लावलेल्या कुलुपात किल्ली फिरवली**

झल्याबरोबर तावडतोब काही मी त्याला ओळखू शकलो नाही.

अेनी वे, त्याने मला लगेच ओळखले, हे मला दिसतच होते. तो निःसकोचपणे आत आला. ही वॉज ए मोस्ट अनवेलकम गेस्ट; पण त्याला थोपवून धरणे माझ्या शक्तीपलीकडे होते. एका अनामिक भीतीने माझ्या काळजाचा ठाव घेतला. शहरात पडलेल्या खुनाना जर तोच जबाबदार असेल, नव्हे आहेच, तर मग मला 'वरती' पाठविण्यासाठीच तो आला असणार... कम ऑन सर, बी प्रिपेअर्ड फॉर युवर अेंड. असं मी माझ्या मनाला बजावू लागलो. फक्त एका गोष्टीमुळे माझ्या मनाला जरासा दिलासा मिळाला. त्याला जर माझी हत्याच करायची होती, तर त्या दिवशीच करता आली असती. त्यासाठी आज माझ्याकडे मुद्दाम येण्याचे काही कारण नव्हते.

त्याच्याशी काय बोलावे मला कळेना, तोही काही बोलेना. शेवटी धीर करून मी म्हटले,

'आजकाल शहरात ज्या कत्तली...'

'त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही' अत्यंत थंड आवाजात तो म्हणाला, 'ज्याने मला ठार मारले, तोच ह्या कत्तली करतोय. पण ह्या हत्याकांडाची सुरुवात मात्र माझ्या कत्तलीने झाली, हे खरं. त्या दिवशी मी तुम्हाला म्हटले नव्हते का की, तुम्ही माझ्या कत्तलीचे साक्षीदार व्हावे अशी माझी इच्छा असल्यामुळे मी तुमच्या समक्ष माझी हत्या करवून घेण्यास तयार झालो म्हणून ? आठवतं ना तुम्हाला ? आज तुमच्याकडे आलोय ते त्यानंतर घडलेल्या घटनाचा अहवाल सादर करायला. नीट कान देऊन ऐका पहिली मूलभूत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या व दुनियेतील इतर मागासलेल्या देशातील आम जनतेला दोन वेळची भाकरी मिळविण्यासाठी दिवस-रात्र काबाडकष्ट करून जे रक्त आटवावे लागते, त्याचे कारण एका अत्यंत विषम आर्थिक व सास्कृतिक पायावर उभारण्यात आलेली आपली ही समाजव्यवस्था ! ही व्यवस्था नियंत्रण करणारी एकच एक जबरदस्त शक्ती आहे; पण निरनिराळ्या स्वरूपात जनतेपुढे प्रकट होण्याचे विलक्षण कसब तिच्या अगी आहे. एकाच स्वरूपात प्रकट झाल्यास जनतेला आपले अतरंग कळून येईल हे तिला पक्के माहीत आहे. तो धोका टाळण्याच्या सतत प्रयत्नांत असते ती. निरनिराळे राजकीय पक्ष, शैक्षणिक, सामाजिक आणि इतर विविध व्यवसायाचे हितसंबंध जपणाऱ्या संस्था, व कपाळी एखाद्या धर्माचा टिळा लावलेल्या संघटना ही ह्या शक्तीची दृश्य रूपे. परिणामी ह्या देशातील बेघर, भुकेकंगाल लोकांमध्ये भाषावार, जातवार, धर्मवार, प्रांतवार फूट पाडून त्यांच्या निरनिराळ्या गटांमध्ये झुंजी लावून देणे हा तिच्या हातचा मळ होऊन बसतो आणि एकदा का ह्या झुंजी सुरू झाल्या की आपले हे झुंजार लढवय्ये स्वतःच्याच गोरगरीब भाऊबंदाच्या नरडीचा घोट घेऊ लागतात आणि त्यांच्या आयाबहिणींची इज्जत लुटू लागतात आणि ह्या झुंजी ही दुष्ट शक्ती केव्हा लावून देते माहीत आहे आपल्याला ? आपले अस्तित्व धोक्यात आले आहे, अशी जाणीव तिला होऊ लागते तेव्हा ! मग तुम्हा अ गटाच्या लोकांना ब गटाच्या लोकांनी नेस्तनाबूत करण्याचा चग बांधला आहे, असे अ वाल्यांच्या मनात भरवून द्यायचे आणि ब वाल्यांना अ वाल्यांच्या घरादारांना काडी लावून देण्यासाठी भडकावून द्यायचे व अशा तऱ्हेने सर्व समाजात भीती आणि हाणामारीचे वातावरण पैदा करायचे हा तिचा रोजचा धंदा होऊन बसतो. आज आपले सारे समाजजीवनच ज्या विषारी वायूने भरून गेले आहे, तो वायू म्हणजे ह्या हडळीने सोडलेला सर्वनाशक फूत्कार. तुझ्या थोबाडावरचा मुखवटा फाडून मी तुझा मुखभंग करणार आहे असं आव्हान दिलं आहे मी तिला. माझ्या केसालाही ती धक्का लावू शकणार नाही, हे तिला चांगले माहीत आहे. कारण की मी आता मरून गेलो आहे. ती एखाद्या जिवंत व्यक्तीलाच जीवनातून उठवू शकेल. माझ्यासारख्या मुडद्याला नाही ! तेव्हा मी तिला दिलेल्या आव्हानाची पूर्तता करणे आता तुम्हा हाडामासाच्या माणसाच्या हाती आहे. आपल्या मातीशी इमान राखण्याची आण घेऊन तुम्ही जिवंत मंडळी जर एकत्र आलात तरच ह्या शक्तीचा पाडाव तुम्ही करू शकाल. हे सागण्यासाठीच तुमच्या दारी येऊन आज तसदी दिली तुम्हाला भाऊसाहेब ! त्याबद्दल माफी असावी. येतो मी. रामराम !

असं म्हणून तो आल्यापावली निघून गेला.

हतबद्ध होऊन मी उघड्या दरवाजाकडे बघत राहिलो !

सकाळी उठलो आणि पुनः डोक्यात गुंता होऊन गेला. काल रात्री घडलेली घटना खरी का खोटी ? स्वप्नातील घटना वास्तव मानायची की वास्तवात घडलेली एखादी घटना कधी कधी कल्पनातीत अशक्य कोटीतील असू शकते असे समजायचे? का हा असा पिच्छा पुरवतंय माझा हे कोडे ?...

...शहरातील वातावरण कमालीचे स्फोटक बनले आहे. नागरिकांना कशाचीच सुरक्षितता वाटेनाशी झालीय. प्रत्येकाच्या जीवनापुढे जणू मृत्यू *आ वासून उभा ठाकला* आहे. उजाडलेल्या दिवसाची संध्याकाळ पहायला मिळतेय की नाही, ह्याची कोणालाच शाश्वती नाही. गटागटामधील झुंजीना उधाण आलंय. माणसाच्या रक्ताचे मूल्य शून्यावर येऊन ठेपले आहे. ते निदान त्याच्या किमान पातळीवर तरी आणून ठेवावे, असा शक्य तो सर्व प्रयत्न सरकार करते आहे. आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. शहरात बारा तासांचा कर्फ्यू जारी आहे, संध्याकाळी सात ते सकाळी सात. नागरी *व्यवस्था सैन्याच्या हाती सोपविण्यात आली* आहे. कायदेभंग करणाऱ्याचे स्वागत गोळ्या झाडून करा, असे आदेश सैनिकांना देण्यात आले आहेत.

जाळपोळ, भोसकाभोसकी, लुटालूट करणाऱ्या दंगेखोर जमावावर 'शूट अॅट साइट' चा प्रयोग होताना मी रोज बघतोय. ...ती पहा, सूऽऽऽसूं करत! गोळी जमावात घुसतेय आणि क्षणार्धात धाडकन् एखादा जमिनीवर कोसळतोय... अरे, पण हे काय ? माझ्या मनात ही शकेची पाल पुन्हा का चुकचुकू लागलीय ?... माय गॉड, म्हणजे हे सर्व मी स्वप्नात बघितले की काय ?

...माझी स्वप्नं गेली खड्ड्यात ! ज्या माणसाने मला विश्वासात घेऊन ज्या शक्तीचा मुकाबला करायला सागितलाय, तिला खतम् करणं हेच आता माझ्या जीवनाचे अंतिम ध्येय ती जबाबदारी मी पार पाडीन असा विश्वास उरी बाळगून तो माझ्या दारी आला होता. त्या विश्वासाशी बेइमानी करणार नाही मी. मग त्यासाठी मला माझ्या आयुष्याची आहुती जरी द्यावी लागली तरी पर्वा नाही. शहरात चाललेल्या खुनी थैमानामागे कोणती पाशवी, अमानुष शक्ती दडली आहे, ते मी नागरिकाना उद्या त्या चौकात उभे राहून सागणार आहे...

...माझ्या उद्याच्या त्या भाषणाची आरशासमोर उभे राहून मी रंगीत तालीम करतोय...दरवाजा खटखटतो. 'तो' आला वाटते ? बरं झालं. त्यालाच प्रथम माझे भाषण ऐकवावे...

...मोठ्या उत्सुकतेने मी दरवाजा उघडलाय. याव, यावं, अमरबाबू हे माझे शब्द ओठातच विरतायत...

...समोर उभा असलेला माणूस 'तो' नाही. दुसराच कोणी तरी. स्ट्रेंजर, नो, नो ही इज नॉट ए स्ट्रेंजर. हे तर आमच्या शहरातील सर्वांत प्रतिष्ठित, सन्मानित नागरिक. सत्ता, संपत्ती, वैभव याच्या घरी पाणी भरतय. यांना कोण नाही ओळखत ? साऱ्या प्रांतात याच्या नावाचा दबदबा आहे महाराज, आहात कुठे ?...पण इतका मोठा माणूस माझ्या घराची पायधूळ झाडतोय, याचा अर्थ ?...

'सुरेश उनियाल तूच का ?' ते मला दरडावून विचारताहेत.

'होय साहेब!' मी उत्तरतोय.

'मी तुझ्याकडे कशासाठी आलोय, असा प्रश्न तुला पडलाय हो ना ? त्या प्रश्नाचे उत्तर द्यायलाच आलोय मी. तू आणि तुझ्या त्या फडतुस दोस्ताचा मुडदा, तुम्ही दोघं मिळून माझ्याविरुद्ध कट करतोय हे कानावर आलंय माझ्या. तो कट यशस्वी होईल अशा भ्रमात राहू नकोस, बेटया ! खरी झुंज आम्हा दोघात होती. तू त्या हरामखोराची बाजू घेऊन स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतलायस. त्याचे फळ आता तुला भोगावं लागेल ... त्याच्याकडे गमवायला आता काही उरलेल नाही. ज्या वस्तूला माणूस शेवटपर्यंत प्राणपणाने चिकटून रहातो तीही तो गमावून बसलाय–त्याचा प्राण ! पण तुझा मात्र तुझ्याजवळ अजून शाबूत आहे! .. '

आपल्या जाड, मासल बोटांनी माझ्या धडधडणाऱ्या छातीवर टिचकी मारून ते म्हणताहेत.

'इथ लपलाय तो...आणखी दोन मिनिटानी तो तेथे नसेल...तुझ्या छातीची धडधड कायमची बंद करायला आलोय मी... हां, आणखी एक गोष्ट लक्षात असू दे. मेल्यावर आपण आपल्या दोस्ताप्रमाणे आम्हा लोकांविरुद्ध मोर्चे बांधू शकू, अशी स्वप्नं पाहू नकोस. त्याला ते जमले, ते केवळ तुला त्याच्या हत्येचा साक्षीदार बनविण्यात त्याला यश आले म्हणून. माझ्या गफलतीमुळे ते घडून आले. ती गफलत पुनः नाही होऊ देणार मी...तुझ्या हत्येचा कोणी साक्षीदार असणार नाही. मरणाबरोबरच तुझे होते नव्हते ते सर्व अस्तित्व संपलेले असेल, याद रख ! ...'

...खदखदा हसत ते माझ्या अंगावर चालून येताहेत, आपल्या पांढऱ्याशुभ्र धोतराचा सोगा हातात खेळवीत. त्या सोग्याच्या गाठीत माझी मान अडकवून ते माझी हत्या करणार आहेत...

'आय ॲम गोइंग टू डाय ॲन अनसीन डेथ !'...मला एका साक्षीदाराची जरुरी आहे. एका जिवंत साक्षीदाराची !

...आहे तुम्हा वाचक मंडळींपैकी कोणी हरीचा लाल, जो माझ्या हत्येचा साक्षीदार होण्यास तयार होईल ? □

(सुरेश उनियाल यांच्या 'गवाह' या मूळ हिंदी रूपककथेचा स्वैर अनुवाद )


राजहंसची दोन नवी विज्ञान प्रकाशने

## तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय

विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी
—तुम्हाला बिरबल बनवू शकणाऱ्या !

तुम्हाला माहीत हवेत, करता येतील असे अनेक गमतीदार वैज्ञानिक प्रयोग–
—तुम्हाला जादूगार बनविणारे !

आज अंतराळयुगात, साऱ्या विश्वात मानवाने केलेला मुक्त संचार. जो तुम्ही समजावून घ्यायला हवा.
—नाहीतर तुमचा रिप व्हॅन विंकल बनेल !

□

## । विज्ञानेश्वरी ।

परग्रहावरून येणाऱ्या संदेशासारख्या अनेक नव्या गोष्टी तुमचा मित्र बनून तुमच्या कानात सांगणारी !

विज्ञानेश्वरेतील काही अध्याय आहेत–


- झोपा आणि विद्वान् व्हा.
- युरी गिलरला जमाल गोटा मिळतो त्याची गोष्ट
- पिरॅमिडचे गुपीत
- तुमच्या नशिबाचे गणित
- भेदिले सूर्यमंडळा...

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

लेखक : **दत्तप्रसाद दाभोळकर**

**किमत : प्रत्येकी वीस रुपये**

रुपये चाळीस पाठवल्यास दोन्ही पुस्तके घरपोच मिळतील.



# एलेनी

नवऱ्याच्या पाठीमागे खंबीरपणे आपल्या पाच मुलांना वाढवणारी माझी आई ! निकोला जुन्या दुःखद स्मृती आठवत होता.

कशी सुरवात झाली या शोकांतिकेला ? दुसऱ्या महायुद्धात मुसोलिनीचा धुमाकूळ आणि हिटलरची चढाई यामुळं लिया गाव धुमसतच राहिलं.

एलेनीप्रमाणे सर्व गावकऱ्यांना भूक होती शांततेची.

जर्मन सत्तेच्या अंधःकारातून बाहेर पडण्यासाठी क्रांतिकारक संघटना स्थापन झाल्या होत्या. हे नवं वारं आशादायक वाटत होतं.

कम्युनिस्ट क्रांतिकारक मुक्तीचा संदेश देत होते; पण एलेनीसारख्या सामान्य गावकऱ्यांची स्थिती काय होती ? सुरक्षिततेसाठी अमेरिकेत जावं की इथेच रहावं ? –एलेनीची द्विधा मनःस्थिती झाली...

□


मूळ लेखक : निकोलस गेग

अनुवाद : सुधा नरवणे


भाग : तीन

नोव्हेंबरअखेर लढाईनं असं वळण घेतलं की, क्रांतिसेना पुन: लियामध्ये घुसली. आणि दैनंदिन जीवन आमूलाग्र बदलून गेलं. प्रोकॉपी स्केव्हिसचा भाऊ स्पिरो याच्या नेतृत्वाखाली क्रांतिसेनेनं लियात प्रवेश केला. क्रांतिकारकांच्या एकूण सैन्यातली एक पलटण इथे आली. यात एलास संघटनेचे पुष्कळ कार्यकर्ते होते; पण आता हे सैन्य पूर्णपणे ग्रीक कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणाखाली होतं. हा पक्ष आपली तत्त्वं, ध्येयधोरणं याबाबत अगदी कडव्या वृत्तीचा होता. काडीचाही विरोध त्याना खपत नसे.

या क्रांतिसेनेनं गावोगावी अगदी धुमाकूळ घातला. कोणत्याही घरात बिनदिक्कतपणे शिरावं, काहीही मागावं, कधी ब्रेड तर कधी लाकूडफाटा...तर कधी रात्रभर आश्रय मागावा...आणि मागणं हा जणू आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशा भावनेनं वागावं. हळूहळू प्रत्येक घरात एकेका क्रांतिसैनिकानं ठाण मांडलेलं दिसून यायला लागलं. एलेनीकडे एलियास गागास या शिक्षकाचं कुटुंबच्या कुटुब राह्यला आलं. दोघं नवराबायको आणि तीन मुलं. दोघी मोठ्या मुली आणि एक मुलगा इतक्या सगळ्यांना जागा करून देण्यासाठी तिनं आपल बिन्हाड दोन खोल्यांत हलवलं. एका खोलीत सैंपाकघर अन् बाजूची खोली बसाय्-उठायसाठी–

गागासकडं काम देण्यात आलं होत गावातल्या दहा वर्षांच्या मुलांना गोळा करायचं आणि शिकवायच. निकोलाला रशियन लोकांच्या गोष्टी ऐकायला आवडे. शाळेच्या भिंतीवर स्टॅलिन, मार्क्स आणि ग्रीक कम्युनिस्ट नेत्याचे फोटो लावले होते. त्यांच्यासमोर उभं राहून वीरश्रीयुक्त गाणं म्हणायचं...चला–चला–पुढे चला–शस्त्र घेउनी चला...

सदैव सैनिका तुला पुढेच जायचे.

...क्रांतिकारक लिया गावात आल्यापासून एलेनीनं ओल्गाला आणि तिच्या पाठच्या काताला दोघींनाही तोंडावर काळा रुमाल बांधायची सक्ती केली. श्वासासाठी नाक आणि पाहण्यासाठी डोळे तेवढे उघडे ठेवायचे. ग्रीक स्त्रियांनी याच पद्धतीनं शतकानुशतकं आपल्या सौंदर्याचं रक्षण केलं होतं. कांताचा चेहरा मूळचा फिकटच होता; पण ओल्या तारुण्यानं आणि लावण्यानं ती मुसमुसली होती. गालावर लालजर्द सफरचंद होती. एलेनी तिच्या गालाना राख फासायची. जरा लाली कमी करायचा प्रयत्न...

क्रांतिसेनेचा गावात प्रवेश झाल्यानंतर अनेक गावकरी गाव सोडून पळून गेले होते. यात एलासच्या समर्थकाचाही समावेश होता. स्पिरो स्केव्हिसन या 'देशद्रोह्या'ची घरंदारं जाळून त्यांच्या कुटुंबांना निराधार करून त्याच्यावर सूड उगवला. एलेनीचे वडील गाव सोडून निघून गेले तर क्रांतिकारकांनी तिच्या आईला–मेगालीला–मारहाण केली. या प्रसंगानंतर ती कमालीची घाबरली आणि आपल्या मुलाकडं राह्यला आली. एलेनीची बहीण नित्सा–हिचा नवराही असाच पळून गेला अन् क्रांतिकारक तिला सारखे धमक्या द्यायला लागले. मग भेदरून जाऊन तीही एलेनीकडे राह्यला आली. आता एलेनीच्या घरात तीधरून तिघी मोठ्या बायका आणि पाच मुलं इतके लोक झाले. सैंपाकघराची औडक–चौडक जागा. तसेच दाटीवाटीन सगळेजण झोपत...

गावात प्रत्येकालाच या ना त्या तऱ्हेचा छळवाद सोसावा लागत होता; पण एलेनीच्या मनात शंका येई की, आपल्यावर कुणी तरी विशेष आकस धरून आहे.

डिसेंबर महिन्याच्या प्रारंभी एकदा एक क्रांतिसैनिक पावसानं ओलाचिंब होऊन तिच्या दारात आला न् म्हणाला, 'येऊ का आत ? अंग कोरड करतो अन् पाऊस उघडला की जातो–'

एलेनीनं दयार्द्र बुद्धीनं त्याला आत घेतलं शेकोटीपाशी अंग वाळवीत उभा असताना त्यानं सोनेरी फ्रेममधला ख्रिस्तोसचा फोटो पाहिला. त्याच्या प्रश्नार्थक मुद्रेकडे पाहून ती म्हणाली,

'हा माझा नवरा–अमेरिकेत असतो–'

'अमेरिका ! हं...पहा पहा ती सोनेरी फ्रेम कामगाराचं रक्त शोषून भांडवलदारानी ती तयार केली असेल. दुसरं काय ?

एलेनीन हा क्षुल्लक प्रसंग मनातून काढून टाकला; पण काही दिवसानी एक क्रांतिसैनिक आला अन् तिच्या घराचा तलाश घेऊ लागला...'बघतो..:इथं बंदुका आहेत का... काहीच आक्षेपार्ह सापडेना तेव्हा जाताना तुच्छतेनं एलेनीला ए अमेरिकन मड्डम असं संबोधून निघून गेला. असले प्रसंग तिला बेचैन करून सोडत. या सर्वांमध्ये आणि आपल्यामध्ये एक भिंत उभी राहिलीय असं तिला सारखं वाटत राही. का म्हणून या लोकांनी माझ्या घरात बंदुका शोधाव्यात ? कोणी चहाडी केली माझी ? का ही माणस माझ्यावर दात धरून आहेत?

थोड्याच दिवसांत क्रांतिकारकांची एक महिला–सेना लिया गावात आली. गावात एकच गडबड उडाली. त्या महिलासेनेत १४ वर्षांपासून २५ वर्षांपर्यंतच्या मुली होत्या. खांद्यावर बंदुका आणि अंगात पुरुषाचे जाडेभरडे कपडे. गावकऱ्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. लेफ्ट-राइट करणाऱ्या त्या पोरींकडं पाहून त्यांनी आश्चर्यानं तोंडात बोटं घातली !

ही परेड एलेनीच्या घरापाशी थांबली. त्यांना विश्रांती घ्यायला सांगण्यात आलं. एलेनी एका मुलीपाशी गेली. तिचा बालिश गोबरा चेहरा पाहून एलेनीच्या हृदयात वात्सल्य दाटून आलं. तिनं विचारलं.... तुला लढाईची भीती नाही वाटत ?...आणि तुझ्या आईला काय वाटत असेल ? किती काळजी करीत असेल ती ?'

आपले काळेभोर डोळे एलेनीवर रोखत ती म्हणाली, '...माझ्या आईला परवानगी देण्यावाचून दुसरा पर्यायच नव्हता...'

एलेनीच्या अंगावर शहारे आले. आपल्या ओल्गाला कुणी जबरदस्तीनं सैन्यात नेल तर काय होईल ?...त्या क्रांतिसैनिकाच्या खांद्याला खांदा भिडवून लढायचं...रात्री एकाच ठिकाणी झोपायचं– हरे राम ! भयंकर–फारच भयकर आहे हे.. एक वेळ, आपल्या मुलीचे हातपाय मोडून ती अपंग झालेली परवडली; पण धडधाकट आहे म्हणून सैन्यात जाणं नको !...तिच्यावर बलात्कार होण्यापेक्षा मेलेली परवडली !

...या कल्पनेनं तिच्या मनात मूळ धरलं ...ओल्गाला जर चालायलाच आल नाही तर क्रांतिसैनिक तिला सैन्यात भरती करणारच नाहीत...आता असं कराव... ओल्गाच्या पायावर उकळतं पाणी टाकावं आणि सांगावं त्याना, की अपघातानं पाय भाजलाय् तिचा. ती कशी चालेल ?

...एलेनीनं स्टोव्हवर पाणी उकळायला ठेवलं...पाणी ओतल्यावर नक्कीच वेदना होणार...त्या वेदनांच्या किंकाळ्या बाहेर



पडू नयेत म्हणून तोंडात कोंबण्यासाठी एक फडकं ओल्गाच्या हातात दिलं. शेजारा-पाजाऱ्यांच्या कानी एवढासुद्धा आवाज जाता कामा नये. या कानाचं त्या कानाला कळता कामा नये. एलेनीनं सर्व दक्षता घेतली. ओल्गाचा उजवा पाय उघडा करून स्टुला-वर ठेवला.

एलेनीनं उकळत्या पाण्याचं भांडं हातात घेतलं...स्वतःचे डोळे मिटले...

...त्या वेळी मीही माझी मूठ तोंडात कोंबली होती...

...आमच्या आईनं मोठ्ठा श्वास घेतला आणि उकळत्या पाण्याचं ते भांडं ओल्गाच्या पायावर पालथं केलं. मावशीनं ओल्गाचा पाय घट्ट धरून ठेवला होता. एक क्षण संपूर्ण शांततेत गेला...आणि मग मात्र तोंडात कोंबलेल्या बोळ्यामधूनसुद्धा ओल्गाच्या किंकाळ्या बाहेर यायला लागल्या...छप्पर फोडून जायला लागल्या. एखाद्या कोकराच्या अंगावर खाटकाची सुरी पडताना ते जसं किंचाळेल तशी ओल्गा किंचाळली-पाषाणाला सुद्धा पाझर फुटावा अशी...

आम्ही सर्वजण तिच्या पायाकडं एकटक बघत होतो. ओल्गा डोळे पुसत होती. आईनं आणि मावशीनं एकमेकींकडं अर्थपूर्ण नजरेनं पाहिलं...त्यांचा हा बेत फसला होता. ओल्गाचे पाय चालून चालून इतके निबर आणि राकट झाले होते का उकळत्या पाण्या-मुळं त्यांना हवी तशी इजा झाली नाही. जेवढं भाजलं होतं तेवढ्यामळं तिला संर-क्षण मिळालं नसतं. क्रांतिकारक तिला केव्हाच घेऊन गेले असते.

...आई निराश झाली, पोटच्या मुलीवर असला अघोर प्रकार करूनही इच्छित परिणाम न साधल्यानं ती अधिकच व्यथित झाली...तिची नजर शेकोटीकडं वळली. शेकोटीतला जाळ आणि निखारे सारखे करण्यासाठी असलेल्या सळईकडं ती एक-टक बघू लागली...नव्या निर्धारानं एलेनी शेकोटीपाशी गेली. तिनं ती सळई चांगली इंगळासारखी लाल केली आणि ओल्गापाशी आली...ओल्गा आतल्या आत रडत होती. तिच्या दृष्टीला दृष्टी भिडताच आईचं अव-सान गळालं. हातातली तापती सळई टाकून देत ती उद्गारली...'माझ्याच्यानं नाही होणार हे !...'

माझी आजी उठली. शांतपणानं म्हणाली, 'आण ती सळई इकडं– तुला जमत नसेल तर मी करते हे काम... ओल्गाला वाचवा-यचं असेल तर हे काम कुणी तरी केलंच पाहिजे– मन कठोर करायलाच हवं !...'

आजीनं सळई घेऊन पुनः शेकोटीत खदिरांगारासारखी लाल तापवली. आजी जवळ येताना पाहून ओल्गा मागं मागं सरकायला लागली तर मावशीनं तिला घट्ट धरून ठेवलं...लालजर्द सळई...ओल्गाचा तळवा... जळणाऱ्या मांसाचा चुर्रचुर्र आवाज...ओल्गाची हृदय पिळवटून टाक-णारी किंकाळी आणि आईचं आतडं पिळ-वटून टाकणारं विव्हळणं...

...आजीनं सळई दूर टाकली....... ओल्गाच्या पायाला पट्टी बांधली.

... ओल्गाचा पाय भाजल्याची बातमी क्रांतिसैनिकांपर्यंत पोचली. त्यांच्या डॉक्टरांनी ओल्गाला तपासलं... त्यांना काहीच शंका आली नाही. ते निघून गेले... एलेनीच्या आनंदाला पारावार उरला नाही... एवढा अमानुष प्रकार केला... पण ओल्गा वाचली.

...पण दुसऱ्याच दिवशी या आनंदाला ग्रहण लागलं. क्रांतिसैनिक पुनः आले नि त्यांनी आदेश दिला... 'तुमची दुसरी मुलगी कांता आहे ना ? तिला सैन्यभरती-साठी उद्या तयार ठेवा !...'

एलेनीच्या पोटात गोळा उभा राहिला. रात्री ती कांताला पोटाशी धरून झोपली. तिच्या अंगावरून ममतेनं हात फिरवून स्वतःशीच बोलत बसली... 'केवढीशी चिमुकली आहे माझी बाळी... कसे ते सैन्यात घालायला नेताहेत हिला ?... कांता, सांग त्यांना तू उद्या की, तुला बंदुकीची भीती वाटते म्हणून– अशा घाबरट, भित्रट मुलीला का कुणी लढाईवर पाठवतं ?'

कांता तेव्हा पंधरा वर्षांची होती. तशी ती लहानच दिसायची. तिच्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव होतोय, कुणी तिच्यावर जबरदस्ती करतंय असल्या काल्पनिक दृश्यांनी एलेनी घायाळ झाली. थोड्या वेळानं कांताला झोप लागली. एलेनीनं तिचं सामान बांधून ठेवलं... मग पहाट झाली...

...कांता जागी झाली. तिला वाटलं, रात्री आपल्याला कसलं तरी वाईट स्वप्न पडलं असावं... एलेनीनं तिला हलक्या हातानं आंघोळ घातली. प्रेमानं तिचे केस विंचरले. तिला आपल्या हातानं कपडे घातले. एखाद्या बाहुलीला नटवावं-सजवावं तसा तिचा जामानिमा केला.

सगळ्यां जणी चहा पीत असताना क्रांति-सैनिकांच्या आगमनाची वार्ता थडकली. आरडाओरड, हलकल्लोळ या त्यांच्या आगमनाच्या खुणा... तो ओरडा एलेनीच्या घराजवळ आला.

कांता तटकन् उभी राहिली आणि म्हणाली, 'मी तयार आहे जायला–' एके-कीचा हात हातात घेऊन ती सगळ्यांचा निरोप घेऊ लागली. ओठ थरथरत होते. सर्वांगाला कंप... आपलं सामान उचलून ती बाहेर पडली. दोन्ही बाजूंना क्रांतिसैनिकांनी तिला धरलं आणि तिला मध्ये घेऊन ते टपटप बूट वाजवीत चालू लागले.

पुढं दोन आठवडे लिया गावात सुमारे

ऐशी नव्या रिक्रूटांना प्रशिक्षण देण्यात आलं. रायफली, बंदुका कशा हाताळायच्या, कशा चालवायच्या, नेमबाजी याचा सराव करून घेण्यात आला. हातबॉंब कसे बनवायचे अन् कसे फेकायचे याचं शिक्षण देण्यात आलं दिवसातून दोनदा त्यांचं बौद्धिक घेतलं जाई. कम्युनिस्ट पक्ष आणि क्रांतिसेना याच कार्य, ध्येयधोरण यासंबंधी त्यांना जळजळीत डोस पाजले जात. गवत वाढण्यासाठी तण निपटून काढायला पाहिजे हे तत्त्व त्यांच्या मनात ठसवलं जाई. तण म्हणजे ग्रीक राष्ट्रीय सेना, रक्तशोषक भांडवलदार आणि ख्याली-खुशाली करणारं राजघराणं...

कांताच्या प्रयाणानंतर एलेनीच्या घरातलं ते शिक्षकाचं कुटुंब तेथून हलल आता तिच्या घराच रूपांतर क्रांतिसेनेचं हेडक्वार्टर म्हणून करण्यात आलं त्याचा प्रमुख लेफ्टनंट कर्नल फ्रॅनिस पेट्रिटिस हा होता. बुटका, कुरळ्या केसांचा आणि टापटिपीचा, नीटनेटका राहणारा असा मनुष्य होता. तो वेळी-अवेळी-रात्री-बेरात्री टेलिफोनवरून सतत कुणाला तरी हुकुम सोडीत असे. त्याच्या दमदार आवाजानं एलेनीच्या घरातल्या सर्वांची झोप उडे.

नाताळच्या आधी क्रांतिसेनेच्या हालचालीना वेग आला. 'डाग' या क्रांतिसेनेला सोव्हिएट युनियनच्या पाठिंब्याची आशा होती. त्यांनी जनरल मार्कोस वाफिडिसच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र ग्रीसच्या हंगामी लोकशाहीवादी सरकारची घोषणा केली. लियापासून ऐंशी किलोमीटर अंतरावरचं कोनित्स गाव काबीज करण्यात येऊन ते नव्या सरकारची राजधानी बनवण्याचा त्याचा विचार होता.

१९४७ मध्ये अगदी नाताळच्या दिवशीच कर्नल वाफिडिसनं आपल्या फौजांसह कोनित्सवर हल्ला केला. तिथले लोक लढाईच्या धुमश्चक्रीत सापडले. त्याच दिवशी नव्याने भरती केलेल्या महिला सैनिकांना आणखी प्रशिक्षणासाठी दुसऱ्या गावी पाठवण्यात आलं. त्यांच्याबरोबर कांताही गेली. पाठीवर शस्त्रास्त्राच अवजड ओझं...

प्रशिक्षणाच्या काळात एक दिवस या पोरींबरोबर एक लेफ्टनंट भाषण ठोकत होता. 'आपलं हे ओजस्वी युद्ध कशासाठी चालू आहे तुम्हाला माहीत आहेच. जनरल वाफिडिसनं शत्रूला जेरीला आणलं आहे... कोनित्स गाव अजून ताब्यात यायचंय. पण येईल लवकर... विजयश्री हाताशी आहे.' क्षणभर विसावा घेऊन त्यानं पुनः बोलायला सुरुवात केली. 'आता तुमचं ट्रेनिंग संपत आलंय. आता तुम्हाला लढाऱ्या पलटणीत दाखल केल जाईल अन् आघाडीवर पाठवतील तुम्हाला... ज्याच्या ठायी शक्ती, सामर्थ्य, निष्ठा नसेल त्याना आत्ताच खड्यासारखं बाजूला फेकल पाहिजे... असली पुळचट माणसं आम्हाला नकोत.'

मग त्यानं धडाधडा काही नावं वाचली. त्यात कांताचंही नाव होतं... 'हं — चला— तुम्ही आपलं सामान बांधा. हाकला गाडी आणि जा घरी! ...'

...कांताला वाटलं यात काही तरी डाव असावा. कपट असेल... म्हणून तिनं घरी जायची उत्सुकता दर्शवली नाही. या कारस्थानाला बळी पडू नये म्हणून ती आवेशानं म्हणाली, 'नाही, मला नाही घरी जायच.. मला लढायचंय... मातृभूमीसाठी!...' त्या लेफ्टनंटनं रागारागानं तिच्याकडं पाहिलं, 'तू लहान तर आहेसच— शिवाय मरतुकडी... तुला बंदूकसुद्धा नीट धरता येत नाही. तुझ्या वेंधळेपणान कोनिटसच्या लढाईत एखाद्या कॉम्रेडचा प्राण गेला म्हणजे?'

सैन्यातून काढून टाकलेल्या त्या पोरी लियामध्ये परतल्या. दूरवरूनच एलेनीनं कांताला ओळखलं. ती पळत सुटली. कांताला पोटाशी धरलं. एलेनीचा विश्वासच बसेना. ती पुनः पुनः लेकीला स्पर्श करून बघत होती की, हे सत्य की आभास... कांताचे अश्रू पुसत होती आणि स्वत:चे तसेच वाहू देत होती.

१९४८ च्या पूर्वार्धात लिया गावात सतत तोफांचे धडाडधुम आवाज येत. गाईंच्या गळ्यांतले घंटानाद किंवा सकाळचं कोंबड्याचं आरवण याप्रमाणं ते आवाज गावातल्या वातावरणाचा अविभाज्य भाग बनून गेले होते. जवळच्या डोंगरात क्रांतिसैनिकांनी आपली आश्रयस्थानं तयार केली आणि गावात ठिकठिकाणी बुजगावण्याप्रमाणं आपली ठाणी उभारली. लढाईबद्दल पोरासारांना अतोनात उत्सुकता वाटायची. त्यांचे खेळ सुद्धा लुटपुटीच्या लढाईचे असायचे. मोठ्या माणसांना गंमत वाटणं दूरच राही— भयंकर भीतीनं ग्रासलं होतं ..धडामधुम... आवाज रोजच कालच्यापेक्षा जास्त जोरानं येताहेत असं वाटायचं. जागेपणीची भीती एलेनीला झोपेतही भेडसावू लागली.

एके रात्री तिला स्वप्न पडलं, फाटकाजवळची घंटा वाजतेय— उठून पाहिलं तर चंद्रप्रकाशात आपली दिवंगत सासू उभी... हसतमुख... तिनं एलेनीच्या गालाला स्पर्श केला.. थरथरणारं बोट... भयाच्या शहारा उमटल्या... पण सासूचे शब्द प्रेमळ होते, 'सूनबाई, कशी आहेस तू?... मला मात्र करमत नाही तुझ्याविना तिकडं!... चल, सामान आवरून ठेव— मी लौकरच येईन तुला न्यायला! ...'

जागं झाल्यावर एलेनी त्या स्वप्नाचा विचार करू लागली-काय अर्थ लावायचा या स्वप्नाचा?... मन छिन्नभिन्न झालं. तिची बहीण निटसा तिची समजूत घालायला लागली. तिनं तर हे स्वप्न उडवूनच लावल... 'हॅं... स्वप्नाला कसला आलाय सूचक अर्थ? तू काल जेवताना तळलेला कांदा खाल्लास ना... अपचन झालंय तुला! ...'

क्रांतिसेना आणि नव्या सरकारमध्ये लढाई होणं अपेक्षितच होतं. १९४८ च्या फेब्रुवारी महिन्यात त्याच्या चकमकींना प्रारंभ झाला. ग्रीक सैन्याच्या फौजांनी क्रांतिसेनेच्या उत्तर आणि दक्षिणेकडच्या बालेकिल्ल्यांवर हल्ला केला. त्याना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. या लढाईत मात्र लिया गाव दोन्ही सैन्यांच्या तावडीत सापडलं. दक्षिणेकडून सरकारी फौजा आगे कूच करून यायला लागल्यावर लिया गावात तारांबळ उडाली. लढाईत मार खाल्लेले, दमलेले, कटाळलेले क्रांतिसैनिक माघार घेत डोंगरात जायला लागले.

**जागं झाल्यावर एलेनी त्या स्वप्नांचा विचार करू लागली. काय अर्थ लावायचा त्यांचा?**



सरकारच्या फौजा लिया गावात पोचल्या तर त्यांच्या आधारानं आपल्याला मुलासह निसटता येईल असं एलेनीला वाटायला लागलं. गावात खालच्या आळीला जिथं तिच्या आईचं घर होतं तिथं सबंध कुटुंबाला हलवायचं तिनं ठरवलं. राष्ट्रीय सैन्याच्या मार्गावर शक्य तेवढं त्यांच्या जवळपास रहावं म्हणजे लवकर सुटका करून घेता येईल अशी तिची अटकळ होती.

पण नियतीनं दुसरंच काही योजलं होतं. दुसरे दिवशी ती सामान हलवण्याच्या तयारीत असता एक क्रांतिसैनिक आला अन् उद्धटपणे विचारायला लागला, 'काय ? कुठं निघालात तुम्ही— काय विचार आहे ?'

'कुठं म्हणजे ? माझ्या आईचं घर गावातच आहे. तिथं जाऊन राहू म्हणतो आम्ही— बाँब पडण्याच्या दृष्टीनं ते घर जास्त सुरक्षित वाटतं—'

अगदी हतबुद्ध झाल्यासारखे हातवारे करीत तो म्हणाला, 'इथं आम्ही तळहातावर शिर घेऊन लढतोय अन् तुम्ही नुसत्या शंकेनं घाबरता ? स्वतःची चामडी बचावण्याचा फक्त विचार करता ! सैनिकांना अन्नपाणी लागतं याचा काही विचार ? प्रत्येक कुटुंबाचं कर्तव्य आहे आम्हाला जेवणखाण पुरवणं ... जा—आत जा...रहा याच घरात आणि पहिलं सैपाकाला लागा! ...'

त्याची पाठ वळताक्षणीच एलेनीनं कुटुंबातल्या सर्वांना पुढं पाठवलं अन् आईच्या घरापाशी थांबायला सांगितलं. सैपाक झाला की ती हळूच त्यांना जाऊन मिळणार होती. आजी मेगाली आणि मावशी निटसा यांच्या आधारानं मुलं वाट चालू लागली. वरनं बाँब पडतच होते. मुलं भेदरून एकमेकांना चिकटून वाट चालत होती. मेगालीच्या घरात ती सगळी तळघरात दाटीवाटीनं लपून बसली. सूर्यास्ताच्या वेळी दारावर थाप पडली. ओल्गानं उत्सुकतेनं दार उघडलं तो काय दोन क्रांतिसैनिक हातात बंदुका घेऊन दैत्यासारखे उभे..

'चला चला...आम्ही गावाची ही बाजू खाली करून वर डोंगरात चाललोय— सर्वांनी यायचं तिथं...फॅसिस्ट अगदी वेशीपाशी येऊन थडकलेत. माहिती नाही का तुम्हाला ?... ए...अशी शुंभासारखी उभी काय राहिलीयस ... चला बाहेर पडा सर्वजणी! ...'

शेजारी त्यांच्या स्नेह्याचं—अनास्ताशियाबोस्टारिसचं घर होतं. सर्वानुमते ठरलं की, त्यांच्या घरी आश्रय घ्यायचा. एलेनी नक्की तिथं शोध घेत येईल.

तळघरातून ते सर्वजण बाहेर आले तो सर्वत्र धूरच धूर.. बाँबच्या कर्णकर्कश आवाजानं भूमी हादरत होती. कसेबसे ते बोस्टारिसच्या घरी पोचले. तिथं मात्र त्यांचं आनंदानं स्वागत झालं.

बाँबवर्षाव होत असता एलेनीनं शेजारच्या सैपाकघराच्या खालच्या कोठीचा आश्रय घेतला. बंदुकीचे बार थांबण्याची ती वाट पहात बसली. दिवस ढळल्यावर तासाचा अवधी लोटला. आपल्याला फार वेळ इथं थांबता येणार नाही याची तिला कल्पना होती. आपला काळा स्कार्फ तोंडाभोवती गुंडाळून ती अंधारात बाहेर पडली. सुसाट वेगानं एलेनी आईच्या घरापाशी आली तर ते घर रिकामं ! सैरभैर होऊन ती या घरातून त्या घरात आपल्या माणसांचा शोध घेत फिरायला लागली. ती आपल्या नणंदेच्या घरी पोचली. तिथंही नव्हती तिची माणसं. मनातली प्रचंड खळबळ कशीबशी दाबून एलेनी मागं फिरली.

एकदम तिच्या पुढ्यात काळी आकृती येऊन उभी ठाकली.

'ए, बाई, कुठं चाललीस ?'

'मी...मी... माझी मुलं शोधतेय.' ती आकृती जवळजवळ यायला लागली तेव्हा तिला दिसलं—त्याच्या टोपीवर ग्रीकसेनेच्या मुकुटाची निशाणी होती. तो म्हणाला, 'तुला इथून पुढं जाता येणार नाही. गावाच्या वरच्या बाजूला क्रांतिसेनेनं वेढा घातलाय... या पट्ट्यात बंदुकीच्या फैरी झडताहेत... सकाळपर्यंत थांब. आम्ही गावावर कब्जा मिळवूच...मग कुठं जायचंय ते जा ! ...'

एलेनी मागं वळली. तो सैनिक दूर जाईपर्यंत ती एके ठिकाणी थांबली. आपण त्याच्या दृष्टीच्या टप्प्याआड गेलोय हे पाहून ती डोंगर चढायला लागली. क्रांतिसेनेच्या टापूतून तिनं कसाबसा मार्ग काढला. त्यांच्या गोळीबारातूनसुद्धा तिला दिसला बोस्टारिसच्या घरातला प्रकाशकिरण...धडपत तळघराच्या दाराशी जाऊन तिनं दारावर थापा मारल्या. दार उघडलं गेल्यावर ओल्गाला पाहून एलेनीच्या पायातलं त्राण गेलं. ती खाली कोसळली. कोसळता कोसळता तिनं निकोलाला बाहुपाशात घेतलं.

जराशानं भानावर आल्यावर तिनं सर्वांना एकूण परिस्थिती समजावून सांगितली. 'आता इथून हलणं कठीण आहे. अगदी इथं खालच्या अंगालाच लढाई चाललीय. सकाळपर्यंत ग्रीक सैनिक गाव ताब्यात घेतील... मग जाऊ आपण...'

परंतु त्या रात्री ग्रीक सैन्याची सरशी

होऊ शकली नाही. त्यांचा पाडाव झाला. सकाळ झाल्यावर क्रांतिसैनिक विजयाच्या घोषणा देत गावभर फिरू लागले.

एलेनीचा आशेचा किरण मावळला. गावातून पळून जाण्याचा शेवटचा मार्गसुद्धा खुटला !...'

१९४८ चा मार्च महिना–गावकरी आता कांद्याची आणि पावटयाची पेरणी करायला लागले, तर क्रांतिसैनिक सुरुंगाची पेरणी करायला लागले. मुरगाना विभागात त्यांना असा काही कडक बंदोबस्त करायचा होता की, इकडं बाहेरचा कुणी पाऊल ठेवू शकणार नाही. दारूच्या बाटलीला घट्ट बूच लावावं तसं या विभागाचं प्रवेशद्वार त्यांना पूर्णपणे बंद करायचं होतं. जाण्या–येण्याच्या मार्गावर त्यांनी असा कडक पहारा ठेवला की, आतल्या माणसांना बाहेर जाता येऊ नये नि बाहेरच्यांना आत येता येऊ नये. लिया गावात पहाऱ्यासाठी ठिकठिकाणी चौक्या बसवण्यात आल्या. एक सुरक्षा-पोलीस-ठाणं उभारण्यात आलं. या ठाण्यासाठी त्यांना नेमकं एलेनीचंच घर सापडलं !

त्यांनी तिला चोवीस तासांचा अवधी दिला दुसरं घर शोधायला. आता एकच आसरा होता. माहेरचं घर–आता तिथं जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. एलेनीनं घरातल्या काही वस्तू गोळा केल्या. ख्रिस्तोसचा फोटो काळजीपूर्वक गुंडाळून घेतला. ज्या घरात विवाहानंतरची बावीस वर्षं घालवली त्या घरातून बाहेर पडताना तिचं हृदय शतधा विदीर्ण झालं !

गावात सुरक्षा–पोलीसठाणं उभारण्यात आल्यापासून वातावरणात संपूर्ण बदल घडून आला. कोणत्याही गावात खऱ्याखोट्या अफवा नेहमीच उठत असतात आणि त्या सर्वसाधारणपणे निरुपद्रवी असतात; परंतु पोलिसांच्या अस्तित्वानं त्यांना एक वेगळंच महत्त्व मिळू लागलं. कुणीही चौकीवर यावं आणि काहीही सांगावं-म्हणावं गावात उपासमार होतेय् अन् फलाण्याच्या घरात धान्य आहे की बस्स ! पोलिसांना तेवढंच निमित्त सापडे. दुसरे दिवशी तात्काळ क्रांतिसैनिकांची टोळधाड त्या घरावर छापा घाली अन् त्या साठेबाजाला गिरफदार करून नेलं जाई. अमुक एक व्यक्ती क्रांतिसेनेला सहकार्य देते अशा नुसत्या मोघम बातम्या देणाऱ्या खबऱ्यांना पक्षपाती वागणूक मिळे. एलेनीच्या घराकडं म्हणजे क्रांतिसेनेच्या हेडक्वार्टरवर रोज खबऱ्यांचा ओघ सुरू झाला. सॉटिरिस ड्रेपेटिस नावाचा माणूस सगळं नीट टिपून ठेवू लागला.

आपल्या घरात घडणाऱ्या भयंकर गोष्टी एलेनीच्या कानावर येत होत्या तिनं मुलांना ताकीद देऊन ठेवली की, तिकडं मुळीच जायचं नाही; पण कांताच्या पाठीवरची ग्लायकेरिया फार चौकस होती. जे करू नको म्हणावं ते ती मुद्दाम करायची. एके दिवशी दुपारी ती मागच्या दारानं बाहेर पडली आणि आपल्या घराच्या मागच्या भिंतीपाशी जाऊन पोचली. भिंतीपलीकडे कुणी खड्डे खणतंय असा आवाज तिला ऐकू आला. भिंतीवर चढून तिनं हळूच पलीकडे डोकावून पाहिलं, खड्डे खणणं जोरात चाललं होतं. एक क्रांतिसैनिक एका खड्डयात उभा राहून आतली माती बाहेर टाकत होता. दुसऱ्या टोकाला दोन माणसं–त्यांचे हात मागं बांधलेले.

ग्लायकेरियाला क्षणार्धात कळून चुकलं की, त्यांना ठार केलं जाणार आहे आणि त्यांना पुरण्यासाठी हे खड्डे...सबंध बागभर मातीच माती... ठिकठिकाणी उकरलेलं खड्डयांवर माती चापून–चोपून दाबून बसवलेली–भीतीनं तिची गठडी वळली. ती धूम ठोकून तिथून पळाली.

एलेनीनं ग्लायकेरियाचं बोलणं ऐकलं आणि तिच्या अंगाची लाहीलाही झाली. आपली वास्तु परमप्रिय घर, ते परसू...मानवी प्रेतांना गाडण्यासाठी वापरलं जातंय.

आणि ख्रिस्तोस म्हणाला होता की, क्रांतिसैनिक आपल्या हक्कासाठी लढताहेत ! तिचा त्याच्यावर विश्वास बसला होता.

पण हे तर राक्षसी कृत्य ! पकडलेल्यांना-सैनिकांनाच नव्हे तर निरपराध बायका–मुलांनासुद्धा हे क्रांतिकारक ठार मारताहेत!

एप्रिलच्या प्रारंभी गावात दवंडी पिटण्यात आली. ' ज्यांच्या घरी तीन ते चौदा वर्षांपर्यंतची मुलं असतील, त्या आयांनी तावडतोब चर्चमध्ये यावं ! ' बायका आपापसात कुजबुजत घाबरून चर्चमध्ये गेल्या. कशासाठी बोलावलं असेल? या एकाच प्रश्नानं सगळयांची घाबरगुंडी उडवून दिली. एका महिला क्रांतिसैनिकेनं त्यांना आत बोलावलं...म्हणाली–

'...या...या...लिया गावातल्या मातांनो या, अशा आत या! ...तुम्हाला सावध करायला इथं बोलावून घेतलंय...तुमच्या मुलांना धोका आहे. पक्षनेत्यांना तुमच्या मुलाबद्दल अपार प्रेम आहे...तुमच्या मुलाचं रक्षण करण्याचा मार्ग त्यांनी शोधून काढलाय्. '

एवढं बोलून ती नाटयपूर्ण पद्धतीनं थांबली. आपली शेजारची राष्ट्रं अल्बेनिया, युगोस्लाव्हिया आणि बल्गेरिया–जनतेचं राज्य आहे...तिथं लोकांसाठी लोकांनी बनवलेलं सरकार आहे. तिथं...त्यांनी तुमच्या मुलांचा सांभाळ करायला संमती दिलीय्. या इकड–इथल्या कागदावर सह्या करा अन् बस्स ! मुलाची काळजी संपलीच की मग ! बघा त्यांचं पालनपोषण कसं होतंय ते. त्यांना चांगलं–चुंगलं पौष्टिक अन्न मिळेल. त्यांना चागलं शिक्षण मिळेल. लढाई संपून आपल्या देशात जेव्हा सर्वत्र लाल निशाण फडकायला लागेल तेव्हा तुमची मुलं तुमच्याकडे परत येतील. सशक्त–आनंदी–शिक्षित!'

या ' उज्ज्वल ' भवितव्याचं चित्र पाहून आनंद व्हायच्याऐवजी त्या आयांच्या चेहऱ्यांवर भयाचं झाकोळ पसरलं. त्या एकमेकींकडं बघू लागल्या आणि नकळतच त्यांनी आपली मुलं जवळ पोटाशी ओढली ! ही बया मुलं मागतेय !

तो कराराचा कागद म्हणजे जणू महाभयंकर विषारी सर्प असल्यासारखं त्या तिकडे पाहू लागल्या. भयानं गारठल्या !

मुलं ताब्यात घेण्याची ही योजना म्हणजे एक नुसता नाटकीपणा होता. क्रांतिसैनिकांना जगाला असं भासवायचं होतं की, ग्रीसच्या सशस्त्र दलाकडून मुलकी नागरिकांना धोका आहे. यावरून त्यांना आंतरराष्ट्रीय सहानुभूती मिळवायची होती. शिवाय मुलांना ताब्यात घेतलं की, आपोआपच पालक

**तो कराराचा कागद म्हणजे महाभयंकर विषारी सर्पच असल्यासारखं त्यांना वाटलं !**

ताब्यात राहतील. मुलं आपल्या ताब्यात आली की, त्यांना साम्यवादाची तत्त्वं कोळून पाजायची आणि भावी काळासाठी याच विचारसरणीचे क्रांतिसैनिक तयार करायचे, हाही त्या योजनेचा भाग होता.

ती क्रांतिसैनिक-महिला आवेशानं बोलतच होती...'हं आता तुम्ही आपापल्या मुलांची नावं आणि वयं सांगा. महिनाभरात त्यांना त्यांच्या नव्या घरी नेलं जाईल. त्यांच्या उज्ज्वल आयुष्याला सुरुवात होईल. चला पटापट आटपा!'

कुणीच पुढं येईना.

'का ग बायांनो? अशा सांशक का होता? मागंपुढं का पाहता? आता वेड्या मायेनं मुलांना स्वतःच्या पदराशी बांधून ठेवाल आणि त्यापायी ती मारली जातील!' एका बाईकडं वळून तिनं विचारलं.

'भीतिमुक्त जीवन जगण्याची संधी तू तुझ्या मुलाला देणार नाहीस का?' ती माता पोटतिडिकीनं उद्गारली, 'जळो ते भीतिमुक्त जीवन! आम्ही नाही आमच्या मुलांना दूर पाठवणार!'

त्या बाईनं तिच्याकडं रोखून पाहिलं आणि कागदावर काही तरी लिहिलं. त्या मातेच्या पोटात गोळा उभा राहिला. अखेर दोघीजणी पुढं आल्या. एकजण निष्ठावान कम्युनिस्ट होती तर दुसरीनं आपलं घर क्रांतिसैनिकांनी जाळून टाकलेलं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलं होतं. मुलं उपासमार सोसत होती. बाकीच्या बायका निःस्तब्ध उभ्या होत्या. क्रांतिसैनिक बाईनं त्यांना सांगितलं, 'जा घरी जा आणि शांतपणे विचार करून परत या. आपल्या मुलांचं हित कशात आहे हे तुम्हाला विचारांती निश्चितच कळेल!'

त्यानंतर क्रांतिसेनेचे कार्यकर्ते घरोघर जाऊन प्रचार करायला लागले. मोहीमच उघडली त्यांनी. तरीही फक्त दहा–बारा बायका तयार झाल्या आपली मुलं त्यांच्या हवाली करायला.

एक दिवस निकोला शेतातून हिंडत असता त्यानं दोघा क्रांतिसैनिकांचं बोलणं लपून ऐकलं. घरी येऊन आईला सांगितलं. लौकरच सगळ्या मुलांना जबरदस्तीनं ताब्यात घेतलं जाणार हे ऐकून एलेनीला मोठा धक्का बसला. धाकट्या दोघांना क्रांतिसैनिक घेऊन जाणार. दुसऱ्या देशात पालनपोषणासाठी पाठवणार. मोठ्या मुलींना महिलासेनेत भरती करून घेणार. कम्युनिस्टांना शरण जाऊन आपण काय मिळवलं? आता संधी साधलीच पाहिजे. हा सगळा उत्पात घडण्याआधी मुलांना घेऊन या व्याप्त प्रदेशातून निसटलं पाहिजे. काहीही करायचं; पण पळून जायचं धाडस केलंच पाहिजे. जायचं तर सर्वांनी मिळून निसटायचं!

ती निकोलाची समजूत घालू लागली. शांतपणे मायाळू आवाजात 'नाही रे राजा, मी तुला कुठं पाठवणार नाही. कुणाच्या स्वाधीन करणार नाही. कुणीही तुला माझ्यापासून तोडू शकणार नाही!'

निकोलाची दृष्टी आईच्या मुखावर खिळली होती. त्याच्या मनात आईबद्दल अपार प्रेम आणि विश्वास उत्पन्न झाला.

आई आपलं निश्चितच रक्षण करील. तिच्या मायेच्या पदराखाली आपण सुरक्षित आहोत. ... उत्फुल्ल मनानं, आनंदानं उड्या मारत तो खेळायला गेला!

(क्रमशः)




## सहा साहित्यकारांचे वाङ्मयीन जीवनदर्शन

वि. शं. पारगावकर

'सहा साहित्यकार' हे डॉ. सु. रा. चुनेकर यांचे नवे पुस्तक. त्यात हरिभाऊ आपटे, केशवसुत, कृ. प्र. खाडिलकर, रा. ग. गडकरी, माधव जूलियन आणि वि. वा. शिरवाडकर या सहा साहित्यिकांवरील रसग्रहणात्मक लेख आहेत. या ग्रंथात या सहा साहित्यिकांची निवड त्यांनी मनाशी कोणता विशिष्ट दृष्टिकोन ठेवून केली याविषयी या पुस्तकातील त्यांच्याच भूमिकेतील स्पष्टीकरण असे : गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या कारणांनी लिहिलेल्या माझ्या काही लेखांचा हा संग्रह आहे. अर्वाचीन मराठी साहित्यातील काही प्रमुख साहित्यिक एवढेच या संकलात्मक लेखांचे स्वरूप दिसते.

यात हरिभाऊ आपटे हे श्रेष्ठ तसेच मराठीतील विशेषार्थाने आद्य कादंबरीकार, तसेच काव्यातील केशवसुत, नाटकातले खाडिलकर सर्वार्थाने नव्हे, गडकरी, माधव जुलियन आणि शिरवाडकर यांची या ग्रंथातील स्थाने वाङ्मयीन संदर्भ या दृष्टीने नेमकी काय आहेत याचा बोध होत नाही. तरी अर्वाचीन मराठी साहित्यातील काही प्रमुख एवढे या लेखकांचे वैशिष्ट्य मान्य होण्यास हरकत नाही. मात्र एवढे गृहीत धरूनही रसिक मनाला एक गोष्ट खटकते ती ही की, या रचनेत बालकवींचा अंतर्भाव होणे आवश्यक होते. ज्या निसर्गसौंदर्याची जाणीव केशवसुतांच्या कवितांमधून प्रत्ययाला येते, तिचे अधिक नेमके आणि तितकेच निरागस स्वरूप पुढे बालकवींच्या कवितेतून प्रत्ययाला आलेले आहे. या जाणिवेच्या, तिच्या चित्रणाचा, तिच्यातून व्यक्त होणाऱ्या सौंदर्याचा आणि तीमधून प्रतीत होणाऱ्या अर्वाचीन कवितेच्या एका विशिष्ट आणि महत्त्वपूर्ण अंगाचा मागोवा घेण्यास मदत झाली असती. केशवसुतांचं व्यक्तिमन आणि त्यांचं कविमन या दोहोंचाही आविष्कार त्यांच्या काव्यामधून झालेला दिसतो, त्या आविष्काराचा एक धागा अगदी पुढे नवकवितेच्या प्रवासातून जातानाही दिसतो. त्या धाग्याची एक अर्थपूर्ण रेषा बालकवींच्या कवितेमधून गेलेली आहे.

'हे याटाचे लग्न कुणाचे
साध्या भोळ्या फुलराणीचे,

किंवा

'सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि ध्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे,

बालकवींच्या अशा कित्येक ओळी निखालस निसर्गसौंदर्याने थबथबून येतात आणि रसिक मनालाही सर्वांगी न्हाऊ घालतात. अशी निर्व्याज, निर्हेतुक, निखालस सौंदर्य-

भावना केशवसुतांच्या कवितेत दिसत नाही. त्याच्याविषयी रा. श्री. जोग लिहितात, 'निसर्गाबद्दल आदराची वृत्ती असूनही त्यातील गोष्टीचे सूक्ष्म अवलोकन केशवसुत करीत होते असे मात्र वाटत नाही. निसर्गातील वस्तूंचे रूप (रंग), नाद, गंध, रस व स्पर्श या गुणांनी युक्त असे वर्णन ते क्वचितच करतात.'

केशवसुताच्या निसर्गपर कवितेत केवळ निसर्गवर्णनपर कविता फारच कमी आहेत. निसर्गचित्रणाबरोबरच त्याची कविता मानवी भावभावनांचेही चित्रण करू लागते त्याच वेळेस तेथे निसर्गचित्रणाला- गौणत्व प्राप्त होते. त्याच्या 'पुष्पाप्रत' या कवितेचे उदाहरण घेतले तरी

'पुष्पा ! सुंदर किती तू दिससी !
सौकुमार्य माधुर्यही धरिसी !

एवढेच पुष्पाचे वर्णन आले आहे. त्यानंतरच्या सर्व कवितेतून कविमनच आपल्या भावभावनांनिशी वावरत असताना दिसते; परंतु असे असले तरी निसर्गसौंदर्य हा काव्याचा विषय होऊ शकतो हे केशवसुतांनी प्रथमच आपल्या काव्यातून दाखवून दिले आहे.

चुनेकरांनाही हे मान्य दिसते; परंतु तरीही त्या बाबतीत त्यांच्या मनात थोडा गोंधळ दिसतो. कारण केशवसुतांवरील पहिल्या लेखाच्या सुरुवातीलाच ते कबूल करतात की, 'केशवसुताच्या काव्यनिर्मितीमध्ये 'निसर्गकाव्य' हा काही प्रधान विशेष नव्हे ' पण थोडे पुढे जाऊन ते लगेच म्हणतात, 'केशवसुताच्या कवितेत निसर्ग हा एक गौण उपांग म्हणून किंवा अलंकरण म्हणून येत नाही. तो त्याच्या काव्याशी एकजीव होऊन येतो. निसर्गातील घटना, त्यातील दृश्ये याचा त्याच्या संवेदनशील मनावर जो परिणाम होतो त्याचा प्रतिसाद त्यांच्या निसर्गबद्ध कवितेत उमटतो; पण पुढे ते म्हणतात तेच खरे की, 'त्याच्या (केशवसुताच्या) वैयक्तिक भाववृत्तीशी मिसळून जाऊन त्याचे निसर्गचित्रण येते.' हे सर्व जरी खरे असले तरी मला वाटत आलेले आहे ते हे की, केशवसुताच्या काव्यनिर्मितीचा कल हा प्रामुख्याने निसर्गचित्रणाकडे नसतो. म्हणून ज्या दृष्टीने बालकवींच्या निसर्ग-कवितांचा परिणाम रसिक वाचक मनावर होतो तसा केशवसुतांच्या कवितांचा होत नाही.

इतकेच नव्हे तर बालकवींच्या किती तरी नंतरच्या इंदिरा संत, त्यांना निसर्गकवयित्री म्हणून आपण त्यांच्याकडे पाहात नाही; पण त्यांच्याही कवितेत निसर्ग येतो तो कसा स्वच्छ, निरभ्र आकाशाप्रमाणे

निळ्या मलमलीतुनी गाळुनी, ग्रीष्माचे येऊन
जरी कोवळे प्रहरभराचे, दे चटका तापून
कुणी पसरली तरी अंगणी शुभ्र अशी मलमल
थयथय नाचे ग्रीष्म तिच्यावर उधळित किरणावळ

किंवा

रस्त्याकाठी प्रचंड पिंपळ
पानांची अव्याहत सळसळ
गडद पोपटी हिरवट काळी
पिंपळपाने लाल कोवळी,

या ओळी पाहाव्यात. त्या वाचताना निसर्गाचे तलम पदर मनापुढे उलगडत जातात.

## कवितेचा सांधा बदलला

असे असले तरी केशवसुताच्या वरील समीक्षणात्मक लेख काय किंवा या संग्रहातील इतर कवी, कादंबरीकार, नाटककार याच्यावरील समीक्षणात्मक लेख काय चुनेकर यांनी दर्जेदार परिभाषेतून ते लिहिले असले तरी साहित्यमूल्याचे विवेचन त्यानी एका विशिष्ट परंपरागत दृष्टीचा आधार घेऊनच केले आहे हे स्पष्ट दिसते. ललित साहित्याकडे पाहण्याची आज एक मान्यता पावलेली दृष्टी आहे. त्या दृष्टीचा येथे अभावच दिसतो. पूर्वी ज्या एका विशिष्ट नैतिक, सामाजिक दृष्टीने ललितसाहित्याकडे पाहिले जात होते त्याच दृष्टीचा अवलंब केलेला येथे चुनेकरांच्या लेखनात दिसतो केशवसुत काय किंवा हरि नारायण आपटे काय हे तसे अतिशय वैशिष्टयपूर्ण कवी आणि ललितलेखक आहेत. या दोन्ही लेखकाकडे जुनी परंपरा मोडून नवी निर्माण करण्याचे श्रेय जाते. त्या दृष्टीने त्या लेखनाचा, त्यांच्या वृत्तीचा, त्यांच्या कलामनाचा मागोवा घेणे युक्त ठरले असते.

केशवसुतांनी 'तुतारी' किंवा 'नवा शिपाई' सारख्या कविता लिहिल्या म्हणून ते अर्वाचीन मराठी कवितेचे जनक ठरत नाहीत तर जुन्या-नव्या कवितेच्या संदर्भात त्यांच्या मनात जे अनेक प्रश्न निर्माण झालेले असतील (झालेले होते) त्या प्रश्नांना ते कसे सामोरे गेले हे त्यानी लिहिलेल्या नव्या कवितांच्या संदर्भात पाहता येण्याला महत्त्व आहे. पूर्वीची संत–पंतांची कविता कोणत्या लक्ष्मणरेषेत गुंतून पडली होती, नवीन निर्माण होऊ घातलेल्या काळात नव्या कवितेचे रूप काय असावे, तिचे बाह्यरूप तसेच आंतररूप हे पाहण्याचा जो द्रष्टेपणा केशवसुतांजवळ होता त्यामुळे खरे तर केशवसुत मोठे कवी ठरतात आणि हा मुख्य धागा पकडून केशवसुत आणि त्यांच्या कवितेचे मूल्यमापन व्हायला हवे.

अध्यात्म, तत्त्वचिंतन, परमार्थ, धर्मप्रवणता यांचे एक विश्व आहे. या विश्वाशी कलेला काही कर्तव्य नाही. म्हणजे अध्यात्मविचार, धर्मविचार, तत्त्वज्ञानात्मक विचार हे कलेच्या प्रांतात त्या त्या स्वरूपात येऊ शकत नाहीत. कलेचा संबंध मानवाच्या भावविश्वाशी आहे. भावजीवनाला सौंदर्याचा आकार देणे हे कलेचे मुख्य कार्य आणि हाच कलेचा हेतु. हे सर्व लक्षात घेऊनच कलेकडे पहायला हवे. केशवसुतांचे महान कार्य म्हणजे त्यांनी तत्कालीन समाजाच्या भावजीवनाला आपल्या कवितेचा विषय बनविण्याची खटपट केली. त्यानी समाजजागृती वगैरे काही केली असे मला वाटत नाही. अर्वाचीन कवितेचे खरे रूप पाहता यावे किंवा तिला तसे रूप देता यावे म्हणून प्राचीन कवितेचा त्यानी सांधा बदलला. म्हणजे त्यांनी काव्याच्या प्रांतात क्रांती केली. तत्कालीन तत्त्वविचाराच्या, राजकीय विचारांच्या किंवा सामाजिक वगैरे विचाराच्या प्रांतात क्रांती केली असे समजणे म्हणजे केवळ त्यांच्यावरच अन्याय करण्यासारखे नाही तर त्यांच्या काव्यावर देखील अन्याय करण्यासारखे आहे.

त्यानी आपल्या काव्यासाठी निवडलेला भावाशय, त्याला सौंदर्यमय रूप देण्यासाठी निरनिराळया प्रतिमांचे बांधलेले आकृतिबंध, पूर्वीची कविता ज्या छंदांतून, वृत्तांतून वगैरे बांधिली जात होती त्यापासून तिची केलेली मुक्तता हे सारे केशवसुतांनी केले आणि यातच त्यांचे मोठेपण आहे. इतकेच नव्हे तर

त्यांचे व त्यांच्या कवितेचे मूल्यमापन याच दृष्टीने व्हायला हवे. त्यानी अर्वाचीन कवितेच्या भाषेच्या बाबतीत देखील बराच विचार केला होता याचाही विचार होणे आवश्यक आहे. असे हे सर्व पाहता चुनेकरांनी केशवसुतांवर आपल्या पुस्तकात जे तीन लेख लिहिले आहेत त्यामधील ऐतिहासिकतेचे महत्व लक्षात घेऊन देखील केशवसुतांच्या काव्यावर खरा न्याय झाला आहे असे वाटत नाही.

जी गोष्ट आद्य अर्वाचीन कवीच्या बाबतीत घडली तीच त्यांच्या हातून मराठीतील आद्य कादंबरीकार ह. ना. आपटे याच्या बाबतीत घडलेली आहे असे म्हणावेसे वाटते. या संदर्भातच चुनेकर आपल्या पुस्तकातील पान २५ वर हरिभाऊंच्या कलांच्या संदर्भात काय म्हणतात ते पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, 'हरिभाऊंचे खरे सामर्थ्य आणि त्यांच्या खऱ्या मर्यादा यांचा शोध हरिभाऊंनंतर मराठी कादंबरीला जे अनिष्ट वळण लागले (कोणते अनिष्ट वळण लागले?) ते टळले असते. त्याचे सामर्थ्य ओळखून जर त्याचा नंतर येणाऱ्यानी विकास केला असता (कोणता विकास केला असता? तंत्रविषयक, घाटविषयक, कलाविषपत्तीविषयक का आशयविषयक?) तर मराठी कादंबरी आज आहे यापेक्षा फार पुढे गेले असती, तिच्यात वेगळेच सामर्थ्य आले असते.'

चुनेकरांचे हे विधान जेवढे विवाद्य आहे, तेवढेच ते असंदिग्धही आहे असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

आधुनिक मराठी कादंबरीचा इतिहास हा काही फार पुरातन नाही; परंतु तो इतिहास चुनेकरांना वाटतो तेवढा निराशाजनक तर खासच नाही. हरिभाऊंनंतर मराठी कादंबरीचा प्रवास अनेक वळणांवरून झालेला आहे, हे अगदी वरवर विचार करता देखील कोणालाही पटण्यासारखे आहे. कलेच्या द्वारे ज्या सामाजिक, नैतिक, राजकीय अथवा तत्सम आदर्शांचा उत्कर्ष व्हावा आणि तीच कलेची खरी फलश्रुती आहे असे मानणारा एक मोठा वर्ग मराठी साहित्याचा विचार करणाऱ्यांत गुंतलेला आहे. त्यांची ललितसाहित्याकडे पाहण्याची दृष्टी विशुद्ध नाही हे तर उघडच आहे; परंतु अशा दृष्टीने ललितसाहित्याकडे पाहण्यात काय धोके असतात हे त्यांच्या लक्षात येत नाही ही खरी शोकांतिका आहे!

हरिभाऊ निश्चित श्रेष्ठ कादंबरीकार आहेत याविषयी दुमत होण्याचे कारणच नाही; पण त्याचे श्रेष्ठत्व नेमके कशात आहे हे ओळखण्यात ज्या गफलती होतात तेथेच खऱ्या समीक्षेची मख्खी आहे! शेवटी ललितसाहित्याचा विषय जीवनदर्शन आणि जीवनचित्रण हाच आहे; पण त्याचबरोबर ललितसाहित्य ही एक कला आहे. म्हणून जीवनदर्शन आणि जीवनचित्रण हे देखील कलात्मकच झाले पाहिजे.

तरी सहा साहित्यकाराच्या वाङ्मयीन प्रकृतिधर्मांचा श्री. चुनेकर यानी जो वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे तो एका विशिष्ट प्रकारच्या अभ्यासाच्या दिशेने घेतलेला असला तरी तो विचारांना चालना देणारा आहे यात काही संशय नाही. ¤

सहा साहित्यकार
लेखक: सु. रा. चुनेकर
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
मूल्य ३० रुपये.

## कापुसकोंड्याची गोष्ट उभयान्वय

'कापुसकोंड्याची गोष्ट' आणि 'उभयान्वय' ही विजय मोंडकर याची प्रत्येकी दोन अंकी नाटके मॅजेस्टिक बुकस्टॉलने प्रकाशित केली आहेत.

'कापुसकोंड्याची गोष्ट'चा विषय आहे दलितांवर वर्षानुवर्षे झालेला अन्याय. 'आहे रे' वाले आणि 'नाही रे' वाले याच्यातल्या जीवघेण्या खेळाचं भडक चित्रण या नाटकात आहे. प्रस्थापितांची, भाषा, दलितांशी वागणूक, साहित्यनिर्मिती यावर यात टीका आहे. दलितांवरचे अन्याय-अत्याचार या विषयावर आता खूप लिखाण झालेलं आहे. त्यातलं काही अतिशय संयमपूर्ण नेमक्या व्यथेचं अस्सल चित्रण करणारं आहे. अशा प्रकारचं लिखाणच प्रभावी, विचाराला प्रवृत्त करणारं ठरतं. ठरलं आहेही! पण ऊरबडवेपणा, आक्रस्ताळेपणा असलेलं, सकारण का होईना पण प्रस्थापितांविषयीच्या द्वेषाने भरलेलं लिखाण मनाला खोलवर भिडू शकत नाही. दुर्दैवाने ही 'कापुसकोंड्याची गोष्ट' द्वेष, तळतळाटाच्या चक्रात अडकलीय. त्यामुळे कल्पकता, खरीखुरी दुःखानुभूती असूनही हे लिखाण परिणामकारक ठरत नाही. हिंसेने-द्वेषाने-सूडभावनेने हे प्रश्न सुटणार नाहीत. भडक, ओगळ अभिव्यक्ती अपरिहार्य नाही याची जाणीव लेखकाला आहे, याच्या खुणा संवादात दिसतात; पण तो मोहही सुटत नाही. अधूनमधून घातलेली पद्ये सुटसुटीतपणे आशय व्यक्त करणारी आहेत; पण तीव्र विद्वेष, जळफळाट, कडवट उपहास हेच त्याचेही स्वरूप असल्याने साहित्यनिर्मितीच्या आनंद देणे, अस्वस्थ करणे, वाचकाच्या मनात प्रश्न उभे करणे या किंवा अशा कोणत्याच निकषावर हे लिखाण सुखावह वाटत नाही. दहा-पंधरा पात्रे आपल्या मनातल्या तळतळाटाला वाट करून देण्यासाठी इथे जमली आहेत आणि 'मनू'पासून, 'महात्म्या'पर्यंत सगळ्यांवर आगपाखड करून कापूसकोंड्याच्या गोष्टीच्या शोधात भिरभिरत आहेत. कधीच न संपणारी ही गोष्ट, कधीच न संपणाऱ्या व्यथा-वेदनांचं, प्रस्थापितांकडून कधीच न्याय न मिळण्याच्या शक्यतेचं प्रतीक म्हणून वापरली आहे. या प्रतीकात कल्पकता निश्चितच आहे; पण वास्तवता मात्र नाही. मनूला निर्माण करायचं होतं एक नि झालं भलतंच! मनूने 'तिघांना' तीन महत्त्वाची कार्ये नेमून दिली आणि 'चौथ्या'ला शाप दिला. 'सगळं कार्य पूर्ण झाल्यावर हे तिघे कापूसकोंड्याची गोष्ट तुला सांगतील किंवा मी सांगेन' असा उःशाप दिला; पण मनू विस्मृतीचा बळी ठरला. उरलेले 'तिघे' गोष्ट सांगून मुक्ती कधीच देणार नाहीत, असंच जळत ठेवतील, 'फोड कधीच फुटणार नाही' याची 'चौथ्याला' खात्री वाटते. त्या निराशेतून जे शब्द आकाराला आले ते हे नाटक! वाङ्मयीन गुणवत्तेची पातळी गाठू न शकलेले! कसलाच आनंद न देणारे!

'कापुसकोंड्याची गोष्ट' आणि 'उभयान्वय' या दोन, भिन्न दिशांनी हेलपटणाऱ्या पण अंतिम हेतू एकच असलेल्या नाट्यकृती आहेत. 'आम्हाला उच्चवर्णीयांसारखं सन्मा-

नाचं जीवन जगायचं आहे' ही ओढ कापूस-कोड्याच्या गोष्टीतून व्यक्त होते तर उच्च-वर्णीयांच्या जीवनमूल्यांना परिस्थितीचा सुरुंग लागल्याने भीषण वर्तमानाला आप-लंसं करण्याखेरीज त्यांना गत्यंतर नाही हा आशय 'उभयान्वय' व्यक्त करतं.

तत्त्वं, मूल्यं, निष्ठा जपणाऱ्या, संस्कृति सभाळणाऱ्या, निरपेक्ष त्यागाचा आनंद हवासा वाटणाऱ्या एका मध्यमवर्गीय, पांढर-पेशा कुटुंबाला या बाजारी पैशाच्या तालावर नाचणाऱ्या जगात कसे विपरीत अनुभव येतात याचं चित्रण 'उभयान्वय'मध्ये आहे. आयुष्यभर जतन केलेली ही मूल्यं झिडका-रून कुटुंबप्रमुख नाना आपल्या आयुष्याला दुसऱ्या टोकाची कलाटणी देतात. स्मगलर बनतात. 'लाथ्यानं जेवढं कळतं तेवढं दास-बोधानंसुद्धा नाही कळायच'या तत्त्वज्ञानाशी येऊन पोचतात. स्मगलिंगमध्ये मिळवलेल्या पैशावर भोवतालची दुनिया विकत घेऊ पहातात. व्यवहाराचे चटके बसल्यावर वडि-लाच्या तत्त्वनिष्ठेवर चिडलेला, त्यांचा धि:क्कारयुक्त उपहास करणारा नानांचा मुलगा बापू, वडिलाचं हे नवं रूप पाहून हादरतो. वडिलांमधलं हे अनपेक्षित परि-वर्तन त्याला दुःसह होतं; पण आता ते एक अटळ कटुसत्य ठरलेलं असतं. नानांना—एके काळच्या स्वार्थत्यागी देशभक्ताला स्मगलिंग केल्याबद्दल अटक होते ... सारेच पराभूत होतात!

आजच्या जीवनातील भीषण वास्तवता इथे लेखकाला दाखवायची आहे. संस्कृति-पालन, उच्च जीवनमूल्याची जपणूक ही अफूची गोळी आहे पैसा आणि सत्ता हाच आजच्या मानवी जीवनाचा मूलाधार आहे, केन्द्रबिंदू आहे असंही सुचवायचं आहे. इथ-पर्यंत ठीक आहे; पण या लिखाणातून सूक्ष्मपणे व्यक्त होणारा असा जो आशय आहे तो आशय, ती प्रवृत्ती, ती विचारधारा मला चिंताजनक वाटते. गेली कित्येक शतके समाजातील एका वर्गाने, शिक्षण, सुसंस्कार मिळाल्यामुळे म्हणा, परंपरेमुळे म्हणा, दोन वेळ जेवण मिळत होतं म्हणून म्हणा पण काही एक जीवननिष्ठा उराशी बाळगली. सचोटीचे व्यवहार, निरपेक्ष देशभक्ती, उदात्ततेची पूजा, सात्त्विकतेची ओढ हे सार तो पेलू शकला. मोहाचे क्षण जिंकू शकला, निराशेचे दुःखं पचवू शकला. स्वातंत्र्योत्तर काळातल नैतिक अधःपतन ज्यांना ज्यांना मानवलंय त्यांना नेमका याचाच संताप येतो. उच्च विचाराची मिरास कुठपर्यंत? तुम्ही नेस्तनाबूद झाला नाहीत तोपर्यंत; पण ती प्रक्रिया सुरू झाल्यावर तुमची मूल्यं, तत्त्वं, निष्ठा याना सुरुंग लागल्याखेरीज रहाणार नाही. लाचखोरी, भ्रष्टाचार याला पर्याय उरणार नाही आणि हे अधःपतन आम्हाला पहायचंच आहे अशी ईर्षा बाळग-णारा एक वर्ग निर्माण झाला आहे. त्या वर्गाचं समाधान होईल असं चित्रण या नाटकात आहे. हिंमतराव वाळके हा या वर्गाचा प्रतिनिधी आहे. त्याला नानांवर सूड उगवण्याचं समाधान हवं होतं ते मिळालं ही गोष्ट मन उदास करणारी आहे. साऱ्या समाजाला कीड लागावी, माणसाचं 'माणूस'पण हरवून जावं अशी आकांक्षा बाळगल्याने काय साध्य होणार आहे? पण विवेकशक्ती हरवून बसलेल्यांना हे तात्कालिक क्षुद्र सुख हवं आहे. साहित्य हे समाजमनाचं प्रतिबिंब असतं. त्यात उमटणाऱ्या विविध विचारधारा, भावधारा त्या त्या काळातील मानवी समाजजीवनाचं, व्यक्तिजीवनाचं कमी—अधिक प्रमाणात प्रतिनिधित्व करीत असतात. हे नाटकही अशा प्रकारच प्रतिनि-धित्व करीत आहे. ती प्रवृत्ती ही समाजाच्या, राष्ट्राच्या अंतिम हिताची नाही हे निःसंशय!

सामाजिक आशयाच्या दृष्टीने या नाट-काचा केलेला हा अल्पसा विचार बाजूला ठेवून शुद्ध वाङ्मयीन दृष्टीने पाहिलं तरी हे लिखाण बरचस दोषपूर्ण असलेलं दिसत. योगायोग, उथळपणा, भडकपणा लेखकाच्या मर्जीनुसार पात्र-प्रसंगांना मिळणारी कला-टणी यातून या नाटकाचा सामान्य वकूब स्पष्ट होतो. प्रभावी संवाद, रेखीव व्यक्ति-दर्शन, उत्कट भावाविष्कार यापैकी काही इथे आढळत नाही. बापूच्या व्यक्तिमत्त्वाला कणाच नाही. तो परिस्थिती किंवा नाटका-तली इतर पात्रं टोलवलतील तसा टोलवला जातो. नानांच्या विचारसरणीत प्रचंड बदल होण्याला सबळ कारण लेखकाने उभं केलेलं नाही. हिंमतराव वाळकेच व्यक्तिचित्रण अपुरं आणि परिणामशून्य आहे. प्रखर वास्तवाचं कठोर दर्शन घडविण्यात लेखक यशस्वी झाला आहे; पण हे दर्शन घडवत असताना, 'ही परिस्थिती वाईट आहे, असं कुणाचंच होता कामा नये' असा भाव व्यक्त होत नाही, मनावर उदासरम्य (कलादृष्ट्या रम्य), हुरहूर लावणारा, व्याकुळ करणारा संस्कार होत नाही. सत्त्व-शील व्यक्तीचे अश्रू पाहून मन गलबलून जावं असा अनुभव येत नाही. अखेर सर्जन-शील कलेचा अवतार कशासाठी असतो? सर्वमंगलाच्या ध्यासासाठीच ना? या ध्यासाची पुसटशी खूणसुद्धा वाङ्मयीन अपयशावर मात करू शकते; पण 'सत्'चा शोध घेऊ पहाणारा तो अंकुर दिसायला मात्र हवा. इथे तो दिसत नाही. सर्व दृष्टींनी 'सामान्य' असंच या लिखाणाचं स्वरूप आहे असं म्हणावं लागतं.


—मेधा सिधये

कापूसकोड्याची गोष्ट । उभयान्वय
विजय मोंडकर
मॅजेस्टिक बुक स्टॉल
पृष्ठे १०८. मूल्य १० रु.

## निवेदन

**अब्राहम लिंकन : फाळणी टाळणारा महापुरुष** हे पुस्तक नियोजित वेळेनुसार १ जून रोजी प्रकाशित होणार होते. पण कागद हाती यायास लागलेला विलंब व मुद्रणालयातील तांत्रिक अडचणी यामुळे हे पुस्तक १५ ऑगस्टला प्रकाशित होत आहे. सवलतीत पुस्तक नोंदविलेल्या ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे ही विनंती.

**राजहंस प्रकाशन**



# मनःचक्षूचे सामर्थ्य

' मनःचक्षूचे सामर्थ्य ' ही लेखमाला चालू अंकापासून सुरू होत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्मनात कुठली ना कुठली भीती, गंड, गरसमज लपून बसलेले असतात. हा गंड दूर करण्यासाठी मानसशास्त्राचा कसा उपयोग होऊ शकतो हे लेखकाने या लेखमालेत सांगितले आहे. माणसाचे मन ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. माणसाच्या कल्पनाशक्तीचा वापर मानसोपचारतज्ज्ञ कशा प्रकारे करून घेतात आणि मनाच्या या सामर्थ्याचा उपयोग जीवन अधिक आनंदी, यशस्वी करण्यासाठी कसा करून घेता येईल हे या लेखमालेचे सूत्र आहे...

□

लेखांक : पहिला । लेखक : डॉ. कि. मो. फडके

## मानसचित्रांचे जग

रेखाचा विक्रमशी विवाह झाल्याला जवळजवळ एक वर्ष झाले होते. आता ती नव्या घरात बरीच रुळली होती आणि एका कनिष्ठ महाविद्यालयात ती प्राध्यापिका होती, तरीसुद्धा चांगली संसारदक्ष होती, म्हणून विक्रमप्रमाणेच सासरच्या सर्व माणसांना तिच्याबद्दल कौतुक व अभिमान वाटत असे. मात्र तिची एक काहीशी विचित्र भीती घरात चेष्टेचा विषय होऊन बसली होती.

बंद स्नानगृहात गिझर चालू ठेवून गरम पाण्याने स्नान करणे, ही गोष्ट रेखाला कमालीची धोकादायक वाटत असे. गिझर चालू ठेवून बंद स्नानगृहात स्नान करीत असताना, गिझरमध्ये काही बिघाड होऊन जर गिझरचा प्रचंड स्फोट झाला तर विद्युतप्रवाहाच्या धक्क्याने नाही तर गिझरच्या तुकड्या अंगात घुसून आपल्यावर काही तरी भयंकर अनर्थ ओढावेल, अशी भीती तिच्या मनात घर करून होती. त्यामुळे स्नानाला जाण्यापूर्वी, रेखा गिझर चालू करून गरम पाण्याखाली एक बादली ठेवीत असे व मग स्नानगृहातून बाहेर येऊन ती आपली इतर कामे उरकीत असे. थोड्या वेळाने एक बादली गरम पाण्याने भरली की, दुसरी बादली भरत ठेवून रेखा परत आपल्या इतर उद्योगाला लागत असे. अशा प्रकारे तीन बादल्या गरम पाणी काढून घेतल्यावर गिझर बंद करून रेखा स्नानाला जात असे. तिची ही सवय फार जुनी होती; परंतु तिच्या सासरच्या माणसांना ही सवय नवीन असल्यामुळे त्यांच्या चेष्टेला तिला तोंड द्यावे लागत असे.

विक्रमने व घरातील सर्वांनी रेखाला तिची भीती कशी अवास्तव होती हे समजावून देण्याचा परोपरीने प्रयत्न केला होता. इतर सर्वजण बंद स्नानगृहात गिझर चालू ठेवून स्नान करीत नाहीत का ? विद्युतशक्तीवर चालणाऱ्या उपकरणांची तुला भीती वाटते असे म्हणावे तर तू विद्युतशक्तीवर चालणाऱ्या इस्त्री, मिक्सर इत्यादी उपकरणांचा सर्रास वापर कशी करतेस ? आणि स्फोट होण्याची तुला भीती वाटत असेल तर स्वैपाकघरातील गॅसच्या सिलेंडरचा किंवा प्रेशरकुकरचाही स्फोट होऊ शकतो, हे तुला माहीत नाही काय ? असे प्रश्न विचारून तिला तिची भीती कशी अनाठायी होती हे पटवून देण्याचा प्रयत्नही व्यर्थ ठरला होता. कारण या तऱ्हेच्या प्रयत्नांत नवीन असे काहीच नव्हते. विवाहापूर्वीही तिच्या घरातील सर्वांनी अशाच तऱ्हेचे युक्तिवाद करून तिची भीती घालविण्याचा प्रयत्न करून झालेला होता आणि अनेक वर्षे सर्वांना एकच उत्तर देऊन देऊन रेखाही कंटाळली होती. ते उत्तर म्हणजे 'तुमचे सर्व म्हणणे माझ्या बुद्धीला पटते आहे. माझ्याहून तीन वर्षांनी लहान असलेली माझी बहीणसुद्धा गिझर चालू ठेवून मनसोक्त स्नान करते, हेही मी अनेक वर्षे पाहते आहे; पण काय करू ? गिझर चालू असताना स्नान करणे ही कल्पनाच मला भयानक वाटते !'

रेखाच्या या उत्तरामुळे सर्वजण तिची जास्तच चेष्टा करीत असत, पण तिला त्याचे काहीच वाटत नसे. कारण अशा चेष्टेची तिला सवय झालेली होती. एक गोष्ट मात्र खरी की, इतरांनाच काय पण आपल्या धाकट्या बहिणीलाही गिझर चालू ठेवून स्नान करण्याची भीती वाटत नसे, हे ती लहानपणापासून ओळखून होती; परंतु या जाणिवेचा आपल्या मनातील भीतीवर मात करण्याच्या दृष्टीने तिला काहीच उपयोग झालेला नव्हता.

एकाच घरात वाढलेल्या रेखात व तिच्या धाकट्या बहिणीत इतका फरक होता यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्तीनुसार असे म्हणता येईल की, कोणत्याही प्रसंगी निरनिराळ्या व्यक्ती निरनिराळ्या प्रकारे वागणारच आणि

## लेखकीय

गेले पाव शतक मी मानसशास्त्राचे अध्ययन व अध्यापन करण्यात घालविले आहे. या कालावधीत ज्या विद्वानांच्या कार्याचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला, त्यांपैकी एक म्हणजे, अमेरिकेतील सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अर्नॉल्ड लॅझरस हे होत. त्यांच्या एका पुस्तकाचा येथे थोडक्यात परिचय करून दिला, तर वाचकांना माझ्या या लिखाणाची पूर्वपीठिका समजण्यास मदत होईल, असे वाटते.

एखाद्या व्यक्तीवर मानसिक उपचार करण्यासाठी, मानसोपचारतज्ज्ञ अनेक पद्धतींचा अवलंब करतात. त्यांपैकी एक पद्धत म्हणजे, त्या व्यक्तीला आपल्या डोक्यात काही विशिष्ट मानसचित्रे निर्माण करण्यास व जोपासण्यास शिकविणे. या पद्धतीचे एक वैशिष्ट्य असे की, तिचा उपयोग करून आबालवृद्धांवर उपचार करता येतो. कारण, आपल्या डोक्यात कल्पनेच्या कुंचल्याने तऱ्हतऱ्हेची मानसचित्रे रेखाटण्याची पात्रता, सर्वसामान्य माणसामध्ये लहान वयापासून आढळून येते. साहजिकच या पद्धतीचा सखोल अभ्यास करून मानसोपचारतज्ज्ञांनी अनेक तंत्रे विकसित केली आहेत. मी स्वतः, डॉ. अर्नॉल्ड लॅझरस यांनी संकलित व विकसित केलेल्या तंत्रांचा वापर करीत असतो. कोणत्याही जिज्ञासू व्यक्तीला, मानसचित्रांच्या साहाय्याने आपला विकास करून घेणे शक्य व्हावे, म्हणून डॉक्टरसाहेबांनी एक चांगले पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे : ' इन दि माइन्ड्स आय '. फडके सेंटरच्या मार्फत केल्या जाणाऱ्या कामात, मी डॉक्टरसाहेबांच्या वरील पुस्तकातील तंत्रांचा उपयोग करीत असतो आणि तसे करीत असताना, माझ्या अनुभवात नवीनवी भर पडत असते. या गोष्टीचा फायदा करून घेऊन, मी हे लहानसे पुस्तक लिहिले आहे.

डॉक्टरसाहेबांच्या वरील पुस्तकातील तंत्रांना माझ्या अनुभवाची जोड देऊन, मी प्रस्तुत विषयाची मांडणी केली आहे. शिवाय, हे लिहिताना मी माझ्या नजरेसमोर असे उद्दिष्ट ठेवले आहे की, साधारणपणे शालांत परीक्षेपर्यंत शिक्षण झालेल्या व्यक्तीलाही, हे लेख वाचून आपला विकास करून घेणे शक्य व्हावे. अर्थात, माझा हा हेतू कितपत साध्य झाला आहे, हे वाचकांनीच ठरवायचे आहे. ■

---

विभिन्न व्यक्तींच्या विभिन्न वर्तनाची कारणमीमांसा करायची झाली तर माणसाला मिळणारा आनुवंशिक वारसा, त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचा त्याच्यावर होणारा परिणाम इत्यादी घटकांची मुद्देसूद चर्चा करता येईल; परंतु रेखाच्या मनातील भीती काढून टाकून, तिची स्नान करण्याची सवय बदलण्याच्या दृष्टीने या चर्चेचा फारसा उपयोग होणार नव्हता. याचा अर्थ असा नाही की, रेखाला आपल्या मनातील भीतीला अर्धचंद्र देऊन; गिझर चालू ठेवून स्नान करण्यास प्रवृत्त करणे अशक्य होते.

रेखाच्या मनातील भीतीचे उच्चाटन करून तिला स्नान करण्याची सवय आत्मसात करण्यास शिकविणे जरूर शक्य होते; परंतु त्यासाठी तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत आनुवंशिक गुणविशेषाचा वाटा किती आणि तिच्या सभोवतालच्या परिस्थितीचा वाटा किती होता याची चिकित्सा करण्याऐवजी, गिझर चालू असताना बंद स्नानगृहात स्नान करणे या प्रसंगाविषयी तिच्या मनात कोणती उलथापालथ होत होती, हे समजावून घेणे अधिक उपयुक्त ठरणार होते.

रेखाची धाकटी बहीण सुषमा. तिला गिझर चालू असताना गरम पाण्याने अर्धा तास मजेत स्नान करणे म्हणजे मोठी पर्वणीच वाटत असे. उलट रेखाला ती कल्पनाही भयानक वाटत असे. तेव्हा विभिन्न व्यक्ती एकाच प्रसंगी विभिन्न प्रकारे वागतात याचे मुख्य कारण त्या व्यक्तींच्या मनात चालू असलेल्या घडामोडीत कसे शोधता येईल, हे समजावून घेण्यासाठी रेखा व सुषमा यांच्या मनांचा कानोसा घेणे उद्बोधक ठरेल.

प्रथम आपण सुषमाच्या मनात डोकावून पाहू या. गिझर चालू ठेवून बंद स्नानगृहात स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या मानससरोवरात कोणते तरंग उठत असत ? त्या तरंगांचे स्वरूप काय ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी तिच्याशी संवाद साधला असता तर बहुधा आपल्याला असे दिसून आले असते की, या प्रसंगासंबंधी तिच्या मनातील मुख्य विचार खालील स्वरूपाचे होते.

' ' मी आता भरपूर गरम पाण्याने आरामात स्नान करणार... मग माझा थकवा नाहीसा होईल व मी परत ताजीतवानी होईन... सुवासिक साबणाने मी माझे अंग स्वच्छ करीन तेव्हा माझे मन कसे प्रसन्न होईल...'

या विचारतरंगाबरोबरच तिच्या मानससरोवरात आपल्याला आणखीही काही गोष्टी आढळून आल्या असत्या. त्या गोष्टी म्हणजे तिच्या मानससरोवरातील प्रतिबिंबे ! गिझर चालू असताना स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या मनात अनेक प्रतिमा झटकन साकारू लागत असत. त्यांपैकी काही प्रतिमांचे स्वरूप पाहा.

'सुषमा मनमुरादपणे हवे तेवढे गरम पाणी सर्वांगावर घेत आहे. त्या गरम पाण्याचा आरामदायक स्पर्श तिच्या त्वचेला तजेला आणीत आहे. साबणाच्या सुगंधामुळे तिच्या मनाची प्रसन्नता वाढत आहे. मधूनमधून स्नानगृहातील आरशात स्वतःची नितळ कांती पाहून ती तृप्त होत आहे आणि हवे तेवढे गरम पाणी बादलीत पडत असल्याचा आवाज तिला स्पष्टपणे ऐकू येत आहे...'

वरील सर्व गोष्टी म्हणजे काही सुषमाच्या डोक्यातील विचार नव्हते. त्या सर्व गोष्टी म्हणजे तिच्या डोक्यातील मानसचित्रे किंवा प्रतिमा होत्या आणि ती टुवाल घेऊन स्नानगृहाकडे जाऊ लागण्यापूर्वीच वरील प्रकारच्या आनंददायक प्रतिमा तिच्या मनःचक्षूपुढे तरळू लागत असत. म्हणजे प्रत्यक्ष स्नान करण्यापूर्वीच, स्नानगृहात ती काय करणार होती व तिला काय अनुभव येणार होता, यासंबंधी

अनेक कमी–अधिक स्पष्ट व रेखीव चित्रे तिच्या मनःपटलावर गर्दी करू लागत असत. ज्या घटना घडावयाच्या होत्या, त्या जणू काही प्रत्यक्ष घडतच होत्या, असे वाटावे इतकी तिची मानसचित्रे ठसठशीत होती; परंतु ती कल्पनेच्या साम्राज्यातील चित्रे होती, म्हणून आपण त्यांना मानसचित्रे म्हणतो.

एकूण सुषमाच्या मनात डोकावून पाहिल्यावर आपल्याला असे दिसून आले की, गिझर चालू ठेवून बंद स्नानगृहात स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या मानससरोवरात दोन तऱ्हेच्या तरंगांची सरमिसळ झालेली होती. एक तऱ्हेचे तरंग म्हणजे होते तिचे विचार. हे विचार ती शब्दांच्या व वाक्यांच्या साहाय्याने स्वतःला सांगत असे आणि दुसऱ्या तऱ्हेचे तरंग म्हणजे प्रतिमा किंवा चित्रे. ही मानसचित्रे म्हणजे काही शब्द नव्हेत. ही मानसचित्रे म्हणजे स्पर्श, गंध, ध्वनी इत्यादी संवेदनांमार्फत सुषमाला जाणवत असे असा काल्पनिक पण तीव्र अनुभव. तिच्या मानससरोवरात एकाच वेळी उद्भवणाऱ्या या दोन तऱ्हेच्या संमिश्र तरंगामुळे तिला मोठा उत्साह वाटत असे व गिझर चालू ठेवून गरम पाण्याने स्नान करण्यात ती मश्गूल होत असे. याचा अर्थ असा की, तिच्या उत्साहाच्या भावनेच्या मुळाशी आणि गरम पाण्याने खुशाल खूप वेळ स्नान करण्याच्या तिच्या वर्तनाच्या मुळाशी तिच्या मानससरोवरातील दोन तऱ्हेचे तरंग होते !

## सर्व पटतं, पण काय करू ?

आता आपण रेखाच्या मनात डोकावून पाहू या. बंद स्नानगृहात गिझर चालू ठेवून स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या मानससरोवरात कोणते तरंग उठत असत ? त्या तरंगाचे स्वरूप काय होते ? या प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी तिच्याशी संवाद साधला असता, तर बहुधा आपल्याला असे दिसून आले असते की, तिच्या मानससरोवरातील विचारतरंग खालीलप्रमाणे होते.

'शॉर्ट–सर्किट का काय म्हणतात ते होईल. गिझरमधील कॉइल नाही तर काही तरी जळेल आणि आपण ओल्या हाताने गिझरचे बटण बंद करावयास जाऊ तर आपल्याला नक्कीच विजेचा धक्का बसेल. अर्थात बटण बंद करण्याचे भान आपल्याला राहील की नाही कोण जाणे... बहुधा नाहीच राहणार ! सर्वत्र जीव गुदमरून टाकणारा धूर होईल. आपल्याला स्नानगृहाचा दरवाजा उघडण्यासही फुरसत मिळणार नाही. प्रचंड स्फोट होईल आणि आपल्या अंगात गिझरच्या ठिकऱ्या घुसून आपण स्नानगृहातच कोसळून पडू ...'

परंतु वरील विचारतरंगाबरोबरच तिच्या मानससरोवरात आणखीही काही तरंग क्षणार्धात उठू लागत असत. ते तरंग म्हणजे चित्रांची किंवा प्रतिमांची मालिका ! तिच्या मानससरोवरात उद्भवणाऱ्या प्रतिमातरंगाचे स्वरूप खालीलप्रमाणे होते.

सर्वत्र एकदम धूर होऊन तिचा श्वास कोंडला आहे व डोळ्यांना पाण्याच्या धारा लागलेल्या आहेत... काही क्षणात एक प्रचंड स्फोट होऊन गिझरचे तुकडे तिच्या सर्व अंगात घुसून ती रक्तबंबाळ होते... तिची शुद्ध हरपून ती अस्ताव्यस्त स्थितीत जमिनीवर पडली आहे... घरातील सर्वजण स्नानगृहाचा दरवाजा फोडण्याचा प्रयत्न करीत आहेत....'

वरील सर्व गोष्टी म्हणजे तिच्या मनःचक्षूसमोर तरळू लागणाऱ्या प्रतिमा किंवा चित्रे होती. तिच्या मानससरोवरातील ही चित्रे इतकी रेखीव व स्पष्ट होती की, जणू काही वरील सर्व घटना आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत असे तिला वाटत असे; परंतु या सर्व गोष्टी म्हणजे फक्त तिच्या मानससरोवरात उठलेले काही तरंग होते व म्हणून आपण त्यांना मानसचित्रे म्हणतो.

सारांश, रेखाच्या मनात डोकावून पाहिल्यावर असे दिसून आले की, गिझर चालू ठेवून बंद स्नानगृहात स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या मानससरोवरात दोन तऱ्हेचे तरंग उद्भवले होते. एका तऱ्हेचे तरंग म्हणजे होते तिचे विचार. हे विचार ती शब्दांच्या व वाक्यांच्या साहाय्याने स्वतःला सांगत असे आणि दुसऱ्या तऱ्हेचे तरंग म्हणजे प्रतिमा किंवा चित्रे. ही मानसचित्रे म्हणजे काही शब्द नव्हते. ही मानसचित्रे म्हणजे स्पर्श, गंध, ध्वनी इत्यादी संवेदनांमार्फत रेखाला जाणवत असे असा काल्पनिक पण तीव्र अनुभव. तिच्या मानससरोवरात एकाच वेळी उठणाऱ्या या दोन तऱ्हेच्या संमिश्र तरंगांमुळे तिला भीती वाटत असे व म्हणून ती अगोदर तीन बादल्या गरम पाणी काढून घेतल्यावर गिझर बंद करून मग स्नान करण्याच्या विशिष्ट सवयीच्या मुळाशी तिच्या मानससरोवरातील दोन तऱ्हेचे तरंग होते.

गिझर चालू ठेवून स्नान करणे या प्रसंगाशी निगडित असलेली सुषमाच्या डोक्यातील मानसचित्रे इतकी आनंददायक होती की, गिझरचा स्फोट होऊ शकेल अशी भीती कोणी तिच्या मनात भरविण्याचा प्रयत्न केला असता तर तो निष्फळ ठरला असता. उलट, रेखाच्या डोक्यात याच प्रसंगाशी निगडित असलेली मानसचित्रे इतकी ठळक व धोकादायक होती की, तिची भीती अवास्तव होती हे तिला पटवून देण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले होते आणि त्यामुळे तिची भीती व स्नान करण्याची विशिष्ट सवय या दोन्ही गोष्टी जशाच्या तशा टिकून राहिल्या होत्या. याचा अर्थ असा की, तिच्या मनःचक्षूला सुस्पष्टपणे जाणवणाऱ्या धोकादायक प्रतिमासृष्टीपुढे सर्व युक्तिवाद लुळे पडले होते किंवा असे म्हणता येईल की, तिच्या मानससरोवरातील प्रतिमातरंगांनी विचारतरंगांवर कुरघोडी केलेली होती. म्हणून तिच्या विचारांची छाननी करून त्याविषयी कोणी तिला काही सांगू लागले तर ती म्हणत असे : 'तुमचे सर्व म्हणणे माझ्या बुद्धीला पटते आहे; पण काय करू ? गिझर चालू असताना स्नान करणे ही कल्पनाच मला भयानक वाटते !'

सात आठवड्यांपूर्वी रेखा मला भेटली तेव्हा तिच्याशी केवळ युक्तिवाद करून भागण्यासारखे नाही, हे मी तात्काळ ओळखले. गिझर चालू असताना स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या डोक्यात अधिक आकर्षक व आनंददायक मानसचित्रे कशी रुजविता येतील याचा एक आराखडा मी मनाशी निश्चित केला आणि मग मी मनातील भीती नष्ट करून तिला स्नान करण्याची नवी सवय तिच्या आत्मसात करण्यास मदत करण्याच्या कामाला लागलो.

प्रथम मी रेखाला, गिझर चालू असताना स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या डोक्यात कोणत्या विचारांची व कोणत्या मानसचित्रांची वावटळ उठत असे, याची जाणीव करून दिली. थोड्याशा चर्चेनंतर, मी म्हणत होतो त्या प्रकारची मानसचित्रे तिला भेडसावीत असत, हे तिने मान्य केले. नंतर मी तिला, कल्पनेच्या साहाय्याने



माणूस आपल्या मनःचक्षूपुढे वाटेल ते चित्र उभे करू शकतो, हे पटवून दिले. उदाहरणार्थ, एखाद्या सुप्रसिद्ध व सुंदर अभिनेत्रीचा व माझा विवाह मोठ्या थाटामाटाने साजरा होत आहे,-असे काल्पनिक चित्र मी माझ्या मनःचक्षूपुढे अगदी स्पष्टपणे उभे करू शकतो, असे मी तिला सांगितले. त्यावर ती चटकन हसली व माणूस आपल्या साम्राज्यात कोणत्याही प्रतिमा निर्माण करू शकतो, हे तिने मान्य केले.

इतकी पूर्वतयारी झाल्यावर मी रेखाला डोळे मिटून स्वस्थपणे आरामखुर्चीत बसण्यास सांगितले व तिला खालील सूचना देण्यास सुरुवात केली.

'आता तुझे काम म्हणजे मी ज्या काही प्रसंगाचे हळूहळू वर्णन करीन त्यानुसार तू तुझ्या डोक्यात प्रतिमा किंवा मानसचित्रे रेखाटणे. पाहू बरे तुला कसे काय जमते ते.

तू तुझ्या घरातील स्नानगृहात आहेस. गिझर चालू आहे व बादलीत गरम पाणी पडत आहे. स्नानगृहाचा दरवाजा आतून बंद आहे; पण तू निःशंकपणे सावकाश गरम पाणी अंगावर घेऊन मजेत स्नान करीत आहेस. तुला फक्त एकच गोष्ट जाणवत आहे ती म्हणजे तू अनेक वर्षांनी गरम पाण्याची काटकसर न करता, मनसोक्तपणे आरामात स्नान करीत आहेस....'

मी इतके बोलल्यावर रेखाने डोळे उघडले व ती म्हणाली, 'हे कसे शक्य आहे ? मला ज्याची भीती वाटते ते मी कसे करू ?'

तिच्या वरील प्रश्नांना मी काय उत्तर दिले ते पाहा :

'रेखा, तू थोडा घोटाळा करीत आहेस. मी काही तुला गिझर चालू ठेवून स्नान कर असे सांगितलेले नाही. तू गिझर चालू असताना स्नान करीत आहेस, अशी फक्त काल्पनिक मानसचित्रे रेखाटण्यास मी तुला शिकवीत आहे. एखाद्या सुस्वरूप अभिनेत्रीशी माझा विवाह मोठ्या थाटामाटाने साजरा होत आहे, असे चित्र मी माझ्या मनःचक्षूपुढे सहज उभे करू शकतो, हे तुझ्या नीट लक्षात आले आहे ना ?'

माझ्या या उत्तरावर रेखा थोडी घुटमळली; परंतु माणसाला एखाद्या प्रसंगाची भीती वाटत असली, तरी त्याला तशी भीती वाटत नाही, अशी तो कल्पना करू शकतो, हे तिने मान्य केले व परत डोळे मिटून ती आरामखुर्चीत नीट रेलून बसली.

गिझर चालू ठेवून, बंद स्नानगृहात ती मजेत स्नान करीत आहे, या काल्पनिक प्रसंगाचे वर्णन मी पुन्हा पहिल्यापासून करावयास सुरुवात केली. थोडा प्रयत्न केल्यावर रेखाला आपल्या घरातील स्नानगृहात गिझर चालू ठेवून स्नान करणे, या प्रसंगासंबंधी आकर्षक व आनंददायक प्रतिमा आपल्या मनःपटलावर रेखाटणे शक्य झाले. अर्थात तिने आपल्या मनःचक्षूच्या सामर्थ्याने अनुभवलेल्या प्रतिमा अस्पष्ट होत्या व त्या चटकन नाहीशा झाल्या; परंतु तशा प्रतिमा मनःचक्षूपुढे उभ्या करता येतात हे तिला पटले.

पुढील सहा आठवड्यांच्या काळात रेखा एकूण आठ वेळा मला भेटावयास आली. प्रत्येक वेळी मी तिला, गिझर चालू ठेवून स्नान करणे या प्रसंगासंबंधी तिच्या डोक्यात अधिकाधिक आनंददायक व उत्साहवर्धक मानसचित्रे रेखाटण्यास मदत केली. शिवाय प्रत्येक वेळी मी तिला थोडा गृहपाठही दिला. गृहपाठ असा होता की, माझ्या मदतीने ज्या प्रकारची मानसचित्रे रेखाटण्यास ती शिकत होती, त्याच प्रकारची मानसचित्रे घरी गेल्यावर तिने एकटीनेच स्वतःच्या प्रयत्नाने रेखाटण्याचा सराव करावयाचा होता.

चौथ्या आठवड्याच्या अखेरीस रेखाने एक दिवस मला आपणहून सांगितले की, गिझर चालू ठेवून बंद स्नानगृहात स्नान करण्याचा प्रयत्न करावा, असे तिला वाटू लागले होते. तिने आपणहून तिच्या मनातील ही इच्छा बोलून दाखविल्यावर मी

तिला तसा प्रयोग करून पाहण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले. उदाहरणार्थ, मी तिला असे सुचविले की, प्रथम तिने तिच्या नेहमीच्या सवयीनुसार तीन बादल्या गरम पाणी काढून घेऊन मग शिवाय गिझर चालू ठेवून स्नान करण्यास सुरुवात करावी आणि ज्या क्षणी तिला फारच भीती वाटेल त्या क्षणी गिझर बंद करून टाकून नेहमीप्रमाणे स्नान करावे. अखेर सहाव्या आठवड्यात रेखाने तिच्या मनात नव्याने दृढमूल होत असलेल्या नव्या प्रतिमांनुसार बंद स्नानगृहात गिझर चालू ठेवून स्नान करून पाहिले. या तिच्या प्रयत्नामुळे तिचा आत्मविश्वास वाढला आणि स्वतःच्या मनातील अवास्तव भीती नष्ट करून स्वतःला स्नान करण्याची नवी सवय लावून घेणे प्रयत्नाने शक्य होते, याची तिला खात्री पटली.

सहा आठवड्याच्या प्रयत्नामुळे रेखाची जी प्रगती झाली होती त्याचा वरती जो आढावा घेतला आहे, तो अतिशय ढोबळ व त्रोटक स्वरूपाचा आहे. तिच्या जीवनात जे काही घडत होते, ते काही अगदी सहजासहजी व विनासायास घडत नव्हते. त्याचप्रमाणे मी रेखाला जे काही मार्गदर्शन केले होते त्याचे स्वरूपही वरील सारांशावरून पूर्णपणे स्पष्ट होत नाही; परंतु रेखाचे उदाहरण देण्यात जो उद्देश आहे, तो साध्य होण्याइतपतच तपशील वरील सारांशात दिले आहेत.

## हे सर्व कसं करावं ?

रेखाचे उदाहरण देण्यात मुख्य उद्देश असा आहे की, माणसाच्या डोक्यातील मानसचित्रे किंवा प्रतिमा यांचा त्याच्या भावनांशी व वर्तनाशी किती घनिष्ट व अतूट संबंध असतो हे दाखवून देणे माणसाच्या डोक्यात स्वतःबद्दल, इतर माणसाबद्दल व त्याच्या सभोवतालच्या जगातील घटनाबद्दल, अनेक प्रतिमा किंवा मानसचित्रे खच्चून भरलेली असतात या मानसचित्राचा त्याच्या भावनांवर बरावाईट परिणाम होत असतो. त्यामुळे माणसाने आपल्या डोक्यातील मानसचित्राचा मागोवा घेऊन त्यांमध्ये जाणीवपूर्वक इष्ट ते बदल केले तर, त्याला आपल्या इच्छेनुरूप भावना अनुभवता येतात व आपल्या वर्तनातही हवा तसा बदल करता येतो.

माणसाला आपल्या डोक्यात विशिष्ट प्रकारची मानसचित्रे रेखाटून, आपल्या भावनाना व वर्तनाला योग्य वळण लावता येते, हा मुद्दा तुम्हाला रेखाच्या उदाहरणावरून नीट समजला असेल, तर तुम्हाला तुमचे जीवन अधिक सुखी व समृद्ध करण्याचा राजमार्ग सापडला आहे असे म्हणता येईल. या राजमार्गाचा अवलंब करून तुम्हाला तुमच्या मनातील चिंता, विषण्णता, क्रोध, मत्सर, न्यूनगंड, अपराधी असल्याची टोचणी इत्यादी अनेक तापदायक गोष्टींना मूठमाती देता येईल आणि त्यांच्या जागी तुम्हाला तुमच्या मनात प्रेम, उत्साह, आनंद इत्यादी अधिक समाधानकारक भावनाची पेरणी व जोपासना करता येईल. शिवाय तुम्हाला अभ्यास, उद्योग—व्यवसाय, क्रीडा, छंद इत्यादी अनेक क्षेत्रात स्वतःला नव्या सवयी लावून अधिक सर्जनशील व आनंददायक जीवन जगता येईल.

या संदर्भात, रेखाची प्रगती पाहून विक्रमला जी स्फूर्ती मिळाली होती ती उल्लेखनीय आहे. त्याने मला एक दिवस विचारले की, मानसचित्रांचा उपयोग करून त्याला धूम्रपानाच्या व्यसनातून स्वतःची मुक्तता करून घेता येणे शक्य होते काय? त्याचा प्रश्न रास्तच होता आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, रेखाच्या स्नान करण्याच्या सवयीत व त्याच्या धूम्रपानाच्या व्यसनात एक साम्य होते. ते साम्य म्हणजे, स्वतःच्या वर्तनाबद्दल ते दोघेही इतराना जी उत्तरे नेहमी देत आले होते, त्या उत्तराचं स्वरूप एकच होते. रेखाशी कोणी युक्तिवाद करू लागल्यास ती म्हणत असे, 'तुमचे सर्व म्हणणे माझ्या बुद्धीला पटते आहे; पण काय करू ? गिझर चालू असताना स्नान करणे ही कल्पनाच मला भयानक वाटते !' आणि दिवसाकाठी ३५–४० सिगारेटस ओढणे प्रकृतीला अपायकारक आहे असे विक्रमला कोणी सांगितले की तोही एकच उत्तर देत असे. ते उत्तर म्हणजे, 'मी रसायनशास्त्राचा विद्यार्थी आहे. सिगारेटस ओढणे प्रकृतीला अपायकारक असते, हे माझ्या बुद्धीला नक्कीच कळते आहे; पण काय करू ? सिगारेटस् न ओढता जगण्याची कल्पनाच मला सहन होत नाही !'

विक्रम आपल्या धूम्रपानाच्या व्यसनासंबंधी ज्या तऱ्हेची असहायता व्यक्त करीत असे, तशाच प्रकारची असहायता इतर अनेक माणसे आपल्या मद्यपानाच्या, खादाडीच्या किंवा इतर अन्य सवयींसंबंधी वारवार व्यक्त करीत असतात. आपली सवय आत्मघातकी आहे, हे त्याच्या बुद्धीला समजत व पटत असते; परतु आपली आत्मघातकी सवय सोडून देण्यास आपण असमर्थ आहोत, असे त्यांना वाटत असते.

वरीलसारख्या अनेक आत्मघातकी सवयींवर मात करण्यासाठी, माणसाला आपल्या डोक्यात हुकमीपणे निर्माण करता येणाऱ्या मानसचित्राचा उपयोग करता येतो. तसेच आपल्या डोक्यात विशिष्ट मानसचित्रे रुजवून माणूस आपल्या जीवनातील अनेक प्रकारच्या समस्यांशी यशस्वीपणे मुकाबला करण्याचे आपले सामर्थ्य वाढवू शकतो. मग त्या समस्या त्याच्या जीवनात घडणाऱ्या घटनांमुळे निर्माण झालेल्या असोत किंवा त्याला इतर माणसांशी जो व्यवहार करावा लागतो त्यातून निर्माण झालेल्या असोत.

तुमच्या मनात आता साहाजकच असा प्रश्न उभा राहील की, हे सर्व कसे करावे ? आणि ज्या कोणाला आपल्या मानसचित्राच्या साहाय्याने स्वतःचे जीवन अधिक सुखी व समृद्ध करावयाचे असेल, त्याने, रेखाने जशी माझी मदत घेतली, तशीच कोणत्या तरी तज्ज्ञाची मदत घेणे आवश्यक आहे काय ? म्हणून हे पुस्तक लिहिण्याच्या मागील हेतू स्पष्ट करून सांगणे आवश्यक आहे.

या पुस्तकाचा सर्व भर स्वावलंबनावर आहे. याचा अर्थ असा की तुम्ही स्वतःच्या प्रयत्नाने काय करू शकाल, हे सांगण्याचा प्रयत्न मी या पुस्तकात केला आहे. मानसचित्राचा उपयोग करून घेण्याच्या ज्या एखाद्या पद्धतीत तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाची जरुरी असते, अशी कोणतीच पद्धत या पुस्तकात दिलेली नाही. उलट, या पुस्तकात फक्त अशाच निवडक पद्धती विशद करून सांगितलेल्या आहेत की, ज्या सर्वसामान्य माणूस स्वतःच्या प्रयत्नाने आत्मसात करू शकेल.

या पुस्तकात विशद करून सांगितलेल्या पद्धती आत्मसात करताना तुम्ही दोन उद्देश तुमच्या नजरेसमोर ठेवणे फायद्याचे ठरेल. पहिला उद्देश म्हणजे, मानसचित्रे म्हणजे काय व आपल्या डोक्यात विशिष्ट मानसचित्रे जाणीवपूर्वक कशी रेखाटावीत, याविषयीचे ज्ञान संपादन करणे आणि दुसरा उद्देश म्हणजे या पुस्तकातील मार्गदर्शनानुसार विचार व वर्तन करण्याच्या कामी प्रयत्नशील राहणे. कारण आपल्या डोक्यात आपल्या मर्जीनुसार हवी ती मानसचित्रे रेखाटणे, ही एक कला आहे आणि कोणत्याही कलेवर प्रभुत्व मिळवावयाचे असेल तर सतत सराव करण्याचे परिश्रम घ्यावे लागतात. तुम्ही या दोन्ही उद्देशाचे भान ठेवलेत तर मनःचक्षूच्या साहाय्याने तुम्हाला तुमचे जीवन नक्कीच अधिक सुखी व संपन्न करता येईल. □

## आयांचा प्रश्न

शोभा भागवत

# कामसू आई

नवीन लग्न झालेली स्मिता सासरबद्दल तक्रार सांगत होती. तिचा नवरा हा एकुलता एक मुलगा. साहजिकच आईचा भयंकर लाडका वगैरे. अगदी सर्वस्वच ! स्मिता सांगत होती, 'अग, त्याला कामाची जरासुद्धा सवय नाही. कधी आपली कपबशी हातासरशी धुऊन टाकत नाही का कधी अंथरुणं आवरत नाही. स्वतःचे कपडे धुणं, दुरुस्त करणं तर सोडच; पण आवरूनसुद्धा ठेवत नाही. पँट चढवताना लेंगा काढेल तो तसा बेडरूममध्ये आठावा आकडा करून पडलेला असतो. एक वस्तू पुन्हा जाग्यावर ठेवत नाही आणि काही म्हटलं तर म्हणतो मला कधी घरातल्या कामाची सवयच नाही आणि सासूबाई त्याची री ओढतात. मलाच मोठेपणानं सांगतात त्याला मी फुलासारखा वाढवलाय. तू पण त्याचं तसंच करायला हवंस सगळं.'

'मग तू काय म्हणालीस त्यांना ?'

'काय म्हणणार ? करते ना सगळं मुकाट्यानं; पण मला काही ते पटत नाही. मी काही फार दिवस हे ऐकून घेईन असं वाटत नाही.'

स्मिताचं हे वाक्य ऐकून मला बरं वाटलं. सध्या मुकाट्यानं करून ती परिस्थितीचा अभ्यास करतेय आणि अंदाज असा की ती हे सहन करू शकणार नाही.

लग्न करून बायको जेव्हा घरात येते तेव्हा घरातले सगळे गृहीतच धरतात की ती आता नवऱ्याचं सगळं करणार आणि त्यातून सासूबाईंचा आग्रह असतो त्यांनी जसं केलं तसंच करणार मग वांग्याच्या भाजीचा मसाला त्यांच्यासारखाच जमायला हवा. ओटा, टेबल पुसणं त्यांच्याच पद्धतीनं व्हायला हवं, नवऱ्याच्याही लक्षात यायच्या आत त्याच्या कपड्यांच्या दुरुस्त्या करून ठेवायला हव्यात त्यांना अस्ताव्यस्त टाकलेले कपडे. पुस्तकं आवरणं हे तर रोजचंच.

जेव्हा 'आले तुझिया घरी कराया तुझीच रे चाकरी' म्हणत सुना घरात येत होत्या तेव्हा ठीक होतं म्हणजे ठीक कधीच नव्हतं; पण त्यांची तयारी होती ते सगळं करण्याची. आता शिकलेली, तिचे तिचे काही उद्योग असलेली सून हे सगळं कसं करेल ?

अशा वेळी मग नवरेमंडळी अंगठा तोंडात धरून आईच्या पदरामागे लपायला बघतात. (म्हणजे लहान मुलासारखं वागतात.) आपलं सगळं नीट व्हावं म्हणून आईला मस्का लावतात. 'माझ्या आईनं मला कधी हे करू दिलं नाही' म्हणतात आणि सून बिचारी एकटी पडते.

तिनं हे पटवून घेतलं नाही तर धुसफूस चालू. पटवून घेतलं तर दुसरा एक 'कामसू आई' तयार होऊन दुष्टचक्र चालूच राहतं.

अशा कित्येक आया आपण बघतो आजूबाजूला ज्या अगदी मोठ्या मुलांचंही अंघोळीचं पाणी काढतात, त्यांचे कपडे बाथरूममध्ये नेऊन ठेवतात, पाच पाच वर्षांच्या मुलांनाही नेमानं भरवतात, त्यांचे हात, पाय तोंड पुसतात. त्यांनी मागितलं की बसल्या जागी पाणी नेऊन देतात, त्यांच्या तोंडातून शब्द यायचा अवकाश की त्याला लगबगीनं खायला करून देतात.

अशा आया अत्यंत efficient असतात. त्या आई म्हणून वागत असतात. आईची त्यांना समजलेली 'भूमिका' पार पाडत असतात. त्यात मुलांसाठीच आई असते. आपल्या कष्टांनी त्या मुलांना जिंकू पाहतात. लबाड मुलं आपण जिंकली गेलो आहोत असं दाखवतातही; पण गुलाम काही मालकाचा मित्र नाही बनू शकत. फार तर चांगला-फारच चांगला गुलाम होऊ शकतो.

हे थोडं लागण्यासारखं वाटतंय; पण खरंच असं मुलांचं सगळं करणं फार आंधळेपणानं केलं जातं. असं फार करणारी आई असली की, मुलं ऐदी बनतात. सारखं दुसऱ्यांनी आपली सेवा करावी अशी अपेक्षा करतात. ती त्यांना त्यांचा जन्मसिद्ध हक्कच वाटतो. त्यात त्यांचा दोषही नसतो. कारण त्यांची घडणच तशी बनलेली असते.

कित्येकदा असं मुलांसाठी राबणाऱ्या आईला इतर काही फारसा उद्योग नसतो. छंद, आवडी नसतात. ती मुलं, घर हेच सर्वस्व मानून, सगळं करत राहते आणि जी तरुणपणी स्वतःचा काही उद्योग, छंद निर्माण करत नाही, इतर कशात लक्ष घालत नाही, तिला मुलं मोठी झाली की, वेळ खायला उठतो. मग प्रकृतीच्या तक्रारी सुरू होतात. मानसिक दुर्बळपणा येतो. चिडचिड सुरू होते. आपल्याशी कुणी बोलत नाही असं वाटतं. मुलाच्या आयुष्यातली गुलामाची गरज संपलेली असते. (कधी बायकोच्या रूपानं नवा गुलाम रुजू झालेला असतो) आणि आई आणि मुलांमधलं अंतर वाढत जातं.

मुलांना आईचं प्रेम मिळालं पाहिजे, अगदी मान्य ! पण मुलांची सगळी कामं करणं म्हणजे प्रेम करणं नव्हे. आपली मुलं वाढवताना किती स्वावलंबी होतायत, किती हुशारीनं कामं करू शकतायत, किती दुसऱ्याचा विचार करू शकतायत, दुसऱ्याला मदत करू शकतायत, भोवतालच्या परिस्थितीशी, माणसांशी किती जुळवून घेऊ शकतायत हे डोळे उघडे ठेवून आईनं-वडलांनी पहायला हवं. आपल्या फार करण्यानं जर मूल दुबळं होत असेल तर आपला कामसूपणा थोडा कमी केला पाहिजे. मुलाची कामं मुलाला करू दिली पाहिजेत. फार फार तर काय होईल, ती तो आपल्याइतकी चांगली करणार नाही; पण आपल्या वयाचा झाल्यावर तो, ती आपल्याहून चांगली करत असेल हा दिलासा पुरेसा नाही का ?

आमच्या आईनं खूप काम केलं आणि आम्हाला लाडावून-बिघडवून ठेवलं, असं मुलांनी म्हणायला हवं आहे का? की आईनं आम्हालाही कामाचं वळण छान लावलं असं म्हणायला हवं आहे ?

याचा अर्थ सैनिकी शिस्तीनं सारं मुलांकडून धाकदपटशा दाखवून करून घ्यायचं का? मुळीच नाही. कधी एखादी गोष्ट करून दाखवायची. कधी प्रेमानं करवून घ्यायची. जोडीनं करायची आणि नकळत हे वळण लावायचं

ऐकलेलं विसरतं.

पाहिलेलं लक्षात राहतं.

केलेलं पक्कं समजतं. या न्यायानं मुलांना अनेक गोष्टी करण्याच्या अनुभवातून जाऊ देणं फार महत्त्वाचं आहे. मग ते कपडे आवरणं असो, कपबशी विसळणं असो, खरेदी करणं असो किंवा एखाद्या कार्यक्रमाचं, अभ्यासाचं नियोजन करणं असो. चुकू-माकू; पण शिकू असा उत्साह मुलांमध्ये राहिला पाहिजे, त्यात ही कामं मुलांची—ही मुलींची असा भेदही नको. आपणसुद्धा एखादी गोष्ट दहा वेळा करतो, तेव्हा त्याचा बाऊ वाटत नाही. प्रथमच करायची म्हटलं की, भीति वाटते. कमीत कमी घरातल्या कामांचा तरी आपल्या मुला-मुलींना अनुभव देऊ या. आपला अति कामसूपणा थोडा कमी करावा लागला तरी चालेल, नाही का ? नाही तर स्मिताच्या तक्रारीसारखं असमाधानाचं बी आपण आपल्या हातांनी पेरून ठेवू घरात ! ☐

# रंगभूमी

## ‘ बेस्ट ’ कलाकारांचे ‘ मा अस् साबरिन ’

वि. भा. देशपांडे

मुंबईची बेस्ट कला–क्रीडामंडळ ही संस्था हौशी नाट्यस्पर्धांच्या संदर्भात स्वतःचे नाव टिकवून आहे. ज्यांच्या नाट्यनिर्मिती-कडे काही अपेक्षेने पाहावे अशा संस्थांपैकी एक असे जर वर्णन केले तर ते उचित ठरावे ! ह्या वर्षी या संस्थेने महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत ‘ मा अस् साबरिन ’ नामक नाटक पेश करून प्रथम क्रमांक पटकावला. पहिल्या फेरीत लक्षवेधी पारितोषिके तर मिळवलीच; पण अंतिम फेरीत आणि अन्य स्पर्धांमध्येही भरघोस यश संपादन केले. अंतिम फेरीत नाट्यप्रयोगाच्या प्रथम पारितोषिकाबरोबरच दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक आणि उत्कृष्ट अभिनेता-अभिनेत्री ही पारितोषिके मिळाली. लेखन, दिग्दर्शन, अभिनय अशा सर्व स्तरांवर पार्श्व-नाथ आळतेकर नाट्यस्पर्धा, अखिल भार-तीय नाट्यपरिषद आदि ठिकाणचीही पारितोषिके ह्या कलावंतांनी प्राप्त केली.

इतक्या पारितोषिकांचा वर्षाव झालेल्या नाट्यप्रयोगाबद्दल कुतूहल नसले तरच नवल ! या नाटकाचे लेखक आहेत प्रभाकर मयेकर. नाटकाच्या नावापासूनच एक वेगळे कुतूहल मनात जागत राहते. ‘मा अस् साबरिन ’ हे कुराणातील वचन आहे. त्याचा मथितार्थ असा की, ‘धीर धर, परमेश्वर तुझे रक्षण करील’; पण हा अर्थ नाटक पाहताना सहजपणाने उलगडणारा नाही. कारण सरळमार्गी न जाता प्रतीकांच्या–रूपकांच्या मार्गाने जाणारे हे नाटक आहे. मावल नावाची एक आदिवासी जमात. एका बेटावर राहणारी. तिथला राजा तसा दुर्बल, लहरी, उथळ; पण राणी रूपवान, कर्तृत्व-वान, महत्त्वाकांक्षी आहे. अशा बेटावर एक परदेशी गृहस्थ येतो आणि त्या निमित्ताने घडलेले नाटच आपल्यासमोर उलगडत जाते. यातला राजा, राणी, अमान, मसायदा या व्यक्ती आपल्या कृती आणि उक्तींद्वारा आपल्याला अनेक जीवनसंदर्भाची झलकचित्रे दाखवतात. आपली आकलनशक्ती किंवा कल्पनाशक्ती जितकी तरल असेल त्यावर त्यातल्या रूपक–प्रतीकांचा अर्थ आपल्या ध्यानी येऊ शकतो. नाट्यांतर्गत असलेली कथा आणि बव्हंशी स्थळ–काळ निर्देशाच्या पलीकडे आहे, त्यामुळे त्यातले नेमके संदर्भ कोणाचे हे आपणच ठरवायचे आहे. त्याच-बरोबर जाणवले असे की, ही नाट्यकथा आरंभाला मावल जमातीच्या संदर्भात काही सांगू पाहते; पण अमानच्या आगमनानंतर ही कथा समूहाची न राहता व्यक्तिपातळी-वरच्या संघर्षात अडकून पडली आहे. त्यामुळे नाट्यानुभवाचा संदर्भस्तरच पालटतो. तसेच पहिल्या अंकाचा एकजिनसी लेखनपरिणाम दुसऱ्या अंकात काहीसा संथ, शिथिल वाटतो. कारण तुलनेने दुसऱ्या अंकात घटितांचे आणि सर्पदंशप्रकरणाचे तपशील विस्ताराने आलेले आहेत. जर हे सारे नाट्यप्रतीकरूपाने आस्वा-दले गेले नाही तर चांदोबा किंवा तत्सम एखाद्या बालरंजन करणाऱ्या मासिकातली गोष्ट आपण पाहात आहोत असे वाटले तर नवल नाही; पण इतक्या पृष्ठपातळीवरून या नाटकाकडे पाहिले जाणार नाही असे वाटते. कारण या नाटकाच्या लेखनातील किंवा मांडणीतील काही सदोषता ध्यानी घेऊनही नाट्यलेखनातली ताकद जाणवणारी आहे. हा नाटककार आपल्या जीवनातील महत्त्वाच्या प्रश्नावर खोलवर जाऊन काही सांगू पाहात आहे, ते अधिक मोलाचे आहे.

अशा वेगळ्या विषय–आशयावरचे नाटक प्रयोगासाठी नेहमीच आव्हानात्मक असते. ते आव्हान आणि आवाहन ‘ बेस्ट ’च्या कला-कारांनी उत्तमपणाने स्वीकारलेले आहे. आपण ते आव्हान पेलू शकतो हेही सिद्ध केलेले आहे. या नाटकात अनेक कलाकार आहेत. त्या सर्वांचे परिश्रम हे प्रयोगाच्या यशाला कारण झाले. त्या सर्वांचे श्रेय मान्य करून त्यातल्या काहींचा उल्लेख करणे मह-त्त्वाचे आहे. शांकलीराणीच्या भूमिकेत माधुरी जोशीने केलेला अभिनय कित्येक दिवस स्मर-णात राहावा इतक्या उत्तम श्रेणीचा होता. तिला भूमिकेची असलेली समज आणि त्याची अभिव्यक्ती तपशिलासह पाहण्याजोगी होती. विशेषतः तिने आपल्या तेजदार डोळ्यांचा केलेला वापर, भावानुकूल मुद्राभाव तिच्या व्यक्तिरेखेचे अनेक रंग व्यक्त करीत होते. मुद्राभावाच्या बरोबरीनेच तिचा शब्दही परिणामकारी होता. आपल्याला जो पुरुष वश करून घ्यायचा आहे किंवा ज्याचा नाश करावयाचा आहे, त्याबद्दलची अभिलाषा अथवा त्वेष तिने विलक्षण ताकदीने व्यक्त केला. तिच्या अभिनयाच्या गुणवत्तेने नाट्य-प्रयोगाचा मध्यवर्ती कणा भक्कम झाला. तिच्या साथीला अभिनयाची रंगत वाढवली ती अरुण शेलार (मसायदा), रमेश कोर-गावकर (शाबल), अरुण नलावडे (अमान), गजानन चव्हाण (शिहाद), नीलिमा तेरदाळ-कर (मानुशा) आणि शरयू भोपटकर (झुनकी) आदी मंडळींनी, त्यातही तपशि-लात जाऊन सांगावयाचे तर अरुण नला-वडेचा ‘ अमान ’ लक्षवेधी होता. त्यानेही आपल्या आवाजाचा, शब्दोच्चाराचा आणि डोळ्यांसह चेहऱ्याचा वापर परिणामकारी-रीतीने केला. शरयू भोपटकरबाई या तशा रंगभूमीवर अनुभवी, सराईत आहेत. त्यांची काही कामे यापूर्वी मी पाहिली आहेत. त्यांच्या वाट्याला आलेली भूमिका त्या चोख बजावतात आणि नाटकाची गुणवत्ता वाढव-तात तशी याही ठिकाणी वाढली गेली. खरे-तर माधुरी जोशी, अरुण नलावडे आणि शरयू भोपटकर आदी कलाकारांनी ‘ बेस्ट ’ मध्ये भूमिका कराव्यातच; पण शक्य असेल तर व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकांत भूमिका कराव्या. कारण त्यांच्याकडे अभि-नयाची जी गुणवत्ता आहे ती केवळ राज्य-स्पर्धेतच अडकून राहू नये !

ह्या गुणी कलावंतांच्या तोडीचा दिग्दर्शकही या नाटकाला लाभला, तो म्हणजे नारायण घोसाळकर. घोसाळकरांनी नाट्यसंहितेचा अन्वयार्थ पक्का करून प्रयोगनिर्मितीसाठी केलेले परिश्रम स्पर्धेच्या कक्षा ओलांडून त्याहीपेक्षा अधिक ताकदीचे होते. प्रयोगनिर्मितीसाठी त्यांनी केलेला वातावरणनिर्मितीचा विचार महत्त्वाचा होता. त्यासाठी रंगभूषा, वेशभूषा, प्रकाश आणि संगीत ह्या पूरक गोष्टींचा आधार महत्त्वाचा होता. विशेषतः वेशभूषेची संकल्पना करणारे प्रकाश मयेकर आणि प्रत्यक्ष वेशभूषा तयार करणारे प्रभाकर पारकर यांची कामगिरी महत्त्वाची होती. कमलेश कदम, प्रशांत दामले यांचे पार्श्वसंगीत, यशवंत कोकीतकरांची प्रकाशयोजना, मनोहर पाटलांचे नेपथ्य यामुळे नाट्यप्रयोगाला उठाव आला. या लोकांना साह्यभूत होणारांची संख्या खूपच आहे. या सर्वांना बरोबर घेऊन घोसाळकरांनी एक उत्तम नाट्यनिर्मिती केली. ती करताना पात्रांच्या रंगमंचीय हालचाली, त्यांच्या रचना नाट्याशय व्यक्त करण्यास मदत करीत होत्या. उपलब्ध कलाकाराचा आवाज हेरून अतिशय परिणामकारी शब्दोच्चारांवर त्यांनी जाणीवपूर्वक भर दिलेला पाहून समाधान वाटले. हे आवर्जून सांगण्याचे कारण असे की, अलीकडे स्पर्धेत होणाऱ्या असंख्य नाटकांत अन्य पूरकतंत्रावर जितके लक्ष केंद्रित होते तितके वाचिक अभिनयावर होत नाही. नाटकात पात्रांची इतकी गर्दी असूनही कोठेही गोंधळ वाटला नाही. त्यासाठी रंगमंचाचा पूर्णपणाने जाणीवपूर्वक केलेला वापर प्रयोगाच्या गुणवत्तेत भर टाकणारा होता. एक उत्तम दिग्दर्शक म्हणून घोसाळकरांचा झालेला गौरव सर्वार्थाने यथायोग्य आहे !

'बेस्ट'च्या व्यवस्थापकीय अडचणी, शासनाच्या नियमांच्या मर्यादा यामुळे 'मा अस् साबरिन'सारख्या नाटकाचे प्रयोग प्रमाणापेक्षा मोठ्या संख्येने होणार नाहीत ही एक खंत आहे; पण हा प्रयोग अधिकतेने पुणे–मुंबई सोडून अन्यत्र व्हावा यासाठी जरूर विचार व्हायला हवा, त्यातून मार्ग काढायला हवा. तरच असे प्रयोग आणि त्यातले गुणी कलावंत यांचा परिचय अन्य नाट्यरसिकांना होईल. 'बेस्ट' कलाकारांचे मनःपूर्वक अभिनंदन ! □

चित्रपट

## सगळाच 'आनंदी आनंद' हम रहे ना हम



आनंद कुटुंब अगदी अभेद्य आहे आणि नवकेतनचा सिनेमा म्हटलं की, 'आनंदानं' आपण तो पहायलाच पाहिजे. या आनंदपरंपरेतला 'हम रहे ना हम' हा आणखी एक नवा चित्रपट. निर्मिती नवकेतनची, दिग्दर्शन केतन आनंदचं आणि नायकपद विजय आनंद या तरुणाकडे. या तरुण नायकाच्या जोडीत एके काळची तरुण नटी रेहानासुलताना देखील आहे. इतर भूमिकांत शबाना आझमी, कंवलजीत, सुजितकुमार आणि पाहुणा अशोककुमार हे चेहरे दिसतात.

विजय आनंद 'कोरा कागज' मध्ये सह्य वाटला याचं कारण त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी ती भूमिका सुसंगत होती आणि नाही म्हटलं तरी ७–८ वर्षांपूर्वी तो याहीपेक्षा तरुण होता. 'हम रहे ना हम' मध्ये तो अगदी वयस्कर वाटतो. (मध्यंतरानंतर त्याला प्रौढाचंच काम आहे; पण आधीच्या दीड तासाचं काय ?) सुरुवातीला, लग्नाला २–३ वर्षं झालेला, चैनी बायको असलेला हा ब्रिजमोहन आपल्याला दिसतो. बिचारा महिना हजार रुपये कमवत असतो; पण पत्नीला ते पुरे पडत नाहीत. पत्नी कल्याणी (रेहाना सुलताना) त्याला सारखी टाकून बोलते. आपल्या दुर्दैवानं किंवा सुदैवानं आपल्याला तिचं बोलणंच कळत नाही. रेहाना इतकी तोंडातल्या तोंडात बोलते की, पतीपर्यंत तरी तिनं दिलेल्या शिव्या पोचत असतील की नाही अशी शंका निर्माण व्हावी.

चैनीची चटक लागलेली ही कल्याणी ब्रिजचा साहेब परमार (धीरज) बरोबर चाळे सुरू करते. हा परमार लिपस्टिकच्या धंद्याच्या नावाखाली हिरे इकडून तिकडे पाठवत असतो आणि ही सगळी हस्तांतरं ब्रिजच्या नकळत पण ब्रिजच्याचमार्फत होतात कल्याणी परमारला यात साथ देत असते. ब्रिजला आपल्या बायकोचं बाहेरख्याली वर्तन कळतं आणि तो पुणे–मुंबई लोहमार्गावर (गेल्या काही महिन्यांतच निर्माण झालेल्या) खळाळत्या नदीत– त्या नदीवरून गाडी चाललेली असताना उडी टाकून जीव देतो. (पुणे–मुंबई लोहमार्गावर आतापर्यंत मी तरी एखाद्या नदीवरच्या पुलावरून गाडी गेलेली बघितली नाही. हाही एक आनंदाचाच धक्का की नाही ?) पण तो मरत नाही इकडे कल्याणी आणि परमार त्याचं प्रेत शोधण्याच्या कामाला निघतात. कारण ब्रिजच्या कोटात हिरे असतात. आपल्या कोटात सुटे पैसे खुळखुळावेत अशी आपण इच्छा केली तरी आज ते आपल्याला शक्य होत नाही आणि इथे हिरे खुळखुळतात; पण खुळखुळतात हा शब्द योग्य नाही. हिरे इतक्या विपुल प्रमाणावर,

भाजी विकावी तसे विकू जाऊ लागल्यावर त्यांच्या नादासाठी नवीन शब्द शोधून काढण्याची जबाबदारी भाषातज्ज्ञांवर येऊन पडली आहे.

असो. तर कल्याणी–परमारचं भांडण होऊन कल्याणी त्याला कड्यावरून खाली ढकलून देते. पुढे पोलिसांना हे प्रेत सापडल्यावर कल्याणी ब्रिजचंच म्हणून सांगते. इकडे ब्रिजला पुनर्जन्म मिळतो. मोहिनी (शबाना) आणि तिचे वडील (अशोककुमार) त्याला वाचवतात. दरम्यान वृत्तपत्रांत ब्रिज मेल्याची आणि त्याचं प्रेत सापडल्याची बातमी आलेली असते. म्हणून तो प्रताप साहनी नाव धारण करतो. शबानाशी लग्न करतो. यशस्वी जीवन जगतो. 'प्रतापनगर'च वसवतो. याचा मुलगा राहुल (कंवलजीत) इन्स्पेक्टर बनतो. ' परमार कॉस्मेटिक्स 'च्या सर्व अड्ड्यांचा धुव्वा उडवतो. कारण हे हिऱ्याचा चोरटा व्यापार करत असतात. फक्त ' मॅडम 'चा तपास लागत नाही. ही मॅडम ' परमार कॉस्मेटिक्स ' ची सूत्रं हलवत असते. मॅडम राहुलचा काटा काढायचा ठरवून त्याची सर्व माहिती गोळा करते आणि तिला प्रताप साहनीविषयी कळतं. इथून तिची कट–कारस्थानं सुरू होतात. कारण मॅडम म्हणजेच कल्याणी. ती राहुलला ब्रिज ऊर्फ प्रतापविषयी खोटंनाटं सांगते. राहुल वडिलांविरुद्ध जातो. शेवटी रहस्यभेद (ब्रिजनं लग्नापूर्वी मोहिनीला सांगितलेलं असतं की, माझ्या पूर्वायुष्याविषयी काही विचारायचं नाही म्हणून एवढ्या अडचणी उद्भवतात.) शेवट सुरळीत.

कुठल्याही तंत्राविषयी आवर्जून बरं-वाईट बोलावं असं काहीही ' हम रहे ना हम ' मध्ये नाही. सर्वच बाबतीत हा चित्रपट सुमार म्हणता येईल असा. रेहाना सुलतानानं नंतरची मॅडम चांगली रंगवली आहे. शबाना चांगली. विजय आनंदचा अभिनयही अगदी सुमार. त्यातल्या त्यात कंवलजीत जरा बरा वाटतो. एक तर तो 'हॅंडसम' आहे. इन्स्पेक्टरला साजेसं व्यक्तिमत्त्व त्याच्याजवळ आहे. त्याचं कामही बरं आहे.

लोकांना आजकाल सिनेमाची इतकी सवय झालेली असते की, सिनेमा असला की जायचं एवढंच महत्त्वाचं. कारण पहिल्या दिवशीच्या पहिल्याच खेळाला इतकी गर्दी होती की, अशी गर्दी पाहिली की वाटतं की, ठराविक मसाला जर घातला तर आज कुणीही खोऱ्यानं पैसा ओढू शकेल. लोकांना आवडतं म्हणून आम्ही देतो अशा विचारानं सर्वचजण असेच चित्रपट काढायला लागले तर चित्रपटाच्या इतक्या अंगांपैकी कुठल्याही अंगात आपण पुढेच जाऊ शकणार नाही. अर्थात लोकांना आवडतं म्हणून असे चित्रपट की असेच चित्रपट येतात, लोकांना आवडतात हा वाद ' अंडं आधी की कोंबडी आधी ' च्या धर्तीवरचा असला तरी ' हम रहे ना हम ' सारखे चित्रपट पाहून मनाला विशेष आनंद वाटत नाही हेच खरं.

—उज्ज्वला लेले

# अनवट

## ' अर्धांगी ' करण्याचा झियांचा चंग !

पाकिस्तानच्या झिया–उल–हकसारख्या दूरदृष्टीच्या माणसांची म्यां पामरे काय स्तुती करावी ? इस्लामीकरणाच्या ध्येयाने धुंद झालेले झिया आता थेट मध्ययुगात गेले आहेत. नुकतेच त्यांच्या सरकारने ' मजलिसे-शूरा ' या सरकारी वीरांच्या संसदेत एक वटहुकुमाचा मसुदा मांडला. नेहमीप्रमाणे धर्माचे पालन करायचे म्हणजे स्त्रियांना पडती बाजू घ्यावीच लागते. (काही अर्धवट त्याला अन्याय म्हणतात ).

या नव्या कायद्याचे सार असे—

क्र. १ : 'एखाद्या' चा खून झालेला असेल तर त्याच्या कुटुंबाला ३०.६३ किलो चांदी भरपाई म्हणून द्यावी. 'एखादी' च्या खुनानंतर तिच्या कुटुंबियांना याच्या अर्धी चांदी मिळावी.

क्र. २ : न्यायालयात साक्ष देण्याबाबत दोन स्त्रियांची साक्ष 'एका' पुरुषाच्या साक्षीबरोबर समजावी. ( याचा अर्थ आम्हाला अजून समजलेला नाही. पंचवीस वर्षांच्या पुरुषाऐवजी १२–१२ वर्षाचे मुलगे म्हणणाऱ्या टिळकांचेही स्मरण केले–पण नाही ! आम्हीच करंटे ! )

तर स्त्रियांना सर्वार्थाने अर्धांगी बनविण्याचा झियांचा प्रयत्न आहे. यापूर्वी त्यांनी नैतिक अधःपतन थांबविण्यासाठी महिलांचे खेळ पुरुषांनी पाहाण्यास बंदी केली. महिलांनी शॉर्टस् पेहरून खेळण्याला बंदी केली आहेच. 'आमच्या पोरीचं नख दृष्टीला पडायचं नाही.' म्हणणाऱ्या शहाण्णव कुळीप्रमाणे महिला संघांना परदेशी दौरे करण्यास मनाई केलेलीच आहे.

काही महिन्यांपूर्वीच झियांच्या अर्धांगीने आपल्या नवऱ्याचे असले उद्योग आपल्याला पसंत नसल्याचे सांगितले होते.

एक गंमत म्हणजे, बरेच दिवस झाले, आपले जळगावचे सिनेमाबंदीवाले वीर गेले कुठे ? का तेही भिवंडीतच गुंतले होते. झिया काय करताहेत, इकडेही तसलेच आंदोलन सुरू करता येईल का बघा !

## ' सॉलिडॅरिटी ' जिवंत आहे

पोलंडमध्ये बऱ्याच दिवसांनंतर गेल्या महिन्यात सॉलिडॅरिटी संघटनेने आपल्यात अजून धुगधुगी आहे ते जाणवून दिले. मे-महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मे-दिनाच्या (कम्युनिस्ट सत्तेच्या) निमित्ताने निघालेल्या कामगारांच्या शिस्तबद्ध संचलनात अचानक लेक वालेसा उगवले. सॉलिडॅरिटीच्या १८०० कार्यकर्त्यांनी बॅनर्स उलगडले ' राजकीय कैद्यांना मुक्त करा !' अशा घोषणा दिल्या. सलामी घेणाऱ्या व्ही. आय्. पी. मंडळींना उद्देशून शिट्ट्या हाणल्या. व्हीआयपी मंडळी स्तंभित होऊन बघतच राहिली !

लाठ्या–काठ्या घेऊन पोलीस आले. एकच गोंधळ झाला. १ हजार जणांना अटक झाली–पण वालेसा निसटले !

पोलंडच्या राजकीय वादात एक छोटेसे वादळ आले. जिवंतपणा आला, एवढेच.

मतांचे राजकारण आणि दंगली : पृष्ठ ५ वरून

## केंद्रबिंदू झोपडपट्टी

मुंबईतही थोड्याफार फरकाने हाच प्रकार घडला. शिवसेनेच्या मुंबई बंदचे लोण पसरत गेल्यावर त्याचा ताबा गुंडांनी घेतला. मुंबईतही अनेक ठिकाणी झोपड्यांना आगी लावण्यात आल्या. त्याला कोणतेही जातीय स्वरूप नव्हते. काही ठिकाणी निरपराध हिंदू व मुस्लिमांची हत्या करण्यात आली ती निरनिराळ्या अफवांवर विश्वास ठेवून, दोन्ही जमातीतील उत्साही लोकांनी घडवून आणली होती. मुंबईत व ठाण्यात काही ठिकाणी दोन्ही जमातीतील लोकांनी परस्परांच्या घरांना व दुकानांना आगी लावल्या. त्यातील बहुतेक दुर्दैवी लोकांचा या दंगलीशी दूरान्वयानेही संबंध नव्हता. ते निरपराध होते व केवळ एका विशिष्ट धर्माचे असल्याने दुसऱ्या जमातीतील लोकांच्या रोषास बळी पडले होते. पोलीसअधिकारी नंदकुमार गोखले यांची हत्या करणारे लोकही मुस्लिम नव्हते किंवा हिंदूही नव्हते तर जातपात न बाळगणारे ते गुंड व समाजकंटकच होते. दंगल लवकरात लवकर आटोक्यात न आणल्याबद्दल मुंबई पोलिसांना दोष दिला जातो; परंतु त्यात त्यांचा काहीही दोष नाही. त्यांनी दंगल लवकरात लवकर आटोक्यात आणण्याचे त्यांच्या परीने प्रामाणिक प्रयत्न केले; परंतु हे सर्व त्यांच्या संख्येच्या आवाक्याबाहेरचे होते. मुंबईच्या पोलिसांची क्षमता पूर्वीइतकीच चांगली आहे. प्रश्न आहे तो चारी दिशांनी बकाल वाढवणाऱ्या मुंबईकरिता त्यांचे संख्याबळ पुरेसे आहे का ? दंगल आटोक्यात लवकर न येण्याचे कारण ती जातीय नव्हती हेच आहे. तसे असते तर मुंबईच्या पोलिसांनी ती नक्कीच लवकर आटोक्यात आणली असती. मुंबईला आजपर्यंत बऱ्याच वेळा जातीय दंगली झाल्या, त्या इतक्या लांबल्या होत्या का ? मुंबईत रोज जे शेकडो लोक बाहेरच्या राज्यातून येतात, त्यात गुन्हेगारी प्रवृत्तीचे बरेच लोक असतात. या गुन्हेगार, गुंड, समाजकंटकांचे वास्तव्य बहुधा झोपडपट्ट्यांत असते. या लोकांनीच ही दंगल पसरवली. या दंगलीचा केंद्रबिंदू झोपडपट्टी होता हा काही योगायोग नव्हे. तेव्हा दोष द्यायचा तो पोलिसांना न देता मोठ्या प्रमाणात बकाल स्वरूप धारण करणाऱ्या ज्या झोपडपट्ट्या मुंबईत कावळ्याच्या छत्र्यांप्रमाणे उगवत आहेत त्याकडे कानाडोळा करणाऱ्या महाराष्ट्र शासनास द्यावयास हवा. या अक्राळविक्राळ झोपडपट्ट्या शेवटी मुंबईचा सर्वनाश घडवून आणणार आहेत हे सांगण्यासाठी आता एखाद्या भविष्यवेत्त्याची गरज नाही! या झोपडपट्ट्यांत निरनिराळे बेकायदेशीर व्यवहार करणारे हजारो गुन्हेगार व समाजकंटक असून त्यांचा बंदोबस्त करण्यास सध्या आहे त्याच्या दुप्पट पोलीसदलही पुरणार नाही. कारण ही गुन्हेगारांची आवक रोजच्या रोज मोठ्या संख्येने होत आहे. या गुन्हेगारात सर्व जमातीचे लोक आहेत. शिवाय गुन्हेगारांना जात–पात–धर्म नसतोच. तेव्हा मुंबईतील दंगलीत हिंदू–मुस्लिम वैमनस्याचा प्रश्न सर्वस्वी गुंतलेला नव्हता, तर ही दंगल मुख्यतः झोपडपट्टीतील गुन्हेगारांनी जाणीवपूर्वक घडवून आणली होती. अशी दंगल पुन्हा घडून न येण्याच्या दृष्टीने झोपडपट्ट्या न वाढू देणे हा एकच उपाय शासनापुढे आहे आणि त्याकरता परप्रांतातून मुंबईत येणाऱ्या लोकांना परमिट–पद्धत लागू करण्याची जी मागणी मध्यंतरी करण्यात आली होती, त्याचा गंभीरपणे विचार महाराष्ट्र शासनाने आता करायला हवा. अर्थात मतांच्या लाचारीमुळे अशी पद्धत कोणताही राजकीय पक्ष सुरू करण्यास का कू करेल; परंतु दीर्घकालीन समस्येच्या सोडवणुकीकरिता अशा बोल्ड स्टेप्स घेणे अत्यंत जरुरीचे आहे. झोपडपट्टीतील मते एकगठ्ठा मिळत असल्याने व झोपडपट्ट्यांत परप्रांतीयांचा मोठ्या प्रमाणात भरणा असल्याने सरकार असे पाऊल उचलण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे ही समस्या वाढतच जाणार.

मुंबई, भिवंडी, ठाणे, कल्याण येथील दंगली मुख्यत्वे करून जातीय नसल्या तरी या दंगलीत हिंदू व मुस्लिम या दोन्ही जमातींतील अनेक लोक गुंतल्याने त्यावरील जातीय हा शिक्का पुसटला जाणार नाही. या दोन्ही धर्मांत जातीयतावादी लोकांचा बराच भरणा आहे. त्यांच्या वक्तव्यांनी, लिखाणांनी दोन्ही जमातींत नेहमीच सूक्ष्म तणाव असतो. मुस्लिमांना असे वाटते की, सरसकट हिंदूंच्या लेखी आपण देशद्रोही आहोत. खरा तसा प्रकार नाही. मुस्लिम हे हिंदूंइतकेच राष्ट्रवादी आहेत. पाकिस्तान, बांगलादेश येथील एकंदर दडपशाही, अंदाधुंदी पहाता त्या देशाबद्दल भारतातील मुस्लिमांना प्रेम वाटत असेल असे मला मुळीच वाटत नाही. शिवाय केवळ ते मुस्लिम आहेत म्हणून त्यांना भारतात काही वाईट वागणूक दिली जात नाही. काही वेळेला क्रिकेटमध्ये किंवा अन्य खेळांत पाकिस्तान जिंकले की, काही मुस्लिम एरियात फटाक्यांची आतषबाजी होते; परंतु ते काही उत्साही व माथेफिरू लोकांचे कृत्य असते. त्याकरिता सर्व मुस्लिम समाजास जबाबदार धरण्याचे कारण नाही. काही वेळा पाकिस्तान व बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार केले जातात. त्यावर प्रतिक्रिया भारतातील हिंदूंत उमटते. अर्थात पाकिस्तान व बांगलादेश ही दोन्ही इस्लामी (धर्माधिष्ठित) राष्ट्रे असल्याने त्या देशातील घटनांची तुलना येथे करता येणार नाही. बांगलादेशात सध्या तेथून भारतात आलेल्या हिंदूंची मालमत्ता जप्त करण्याचे प्रयत्न होत आहेत. तसाच धडा येथील मुस्लिमांना शिकवावा अशी भाषा भारतात कोणी करू लागला तर तो त्याचा शुद्ध वेडेपणा ठरेल. कारण तेथील परिस्थिती व भारतातील समाजव्यवस्था यात कोणतेही साम्य नाही. एकदा निधर्मी स्वरूप मान्य केल्यावर हा हिंदू, हा मुसलमान, हा ख्रिश्चन असा सवालच पैदा होत नाही.

## शिक्षणाचा प्रसार

मुस्लिम पर्सनल लॉ बदलावा, मुस्लिमांना एकाहून अधिक बायका करण्याची परवानगी नसावी, त्यांच्यावर नसबंदीची सक्ती करण्यात यावी अशा मागण्या वारंवार करण्यात येतात. यामागे, भविष्यात ते संख्येने हिंदूंपेक्षा जास्त होतील ही सुप्त भीती असते. भारतातील मुस्लिम संख्येने खूप वाढले की, आणखी एका पाकिस्तानची मागणी होईल अशी भीती व्यक्त करण्यात येते. ही भीती अर्थातच व्यर्थ आहे. हिंदूंपेक्षा भारतातील मुस्लिमांची संख्या वाढेल ही कल्पनाच हास्यास्पद आहे. शिवाय पाकिस्तान, बांगलादेश, अरब राष्ट्रे, इराण, इराक या धर्माधिष्ठित राष्ट्रांचे काय हाल चालले आहेत हे भारतातील मुस्लिमांना काय समजत नाही ? अशा परिस्थितीत ते आणखी एका पाकिस्तानची मागणी करतील ही शंका व्यर्थ आहे.

कोणताही कायदा करून सुधारणा होत नसतात तर लोकशिक्षणाने व सरूजादर्शाने सुधारणा घडवून आणाव्या लागतात एकाहून अधिक बायका केल्याने संतती अधिक होते यातही काही तथ्य नाही. मुस्लिम समाजात जे शिकलेले लोक आहेत ते एकाहून अधिक बायका करत नाहीत. शिवाय मुस्लिम समाजातील सुशिक्षित लोक नसबंदीच्या विरुद्ध नाहीत. आपला परिवार बदलत्या काळानुसार छोटा ठेवावा याचे महत्त्व त्याना पटलेले आहे. अशिक्षित समाजात थोडा नसबंदीस विरोध आहे; परंतु असा विरोध हिंदूमधील अशिक्षित लोकामध्येही पहावयास मिळतो. तेव्हा मुस्लिम समाजातील रूढी, परंपरा, त्याच्यावरील धार्मिक पगडा, अंधश्रद्धा याचे निर्मूलन करण्यासाठी ते देशद्रोही आहेत, त्यांनी भारतातून निघून जावे अशी व्यर्थ बडबड उपयोगी नाही तर त्यांच्यातील आर्थिक मागसलेपणा घालवावयास हवा. त्याचप्रमाणे साक्षरतेचे प्रमाण वाढायला हवे. व त्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. बहुसंख्य मुस्लिम समाज दारिद्र्यात खितपत पडल्याने त्याच्यावर रूढी, परंपरा, धर्म याचा जबरदस्त पगडा आहे. तो पगडा दूर करण्यासाठी त्याच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढायला हवे व ते लोकशिक्षणानेच होऊ शकेल. त्यांच्यातील सुशिक्षिताचे प्रमाण वाढले की, नसबंदी, द्विभार्याप्रतिबंध याचे महत्त्व त्याना आपोआपच पटेल व सध्या पटतही आहे हिंदूच्यावर रूढी, परंपरा, धर्म याचा पूर्वी काय कमी पगडा होता ? परंतु त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण जसजसे वाढत गेले तसतसा तो पगडा कमी होत गेला. आपल्यातील अलगतेच्या भावनेचाही मुस्लिमानी त्याग करायला हवा. त्याकरिता उर्दूचा जास्त आग्रह न धरता स्थानिक भाषातून मुलाना शिकवण्याचा आग्रह धरायला हवा. म्हणजे आपापसात मिसळल्याने एकमेकातील व्यर्थ गैरसमज दूर होतील. हिंदू हा कर्नाटकात कानडी शिकतो, महाराष्ट्रात मराठी, आंध्रात तेलगु; परंतु महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या राज्यातील मुसलमान मात्र उर्दू शिकतो. अर्थात काही मुस्लिम स्थानिक भाषेतही शिकतात; परंतु सर्वसामान्यपणे वरील परिस्थिती आहे. तेव्हा उर्दू शाळात शिकल्याने मुस्लिम विद्यार्थ्यांचा हिंदू विद्यार्थ्यांबरोबर संपर्क येत नाही व मुस्लिम विद्यार्थ्यांच्यात अलगतेची भावना निर्माण होते. त्यातून गैरसमज निर्माण होतात. मुस्लिम मोहल्लेही गावात एका बाजूला असल्याने व्यापारधंद्याशिवाय हिंदूच्यात मिसळणे त्याना शक्य होत नाही. या बाबतीत सुधारणा घडवून आणणे शक्य आहे व ते काम मुस्लिम समाजातील सुशिक्षितच करू शकतील.

## मतांचे राजकारण

मुस्लिम समाजात सध्या सुधारणावादी प्रवृत्ती बऱ्याच वाढल्या आहेत; परंतु त्यांना रूढिप्रिय, धर्मभोळ्या लोकांकडून बराच त्रास होतो. शिवाय काही हिंदूकडून मुस्लिम हे देशाचे दुश्मन आहेत, त्याना या देशात रहाण्याचा अधिकार नाही अशा स्वरूपाचा सतत प्रचार होत असल्याने मुस्लिम समाजातील धर्मश्रद्ध लोकांचे प्रस्थ वाढते व ते नाइलाजाने धर्मगुरूच्या जाळ्यात ओढले जातात. याचा त्रास मग मुस्लिमातील सुधारणावादी लोकाना भोगावा लागतो. शिवाय मताच्या लाचारीने निरनिराळे राजकीय पक्ष मुस्लिमांतील अंधश्रद्ध लोकांच्या मागण्या उचलून धरतात. मुस्लिमाच्यात अलगतेची भावना वाढवण्यास हे राजकीय पक्षच जबाबदार आहेत. भारतावर निर्धोकपणे राज्य करण्यासाठी प्रथम ब्रिटिशांनी हिंदू–मुस्लिमांच्यात जातीय तेढ जाणूनबुजून वाढवली व त्याचा वारसा आता भारतातील राजकीय पक्ष चालवत आहेत. मुस्लिमाच्या मनात हिंदूबद्दल दहशत निर्माण करून व आपणच फक्त त्याचे हितकर्ते आहोत असा देखावा करून हे राजकीय पक्ष मुस्लिमाची मते एकगठ्ठा लाटतात; परंतु त्याचे कल्याण मात्र करत नाहीत. मुस्लिम समाज अलग रहाण्यात, त्याच्यात असुरक्षिततेची भावना वाढवण्यात, त्याच्यातील निरक्षरतेचे प्रमाण कायम राखण्यात मतांसाठी लाचार असणाऱ्या राजकीय पक्षाना रस असतो. कारण त्यामुळे त्याना भडकवून मते पदरात पाडणे सोपे जाते. मग मुस्लिमाना भडकवण्याकरिता, त्याच्यातील जातीय भावनांना खतपाणी घालण्यासाठी शहाबुद्दीन, शम्स, बनातवाला यांच्यासारखे तथाकथित मुस्लिमनेते प्रत्येक पक्षाच्या पदरी असतातच.

हिंदू–मुस्लिम जातीय तणावास हा पोलिटिकल फॅक्टर जबाबदार आहे. जोपर्यंत मतांची लाचारी संपत नाही तोपर्यंत असेच चालत रहाणार. सगळीकडे राजकारणाने बट्ट्याबोळ केला आहे. मुंबईतील परप्रांतीयाचा लोंढा तसाच येत रहाणार. कारण त्याविरुद्ध काही कारवाई केली तर परप्रांतीयाची मते मिळणार नाहीत ना ! आसामची डोकेदुखी कोणी निर्माण केली ? मुस्लिमाच्या मताकरिता त्याची बांगलादेशातून होणारी आवक मुद्दाम दुर्लक्षिण्यात आली. भिंद्रनवाल्यांना डोक्यावर कोणी चढवून घेतले ? अकालीना शह देण्यासाठीच त्यांना मोठेपण देण्यात आले ना ? आसाम धगधगतोय, बकाल मुंबईची विनाशाकडे वाटचाल होतेय, हिंदू–मुस्लिमातील तेढ कमी होत नाहीये. तिचा उद्रेक भारतभर जागोजागी पहावयास मिळतोय. या सर्व गोष्टीना मताचे राजकारण जबाबदार आहे. विशाल आणि निःपक्षपाती दृष्टिकोनातून या समस्याकडे कोणीच पहावयास तयार नाही, हीच तर खरी शोकांतिका आहे ! □


अन्याय, जुलुम–जबरदस्ती व भ्रष्टाचाराची
सीमा झाली की क्रांती अटळ ठरते.
क्यूबन क्रांती हे त्याचे ढोबळ उदाहरण.
संपूर्ण लॅटिन अमेरिका ढवळून काढणाऱ्या
या क्यूबन क्रांतीचा इतिहास.

फिडेल, चे आणि क्रांती

अरुण साधू

आवृत्ती : दुसरी । बावीस रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# नाटयपंढरी



## जशी आपली आज्ञा !

१९३२–३३ च्या सुमारास मराठी रंगभूमीचे सुवर्णयुग संपुष्टात आले. वैभवपर्वाला ओहोटी लागली. गंधर्व, बलवंत, ललितकलादर्श, महाराष्ट्र यांसारख्या नामांकित नाटयसंस्था, कर्जाच्या ढिगाऱ्याखाली चेंगरून गेल्या. बालगंधर्व, बोडस, दाते, कोल्हटकर, फाटक यांसारखे रंगभूमीचे राजाधिराज, संन्यासी होऊन सिनेसृष्टीत दाखल झाले होते. जन्मकुंडलीने दिलेला न्याय निमूट स्वीकारीत होते. त्यांच्यापाठोपाठ, इतर नटमंडळी चित्रपटांत मिळतील ती कामे स्वीकारीत होती. काय करणार ? जिथे फुले वेचली तिथे...! किट्सन लाइटच्या प्रकाशात रंगमंचावर मिळविलेल्या टाळचा, वन्स मोअर मध्यान्हीला–उदरभरणाला उपयोगी पडत नव्हत्या !


रंगभूमीचे सम्राट बालगंधर्वही बोलपटासाठी करारबद्ध होऊन, 'प्रभात' च्या कुपणात अडकले होते. 'धर्मात्मा' चित्रपटात प्रमुख भूमिका करत होते. बालगंधर्व–पुरुष वेषात, हो, हो ! भरजरी शालूऐवजी, चक्क पंचा नेसून–एकनाथ म्हणून रुपेरी पडद्यावर दिसणार हेही एक मोठे आकर्षण होते. कौतुक होते; पण क्षणाक्षणाला रसिकांची दाद घेत, वन्समोअरच्या खैरातीत नाटकात फुलणारे, रंगणारे बालगंधर्व, सिनेमाच्या त्या एकाकी यंत्रसंचात गुदमरले, बावरले, गहिवरले. डोळयांसमोर दिसू लागली आपली नाटकमंडळी नि प्रेक्षकांच्या तुफान गर्दीत रंगणारी नाटके–सौभद्र, मानापमान, स्वयंवर, एकच प्याला ! त्यांना राहवेना, त्यांनी पंतांना, (गंधर्व हिरो–गंगाधरपंत लोंढे) लिहिले– 'पंत, मी प्रभातच्या करारात गुंतून पडलो आहे. आपली कंपनी बंद पडली आहे; पण कसेही करून ती उभी राहिलीच पाहिजे ती सुद्धा मी करारातून मोकळा होण्यापूर्वी ! हे पुन्हा नव्याने कंपनी उभारण्याचे काम, देवा, तुमच्यावाचून कोणा स्वारीच्या हातून होणार नाही. माझ्यासाठी एवढे काम तुम्ही करायलाच हवे !'

लोंढयासारख्या उमद्या नटाच्या हृदयाला हात घालायला, नारायणरावांचे भावनेने भिजलेले हे चार शब्द पुरेसे होते. लोंढे त्या वेळी 'ओडियन रेकॉर्ड' मध्ये, संगीत विभागात मोठ्या हुद्द्यावर होते. बस, पत्र हाती पडले मात्र, ती जणु आपल्या मालकांची आज्ञा समजून, पंत कामाला लागले. आधी ओडियन कंपनीला रामराम ठोकला. पुण्यात येऊन दाखल झाले. मास्टर कृष्णराव, हरिभाऊ देशपांडे, अभ्यंकर, मा. दुर्गाराम आदि अनेक 'गंधर्व' कलावंतांना नारायणरावांची–आपल्या मालकांची इच्छा सांगितली. त्यांची हळहळ, त्यांचे दुःख समजावून दिले. स्वतः विनावेतन काम करण्याची तयारी दाखविली. साहजिकच मग इतर कोणी कलाकारांनी, कुठेच अडविले नाही. मास्तरांनी 'स्वयंवर' च्या पहिल्या प्रयोगात काहीही न मागता 'रुक्मिणी' करण्याचे कबूल केले. झाले. विजयानंद नाटयगृहावर गंधर्व नाटक मंडळीचा बोर्ड झळकला! दिवस होता ४ जून १९३५ खेळ स्वयंवर ! प्रमुख भूमिका – रुक्मिणी – मा. कृष्णराव. कृष्ण–लोंढे !

योग असा की, आशीर्वाद द्यायला होती एक थोर व्यक्ती ती म्हणजे – शंकरराव मुजुमदार! किर्लोस्कर संगीत मंडळीचे एक काळचे मालक. मराठी रंगभूमीचे कर्तुम् अकर्तुम् ! अण्णासाहेबांची पहिली शकुंतला! पहिली सुंदर रुक्मिणी (सौभद्र). प्रयोगाला स्वतः बालगंधर्व हजर ! प्रयोग रंगायला आणखी काय हवे ? बालगंधर्वांना अगदी भरून येऊन ते म्हणाले, 'आज माझी दुसरी आईच (शंकरराव) आशीर्वाद द्यायला आली आहे !

याला म्हणतात हाडाचा कलावंत ! दोष कुणात नसतात ? गंगाधरपंतांतही होते; पण त्यांच्यातल्या कलावंताचे मोठेपण त्या नटसम्राटांनी – बालगंधर्वांनी – अचूक हेरले होते. म्हणून त्यांनी हाक मारली ती लोंढयांना नि दाद दिली ती लोंढयांनीच ! केवळ बालगंधर्वांची इच्छा म्हणून पंतांनी हे धाडस केले नि यशस्वी करून दाखविले. गंधर्वांशिवाय 'गंधर्व मंडळी' म्हणजे हॅम्लेटविना हॅम्लेट, चंद्रा विना चांदणी रात्र अशीच स्थिती होती. हे यश गंधर्वपुण्याईचे, गंधर्व–कलावंताचे होते; पण हेही कबूल केले पाहिजे की, त्यात 'सिंहाचा वाटा' ( Lion Stare ) गंगाधरपंत लोंढयांचाच होता !

गंधर्व-हिरो म्हणून लोंढे बालगंधर्वांबरोबर बरीच वर्षे उभे राहिले. कृष्ण, चारुदत्त, कोदंड, कच, धैर्यधर, अश्विनशेट अशा अनेक भूमिकांत सुरेख साथ दिली. पुढे त्यांनी गंधर्व रंगभूमीचे पुन्हा दर्शन घडवावे या हेतूने स्वतःची 'राजाराम संगीत मंडळी' स्थापन केली होती. त्याच संस्थेत चिंतोबा गुरव, शंकरराव सरनाईक, बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, कामण्णा (दिनकर ढेरे) आदि अनेक जुन्या गुणवंतांचे नव्या पिढीला दर्शन झाले. कंपनी ऐन भरात असता लोंढे हृदयविकाराने अकाली गेले ! जाणकार असे सांगतात की, नटवर्य कृष्णराव गोरे यांच्यानंतर त्यांच्या जवळपास येणारा स्वच्छ वाणीचा नि भरदार सुरेल आवाजाचा गायक नट म्हणून गंगाधरपंत लोंढयांचेच नाव घ्यावे लागते !



यातील फक्त एक काडी हलवा आणि चौकोन तयार करा.

सुटीत तुम्हाला गुंगवणाऱ्या अशा अनेक गंमती जमती.


# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

**मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी**

**वैशिष्ट्ये** * संपूर्ण अंटार्क्टिका मोहीम * ११ विज्ञान कथा
* एक अभ्यास पुरवणी * अभ्यास व महत्त्वाच्या नोंदींसाठी तारखांची स्वतंत्र पाने
* भरपूर कोडी-स्पर्धा * सुभाषिते, सुविचार

नजिकच्या पुस्तक दुकानात आजच खरेदी करा * किं. १५ रु.

**राजहंस प्रकाशन** | १०२५, सदाशिव, पुणे-३०.



तुमचे डोळे तुम्हाला फसवू शकतील. मग सांगा यातली कोणती रेघ सरळ आहे? विज्ञानातील अशा धमाल गमतींचा खजिना.

# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

**मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी**

**वैशिष्ट्ये** * संपूर्ण अंटार्क्टिका मोहीम * ११ विज्ञान कथा
* एक अभ्यास पुरवणी * अभ्यास व महत्त्वाच्या नोंदींसाठी तारखांची स्वतंत्र पाने
* भरपूर कोडी-स्पर्धा * सुभाषिते, सुविचार

नजिकच्या पुस्तक दुकानात आजच खरेदी करा | किं. १५ रु.

**राजहंस प्रकाशन** | १०२५, सदाशिव, पुणे-३०.

धूप पेटवला की इजिप्तमधील एका देवळाचे दरवाजे आपोआप उघडतात– कसे?

## जादू? बुवाबाजी? का विज्ञान?

अशा अनेक गोष्टींमागच्या वैज्ञानिक कारणांचा शोध घ्यायला शिकविणारी.

# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

**मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी**

**वैशिष्ट्ये** * संपूर्ण अंटार्क्टिका मोहीम * ११ विज्ञान कथा
* एक अभ्यास पुरवणी * अभ्यास व महत्त्वाच्या नोंदींसाठी तारखांची स्वतंत्र पाने
* भरपूर कोडी-स्पर्धा * सुभाषिते, सुविचार

नजिकच्या पुस्तक दुकानात आजच खरेदी करा | किं. १५ रु.

**राजहंस प्रकाशन** | १०२५, सदाशिव, पुणे-३०.



आवाजांचे गुणाकार घड्याळाची टिक् टिक्, कानात हातोड्याची ठक् ठक् का बनते?

वैज्ञानिक कारणांचा शोध घ्यायला शिकविणारी.

# राजहंस विद्यार्थी दैनंदिनी

**मुलांना विज्ञानयुगातील बिरबल बनवणारी**

**वैशिष्ट्ये** * संपूर्ण अंटार्क्टिका मोहीम * ११ विज्ञान कथा
* एक अभ्यास पुरवणी * अभ्यास व महत्त्वाच्या नोंदींसाठी तारखांची स्वतंत्र पाने
* भरपूर कोडी-स्पर्धा * सुभाषिते, सुविचार

नजिकच्या पुस्तक दुकानात आजच खरेदी करा * किं. १५ रु.

**राजहंस प्रकाशन** | १०२५, सदाशिव, पुणे-३०.